रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ ▌अंक ९३ ▌पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. ९ सप्टेंबर २०२५

किंमत ५ ₹

## मिरकरवाडा बंदरात नौका बुडाली

**रत्नागिरी :** मासेमारी करून परत मिरकरवाडा बंदरात येणारी 'अमीन आएशा' ही मच्छिमार नौका बुडाल्याची घटना रविवारी (दि.७) मध्यरात्री घडली. या नौकेवर एकूण आठ खलाशी होते. त्यापैकी सहा जण सुखरूप बचावले असून दोन जण बेपत्ता होते. दुर्घटनेनंतर बोटीवरील सहा खलाशांनी पोहत किनारा गाठण्याचा प्रयत्न केला. यावेळी दुसरी स्थानिक मच्छिमार नौका मदतीला धावून आल्याने सहाही जण सुखरूप बचावले. तर दोन जण बेपत्ता होते. त्यापैकी एकाचा मृतदेह दुपारी ३ वाजता मिऱ्या समुद्रकिनारी सापडला. विनोद धुरी असे मृत खलाशाचे नाव असून स्थानिक मच्छिमारांनी त्याचा मृतदेह बाहेर काढला.

## समुद्रकिनाऱ्यावर संशयास्पद कंटेनर

**पालघर :** ओमानच्या समुद्रातून कंटेनर वाहून नेणाऱ्या एम. व्ही. फोनिक्स १५ या मालवाहू जहाजाला ऑगस्टमध्ये जलसमाधी मिळाली होती. जहाजवरील कंटेनर अरबी समुद्रात भरकटले होते. या पार्श्वभूमीवर मत्स्यव्यवसाय विभागाने मच्छीमारांना इशाराही दिला होता. आता हे कंटेनर शिरगाव सातपाटी समुद्रकिनाऱ्यावर लागले असून, ते ओमानमधील त्याच जहाजावरील असावेत, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सातपाटी येथे दोन तर शिरगाव येथे एक कंटेनर समुद्र प्रवाहासोबत वाहून आला आहे. फोनिक्स १५ या मालवाहू जहाजाला ओमान येथे जलसमाधी मिळाल्यानंतर त्यातून भरकटलेले पान ५ वर

### वे|ध|क

## उपराष्ट्रपतीपदासाठी आज निवडणूक

**नवी दिल्ली :** देशाला मंगळवारी (दि.८) नवीन उपराष्ट्रपती मिळणार आहेत. जगदीप धनखड यांनी २१ जुलै रोजी अचानक आरोग्याच्या कारणास्तव उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे रिक्त असलेल्या या पदासाठी आता मध्यावधी निवडणूक होत आहे. उपराष्ट्रपती निवडणुकीच्या तयारी दरम्यान, सत्ताधारी एनडीए आणि इंडिया आघाडी यांच्यात जोरदार रस्सीखेच आहे. एनडीए आणि इंडिया आघाडी यांच्यात ही एक प्रतिष्ठेची लढाईच मानली जात आहे. आता बीजेडी आणि बीआरएसने निवडणुकीतून माघार घेतल्यानंतरही, अकाली दल, झेडपीएम आणि वीओटीटीपीचे प्रत्येकी एक खासदार आणि तीन अपक्ष खासदारांनी त्यांच्या पसंतीचे स्पष्ट संकेत दिले नाहीत.

## साक्री-शिर्डी महामार्गावर अपघात

**नाशिक :** जिल्ह्यातील वनोली गावाजवळ साक्री-शिर्डी राष्ट्रीय महामार्गावर सोमवारी (दि.८) एसटी व दुचाकी यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातातील एसटी बसला दुचाकीने धडक दिल्याने दुचाकीवरील तिघांचा जागीच मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, ताहाराबादकडून येणारी नंदुरबारवसई आगाराच्या एसटी बसला समोरून येणाऱ्या भरधाव दुचाकीने धडक दिली. दुचाकीचालकाचा ताबा सुटल्याने ती थेट बसच्या पुढच्या चाकाला धडकली. या अपघातात विकी माळी (१९), रोशन माळी (२०) या दोन भावांसह गोविंद काळू पवार (५०) या तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे.

# ओएनजीसीमध्ये स्फोट

**। उरण । प्रतिनिधी ।**

**उरण येथील ओएनजीसीच्या गॅस प्रोसेसिंग प्रकल्प परिसरात सोमवारी (दि.८) दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास प्रचंड स्फोट झाला. या भीषण स्फोटानंतर क्षणार्धात आगीचे तांडव पसरले. परिसरातील नागावसह अनेक वस्त्यांमध्ये प्रचंड हादरे बसले, तर घरांच्या काचा फुटून नागरिकांचे मोठे नुकसान झाले. गॅस पाईपलाईन गरम झाल्याने ही दुर्घटना घडल्याचे प्राथमिक अंदाज वर्तविला जात आहे.**



उरण येथील ओएनजीसीच्या स्फोटाचा आवाज एवढा प्रचंड होता की, संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. काही काळ स्थानिक नागरिकांना मोठ्या आपत्तीचेच संकट ओढवल्याची भीती वाटू लागली. दूरवरूनही उठणारा काळा धूर व प्रचंड ज्वाळा पाहून परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. घटनास्थळी ओएनजीसीचे अग्निशमन पथक तसेच संकट व्यवस्थापन पथक तात्काळ दाखल झाले. अग्निशमन दलाने अथक प्रयत्न करून आग आटोक्यात आणली असून, परिस्थिती नियंत्रणात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही; मात्र, नागरिकांच्या घरांना व मालमत्तेला मोठा फटका बसला आहे. दरम्यान, आग आणखी भडकण्याची शक्यता लक्षात घेऊन खबरदारीचा उपाय म्हणून प्लांटच्या आजूबाजूचा परिसर तातडीने रिकामा करण्यात आला. सुरक्षा कारणास्तव गॅस पुरवठा तात्पुरता बंद ठेवण्यात आला असून, परिस्थिती स्थिर करण्यासाठी प्रशासन व कंपनीचे प्रयत्न सुरू होते.

1 नागाव परिसरातील घरांना हादरे

2 नागरिकांचे प्रचंड नुकसान

3 सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही

### आपत्कालीन उपाययोजनांची मागणी

वारंवार घडणाऱ्या गॅस गळती, स्फोट आणि आगीमुळे उरणकरांच्या जीवितास व मालमत्तेस गंभीर धोका निर्माण झाला आहे. याच्या जबाबदारांवर कारवाई करावी, तातडीने सुरक्षा सुधारणा कराव्यात आणि किनारी पट्ट्यासाठी आपत्कालीन उपाययोजना राबवाव्यात, अशी जोरदार मागणी केली जात आहे.



## ख.वि. संघाच्या उपाध्यक्षपदी मनोहर पार्टे यांची निवड

■ ज्ञानोबा मालुसरे यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड

■ निवडणुका बिनविरोध करण्याचा सर्वपक्षीय निर्णय

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर तालुका खरेदी विक्री सहकारी संघाच्या निवडणुकीमध्ये शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे तालुकाप्रमुख अनिल मालुसरे यांचे वडील ज्ञानोबा मालुसरे यांची संघाच्या अध्यक्षपदी तर शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते मनोहर पार्टे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली आहे.

पोलादपूर खरेदी विक्री सहकारी संघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होताच तालुक्यातील सर्वपक्षिय प्रमुख पदाधिकारी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कार्यालयामध्ये एकत्र जमले होते. त्यामध्ये शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना ठाकरे व शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार व अजित पवार गट व भाजपचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी शिवसेना ठाकरे गट, शेकाप, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी यांनी ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सामंजस्याची भूमिका दर्शविली.

# एसटीची जागा खासगी संस्थांच्या घशात

### जिल्ह्यातील स्थानकांच्या नूतनीकरणाचे काम फक्त कागदावरच

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यासाठी जिल्ह्यातील अलिबागसह अन्य एसटी बस स्थानकांचे भूमीपूजन करण्यात आले. मात्र, अनेक वर्षे उलटूनही काही स्थानकांची अपूरी कामे व नुतनीकरण झाले नाही. परंतु, एसटीची तीच जागा भाडेपट्टा करारावर खासगी संस्थाच्या घशात घालण्यात आल्या आहेत. त्यामुळे स्थानकाच्या नुतनीकरणाचे काम फक्त कागदावरच, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या रायगड विभागाच्या अखत्यारित अलिबाग, पेण, रोहा, कर्जत, महाड, श्रीवर्धन, मुरूड व माणगाव असे आठ एसटी बस आगार असून २०हून अधिक बस स्थानके आहेत. जिल्ह्यात ४७० हून अधिक एसटी बसेस असून एसटीला महिन्याला ३५ लाखहून अधिक उत्पन्न मिळते. तसेच, एसटीतून १ लाखाहून अधिक प्रवासी प्रवास करतात. असे असतानाही प्रवासी वर्गाला नाहक त्रासाला सामोरे जावे लगात आहे. जून्या स्थानकांना गळती लागण्याबरोबरच प्रवाशांना बसण्यासाठी असलेल्या प्रतिक्षा कक्षात पुरेसी जागा नाही. त्यामुळे स्थानकांमधील प्रवाशांसह कर्मचाऱ्यांची गैरसोय दुर करण्यासाठी एसटी महामंडळाने काही वर्षापूर्वी पान ५ वर

> **जिल्ह्यातील काही स्थानकांची दुरुस्तीचे काम सुरु आहेत. काही स्थानकांचे नव्याने काम केले जाणार आहे. बांधकाम परवानगी मिळाल्यावर काम लवकरात लवकर केले जाईल.**
> **– गोल्हार, विभागीय अभियंता**



### स्थानकांमध्ये खासगी सीएनजी पंप

अलिबाग, रोहा, श्रीवर्धन, महाड, कर्जत एसटी बस स्थानकांच्या मोक्याच्या जागेवरील जमीनी भाडेपट्टा करारावर खासगी संस्थाच्या घशात घालण्यात आल्या आहेत. अलिबागमधील एसटी बस स्थानकासह रामवाडी, महाड, कर्जत व रोहा या स्थानकांमध्ये सीएनजी पंप उभारण्यात आले आहेत. एक पंप एसटी बससाठी असून दूसरा पंप खासगी वाहनांसाठी उभारण्यात आले आहेत.

# गेल प्रकल्पग्रस्तांना आश्वासनाचे गाजर




**प्रमोद जाधव**

**। रायगड ।**

गेल कंपनीत कंत्राटी स्वरूपात २६० कामगारांना दहा दिवसांत कामावर घेतले जाईल, असे आश्वासन जिल्हाधिकारी यांच्या बैठकीत देण्यात आले होते. परंतु, दोन महिने उलटूनही अद्याप कोणतीही कार्यवाही गेल प्रशासन व जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडून झाली नसल्याची खंत गेल प्रकल्पग्रस्त व स्थानिकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना फक्त आश्वासनाचे गाजरच दाखविण्यात आले असून कार्यवाही करण्यासाठी प्रशासन उदासीन ठरल्याची प्रतिक्रिया प्रकल्पग्रस्तांनी व्यक्त केली आहे.

उसर येथील प्रकल्पाच्या उभारणीसाठी चारशेहून अधिक एकर जमीन शेतकऱ्यांकडून घेतली गेली. प्लास्टीकचे उत्पादन करणाऱ्या गेलच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पाचे काम गेल्या दोन वर्षांपासून सूरू आहे. २०२६ पर्यंत हे काम पुर्ण करण्याचे शर्तीचे प्रयत्न सूरू आहेत. मात्र प्रकल्पग्रस्त, स्थानिकांना कंपनी प्रशासनाने प्राधान्याने नोकरी दिली पाहिजे, ही भुमिका घेत प्रकल्पग्रस्तांनी निलेश गायकर यांच्या नेतृत्वाखाली २६ जूनपासून गेल कंपनी प्रशासनाविरोधात लढा सुरू केला होता. त्यांनी कंपनीसमोर एकत्र येऊन काम बंद आंदोलन केले होते. परंतु, हे पान ५ वर

> **गेल कंपनीला कळविली आहे. कामगारांची यादी पाठविली आहे. मात्र, कंपनीने समर्थता दर्शविली आहे. पावसामुळे कामे बंद आहेत. ऑगस्टनंतर पाऊस थांबल्यावर काम सुरु झाल्यावर कामावर घेतले जाईल, असे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे.**
> **– भरत वाघमारे, जिल्हा पुनर्वसन अधिकारी**

# लोकल प्रवास होणार आणखी आरामदायी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईकरांचा लोकल प्रवास आता आणखी आरामदायी आणि आधुनिक होणार आहे. मुंबई रेल्वे विकास निगमने तब्बल २,८५६ पूर्णपणे वातानुकूलित वंदे मेट्रो डब्यांच्या खरेदीसाठी मोठी निविदा जाहीर केली आहे. हे डब्बे १२, १५ आणि १८ डब्यांच्या रॅक स्वरूपात धावणार असून गर्दी कमी करण्यासोबतच प्रवास सुखकर आणि सुरक्षित होणार आहे.

सध्या बहुतेक लोकल १२ डब्यांच्या असल्या तरी काही गाड्या १५ डब्यांच्या आहेत. वाढत्या प्रवाशांच्या मागणीला लक्षात घेऊन या नव्या खरेदीत १५ डब्यांच्या गाड्यांना प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच, आवश्यकतेनुसार १८ डब्यांचे रॅकही आणले जाणार आहेत. एमयूटीपी टप्पा ३ व ३ए अंतर्गत ६ सप्टेंबर रोजी ही निविदा जाहीर झाली. या अंतर्गत केवळ डबे खरेदीच नाही तर पुढील ३५ वर्षे त्यांची देखभाल करण्याचाही समावेश आहे. यासाठी भीवपुरी (मध्य रेल्वे) व वाणगाव (पश्चिम रेल्वे) येथे दोन अत्याधुनिक डेपो उभारले जाणार आहेत. निविदा सादरीकरण ८ डिसेंबरपासून सुरू होणार असून २२ डिसेंबर रोजी निविदा उघडण्यात येणार आहे. हा प्रकल्प मेक इन इंडिया धोरणानुसार राबवला जाणार आहे.करारानंतर दोन वर्षांत पहिला प्रोटोटाइप रॅक मुंबईत दाखल होणार आहे.

# रायगडात गिधाडांच्या संख्येत वाढ

**सुयोग आंग्रे**

**। रायगड ।**

### गिधाड संवर्धनाचा सिस्केपचा जागर



अन्न साखळीतील महत्वाचा घटक असणाऱ्या 'गिधाड' पक्ष्यांची घट पर्यावरणाच्या समतोलाला बाधक ठरणारी आहे. रायगड जिल्ह्यातील जंगलांमधील कडेकपाऱ्यांमध्ये आपली कॉलनी उभारणाऱ्या गिधाडांची संख्या सिमेंटची जंगले आणि खाद्य पदार्थांमुळे घटल्याचे विदारक चित्र समोर आले होते. गिधाड संरक्षण संवर्धनाचा नारा देत सिस्केपने पुढाकार घेतला आहे. सिस्केपच्या प्रयत्नांमुळे गिधाडांचे पंख कॉलनी उभारण्यासाठी रायगडात झेपावल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. सिस्केप संस्थेने महाडसह माणगाव, म्हसळा व श्रीवर्धन तालुक्यात गिधाड संवर्धनाबाबत जनजागृती केल्याने गिधाडांची संख्या जवळपास ४०० च्या आसपास झाली आहे. सप्टेंबर महिन्यातील पान ५ वर

> **सिस्केप संस्थेकडून २८ वर्षे सातत्याने झालेले प्रयत्न आणि सातत्याने शास्त्रीय पद्धतीने केलेल्या संवर्धन पद्धतीमुळे गिधाडांच्या संख्येत वाढ झाली आहे. गिधाड जनजागृती दिनानिमित्ताने संस्थेकडून गिधाडांची घरटे करण्याची, नैसर्गिक स्थाने निश्चित करणे आणि नैसर्गिक अधिवास संरक्षित करून नैसर्गिक पद्धतीने गिधाडांचे रक्षण करण्याचे काम सुरू आहे. आठ देवरायांमध्ये अशा पद्धतीचे वृक्ष लागवड आणि संगोपन करून पुन्हा ती देवराई पूर्वस्थितीत आणण्याचे यशस्वी प्रयत्न केले गेले आहेत.**
> **–प्रेमसागर मेस्त्री, अध्यक्ष, सिस्केप**

### क्राईम

## नेपाळमध्ये २० आंदोलनकर्त्यांचा मृत्यू

**। काठमांडू । वृत्तसंस्था ।**

नेपाळमध्ये सोशल मीडियावरील बंदीवरून आक्रमक झालेल्या तरूणांनी सोमवारी (दि.८) सरकारविरोधात आंदोलन सुरु केले आहे. त्यामुळे नेपाळच्या काठमांडूमध्ये संचारबंदी लागू करण्यात आली आहे. नेपाळमध्ये फेसबुक, ट्विटरसह २६ सोशल मीडियावर बंदी घालण्यात आली असल्याने तेथील तरूणांनी नेपाळच्या संसद परिसरात जाऊन आंदोलन केले. पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या आणि पाण्याची फवारणीही केली. यामध्ये २० जणांचा मृत्यू झाल्याची माहितीही समोर येत आहे.

## बाबू खानविलकरांसह चौघांविरोधात गुन्हा दाखल

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

महाड विधानसभा निवडणूकीवेळी बहुचर्चित ठरलेले निजामपूर भागातील कार्यकर्ते बाबू खानविलकर आणि त्यांच्या मुलासह अज्ञात चौघांविरोधात पोलादपूर पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटी गुन्हा दाखल झाला आहे. अशी माहिती सहायक पोलीस निरिक्षक आनंद रावडे यांनी दिली आहे. याप्रकरणी अद्याप बेपत्ता असलेल्या अपहताची पत्नी कविता रुपेश मोरे (२१) यांनी तक्रार दाखल केली होती.

कविता मोरे हिचे पती रुपेश मोरे व त्यांच्या सोबत असलेले सोनाजी लोकरे व अरविंद काते हे पोलादपूर वनउपज तपासणी नाक्यालगतच्या चहाच्या टपरीवर चहा पित होते. त्यावेळी आरोपी सागर खानविलकर, बाबू खानविलकर आणि अन्य अज्ञात व्यक्तींनी त्यांना जिवे मारण्याच्या उद्देशाने जबरदस्तीने गाडीमध्ये टाकले. यावेळी तुम्ही आमची गाडी पकडुन दिली काय, आता आमचे पैसे दे, असे बोलुन त्यांना भाले येथील एका वाड्यावर नेऊन मारहाण केली. मारहाणीमध्ये अरविंद काते यांच्या डाव्या हाताला गंभीर दुखापत झाली. त्यावेळी रुपेश मोरे हे तेथुन पळुन जात असताना त्याला पकडायला सागरचे सहकारी मागे लागले. त्यानंतर रूपेश मोरे हे अद्याप घरी परतलेले नाहीत. पान ५ वर

## महाडमध्ये महिला कामगाराचा विनयभंग

**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

महाड तालुक्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. औद्योगिक वसाहतीतील एका कंपनीत कार्यरत असलेल्या ५० वर्षीय व्यवस्थापकाने आपल्या २५ वर्षीय महिला कामगाराला केबिन व नंतर घरी बोलावून विनयभंग करत जबरदस्ती मिठी मारत अश्लील वर्तन केल्याची तक्रार समोर आली आहे. या प्रकरणामुळे महाड तालुका हादरून गेला असून जिल्हाभरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महाड एमआयडीसी परिसरातील ॲस्ट्रायीड लाईफ सायन्स कंपनीत पीडित महिला कर्मचारी काम करते. काही दिवसांपूर्वी कंपनीचे व्यवस्थापकांनी तिला कामाच्या निमित्ताने आपल्या केबिनमध्ये बोलावले होते. परंतु, ती पोहोचल्यावर व्यवस्थापक केबिनमध्ये नव्हते. त्यानंतर व्यवस्थापकाने थेट चवदार तळ्याजवळील आपल्या राहत्या घरी बोलावून घेतले. कंपनीच्या कामाबाबत चर्चा असल्याचे सांगत पीडित महिला तातडीने आरोपीच्या महाड शहरातील घरी गेली. त्यावेळी आरोपी व्यवस्थापकाने तिच्या मनाविरुद्ध तिच्या पोटाला, कंबरेला हात लावून मिठी मारली. महिलेने स्वतःचा पान ५ वर

## विसर्जन मिरवणुकीत चोरट्यांचा सुळसुळाट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लालबागचा राजा विसर्जन मिरवणुकीत यंदाही लाखो भाविकांची प्रचंड गर्दी उसळली होती. लालबाग ते गिरगाव चौपाटी असा सुमारे ३२ ते ३५ तासांचा प्रवास करत भाविकांनी आपल्या लाडक्या बाप्पाचे दर्शन घेत निरोप दिला. मात्र, भक्तीच्या उत्साहात गुन्हेगारांनी गर्दीचा फायदा घेत अनेक भक्तांच्या मोबाईल आणि इतर ऐवजावर डल्ला मारला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यावर्षी मिरवणुकीदरम्यान मोबाईल चोरीच्या १०० हून अधिक घटना घडल्या आहेत. काळाचौकी पोलीस ठाण्याबाहेर तक्रार नोंदवण्यासाठी भाविकांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या.

### प्रलंबित प्रकल्पाला मंजुरी | उपनगरीय प्रवाशांचा वेळ वाचणार

# पनवेल-बोरिवली-वसई कॉरिडॉर लवकरच

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

लाखो प्रवाशांना दिलासा देणारा पनवेल-बोरिवली-वसई लोकल ट्रेन कॉरिडॉर आता प्रत्यक्षात येणार आहे. मुंबई आणि उपनगरातील प्रवाशांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. मिळाल्या माहितीनुसार, मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत या दीर्घकाळ प्रलंबित प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मुंबई शहरी वाहतूक प्रकल्प अंतर्गत विकसित केला जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. ६९.२३ किमी लांबीच्या या पनवेल-बोरिवली-वसई उपनगरीय लोकल रेल्वे कॉरिडॉरच्या कामासाठी एकूण १२,७१० कोटींचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे.

**69.23 किमी लांबीचा कॉरिडॉर, 12,710 कोटींचा खर्च अपेक्षित**



पनवेलपासून सुरू होणारा हा प्रकल्प वसईमार्गे बोरिवली आणि विरारपर्यंत पोहोचणार आहे. या मार्गावर एकूण १९ स्थानके बांधली जाणार आहेत. ज्यामध्ये भिवंडी रोड, नवी डोंबिवली, कोपर, तळोजा पांचंद, कळंबोली आणि बोरिवली अशी स्थानके असणार आहेत. या प्रकल्पामुळे मुंबईकरांना मोठा दिलासा मिळणार आहे. आतापर्यंत नवी मुंबई (पनवेल) ते बोरिवली किंवा वसई प्रवास करणाऱ्या प्रवाशांना कुर्ला किंवा वडाळा येथे लोकल ट्रेन बदलाव्या लागत होत्या. नवीन कॉरिडॉरमुळे ही समस्या दूर होईल आणि थेट कनेक्टिव्हिटी मिळेल. यामुळे दररोज पश्चिम मुंबईला कामासाठी जाणाऱ्या आणि येणाऱ्या प्रवाशांचा वेळ वाचणार आहे.

### पलावा सिटीला मोठा फायदा

**लोकल ट्रेनच्या या नवीन कॉरिडॉरमुळे, लूम पॉवर उद्योगासाठी प्रसिद्ध असलेल्या भिवंडी शहराला आता नवी मुंबई आणि पश्चिम मुंबईशी थेट कनेक्टिव्हिटी मिळेल. यामुळे भिवंडीच्या विकासाला एक नवीन दिशा मिळेल. शिळफाटा रोडवर असलेल्या पलावा, रुणवाल सिटी सारख्या मोठ्या निवासी प्रकल्पांमधील रहिवाशांनाही या रेल्वे मार्गाचा दिलासा मिळेल. त्यांना एका बाजूला बोरिवली आणि वसईला थेट प्रवेश मिळेल तर दुसऱ्या बाजूला पनवेलला सहज प्रवेश मिळणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर, मुंबईच्या उपनगरीय रेल्वे सेवेत मोठा बदल दिसून येईल. अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, या कॉरिडॉरच्या सुरुवातीमुळे मध्य आणि हार्बर मार्गावरील प्रवाशांचा ताण कमी होईल. यामुळे सध्याची गर्दी कमी होईल आणि प्रवाशांचा प्रवास पूर्वीपेक्षा जलद आणि आरामदायी होईल.**

# व्यापाऱ्याची फसवणूक करणारा गजाआड



● रेवदंडा पोलिसांची यशस्वी कामगिरी

● सीसीटीव्ही फुटेजमुळे तपासाला वेग

| रेवदंडा | प्रतिनिधी |

रेवदंडा येथील इलेक्ट्रॉनिक्स दुकानात विक्रेत्याला, ऑन लाईन पेमेंट दिले, परंतू ऑनलाईन पेमेंटला देयक रक्कमेचा खोट्या मेसेजने गंडवून ऑनलाईन पेमेंटची रक्कम मिळाली की नाही हे पहाताना ग्राहकांनी त्वरीत तेथून पोबारा केला व भरदिवसा इलेक्ट्रॉनिक्स वस्तू विक्रेत्याची आर्थिक फसवणूक करणाऱ्या आरोपीला रेवदंडा पोलिसांनी शिताफीने तपास करून अटक केली.

रेवदंडा बाजारपेठेत २ सप्टेंबर रोजी दुपारी २.४५ च्या सुमारास राहूल राजेंद्र जैन यांच्या मालकीच्या राहूल इलेक्ट्रॉनिक्स या दुकानात एका ग्राहकाने स्पिकर सेट ७५००/- रूपये किमतीमध्ये खरेदी केला. यावेळी खरेदी केलेल्या वस्तूची रक्कम देण्यासाठी प्रथम भ्रमणध्वनली स्कॅनरवर खरेदी रक्कम देण्याचा बहाणा केला, परंतू तेथे नेटवर्क मिळत नसल्याची तक्रार करून त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स दुकानातील संगिता राजेंद जैन यांचेकडे भ्रमणध्वनी क्रमांक मागितला. त्यानुसार त्यांनी भ्रमणध्वनीने ऑनलाईन गुगल पेव्दारे खरेदीची रक्कम पाठविली, त्या पाठविलेल्या रकमेचा मेसेज सुध्दा त्यांनी दुकानातील संगिता जैन यांना दाखविला, दरम्यान ग्राहकांनी पाठविलेली रक्कम अंकाउंटमध्ये जमा झाली नसल्याचे त्यांचे निदर्शनास आले. दरम्यान आर्थिक फसवणूक करणाऱ्या अज्ञाताने तेथून त्वरेने बाहेर ठेवलेल्या मोटर सायकलने पोबारा केला.

दरम्यान मोटरसायकलस्वार रेवदंडा मोठे बंदरमार्गे गेला असल्याने राजेंद्र जैन यांनी पाठलाग केला, परंतु त्यांचा पाठलाग यशस्वी झाला नाही. दरम्यान मोटरसायकलने पलायन केलेल्या अज्ञात चोरट्याचे छायाचित्र सिसिटिव्हीमध्ये मिळाले होते. त्यानुसार पलायन केलेल्या मोटर सायकलच्या दोन्ही नंबर प्लेट नसल्याचे सिसिटिव्हीमध्ये दिसले होते. या फसवणूक करणाऱ्या अज्ञाताविरोधात दुकानदार संगिता राजेंद्र जैन यांनी रेवदंडा पोलीस ठाणेयेथे आर्थिकफसवणूकीबाबत तक्रार दिली होती.

या सीसीटीव्हीत मिळालेल्या फोटोच्या आधारे रेवदंडा पोलिसांनी त्वरीत तपास सुरू केला, यावेळी रोहा तालुक्यातील खैराळे येथील सचिन राजू सांळुखे यांस पोलिसांनी संशयाने ताब्यात घेतले व तपास केला. त्याच्यावर रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जाहीर सूचना

मकरंद सुरेश नारवेकर ("मालक") यांचे जमिनीवरील हक्क, मालकी व स्वारस्य, तपासण्यासाठी सूचना देत आहोत: (i) गट क्र. १९५, क्षेत्रफळ १ हेक्टर ५ आर म्हणजे १०,५०० चौरस मीटर, (ii) गट क्र. १९९/१ च्या भागातील १०.५ आर म्हणजे १०५० चौरस मीटर मोजमाप असलेले भूखंड, ज्याची एकूण मोजमाप १ हेक्टर ११.४५ आर म्हणजे ११,१४५ चौरस मीटर आहे ही जमीन गाव सोगाव तालुका अलीबाग, जिल्हा रायगड येथे स्थित आहे, यापुढे "मालमत्ता" म्हणून उल्लेख केलेली असून खालील अनुसूचीत अधिक तपशीलवार वर्णन केलेली आहे.

कोणतीही व्यक्ती / संस्था / घटक यासह कोणतेही बँक किंवा वित्तीय संस्थेला वरील मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागावर किंवा त्या मालमत्तेवरील कोणत्याही बांधकामावर कोणताही हक्क, हिस्सा, हक्क, शीर्षक, स्वारस्य किंवा कोणत्याही प्रकारचा दावा, कायद्यानुसार किंवा अन्यथा — विकसन हक्क, एफएसआय / टीडीआर, वारसा, देवाणघेवाण, हिस्सा, संपादन, वाटणी, हस्तांतरण, करार, विक्री, सुपुर्दगी, मृत्युपत्र, भार, गहाण, तारण, भाड्याने देणे, उपभाडेकरार, भाडेपट्टा, गहाणहक्क, वापरहक्क, प्रलंबित दावा, परवाना, प्रतिज्ञा, हमी, देणगी, विश्वस्तव्यवस्था, देखभाल, ताबा, स्थगिती, कर्ज, आगाऊ रक्कम, जप्ती, अडसर, अटी-शर्ती, विश्वासहक्क, हक्क दावा, विक्रीपूर्वीचा हक्क, विक्रीकरार किंवा अन्य कोणत्याही प्रकारे, तसेच कोणतीही प्रलंबित न्यायालयीन कारवाई, भागीदारी, संयुक्त व्यवसाय, कौटुंबिक व्यवस्था / तह किंवा कोणत्याही न्यायालय अथवा अधिकरणाने दिलेला आदेश / निकाल / डिक्री यांच्या आधारे जर कोणताही दावा / हिस्सा असेल, तर अशा व्यक्तींनी कृपया ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर, त्यांच्या दाव्याची साक्ष देणाऱ्या दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रतीसह लेखी स्वरूपात त्यांचा हक्क / दावा कळवावा.

जर ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कोणताही दावा किंवा त्यास पूरक पुराव्यांसह लेखी अर्ज प्राप्त झाला नाही, तर असे गृहित धरण्यात येईल की सदर मालमत्तेवर मालकास पूर्ण व निर्विवाद हक्क आहे, आणि सदर मालमत्तेसंबंधी कोणताही विरोधी हक्क, मालकी, हितसंबंध किंवा कोणत्याही प्रकारचा दावा अस्तित्वात नाही, तसेच ती मालमत्ता कोणत्याही अडचणीपासून / भारांपासून मुक्त आहे. त्यानुसार, आमच्या ग्राहकास सदर मालमत्तेबाबत मालकाशी व्यवहार पूर्ण करण्यास संपूर्ण स्वातंत्र्य असेल आणि अशा कोणत्याही व्यक्तीचा दावा, जर असेलच, तर त्याला नकार दिलेला अथवा त्यागलेला मानण्यात येईल आणि तो आमच्या ग्राहकांवर बंधनकारक राहणार नाही.

**परिशिष्ट**
**(मालमत्तेचे वर्णन):**

खालीलप्रमाणे सर्व जमिनीचे तुकडे व भूभाग: (१) गट क्रमांक १९५, क्षेत्रफळ १ हेक्टर ५ आर, म्हणजेच १०,५०० चौ. मीटर (२) गट क्रमांक १९९/१ पैकी क्षेत्रफळ १०.५ आर, म्हणजेच १,०५० चौ. मीटर, ही गट क्रमांक १९९/१ एकूण क्षेत्रफळ १ हेक्टर ११.४५ आर म्हणजेच ११,१४५ चौ. मीटर या जमिनीचा एक भाग आहे.वरील मालमत्ता गाव सोगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थित आहे.

आज ९ सप्टेंबर २०२५ रोजी

**महेरनोश जे. हुमरानवाला**
**पार्टनर**

TATVALEGAL

**तत्व लीगल मुंबई**
वकील आणि सॉलिसिटर पहिला मजला,
जन्मभूमी भवन, जन्मभूमी मार्गफोर्ट,
मुंबई - ४००००१

## Change in Name

I, kasturi pradip kavale Residing at 315, kavale Ali, Nr. Nageshwar mandir, at-post, Awas, Taluka Alibag, Dist-Raigad- 402208. Declare and affirm as under my old name was kasturi Pradip Kawale. I have changed my name to kasturi Pradip Kavale for all Future Purposes. Gazette Registration No:- M-23292616

## Change in Name

I, Sayali Ashish Kadam Residing at 23/1, Premanand Society, near Shankar buliding, balajinagar, Pune-satara Road, Dhanakwadi Pune-411043. Declare and affirm as under my old name was Jyosna Prakash Kshirsagar. I have changed my name to Sayali Ashish Kadam for all future purposes. Gazette Registration No.-020254 dated 19 June 2008

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक श्री. उत्तम परशुराम तिखंडे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौज-कडाव, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड येथील जमिन मिळकत.**

| सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ३३ | २ | ०.९२.३० पैकी ०.३०.७६ | १०.६९ |

सदर जमीन मिळकत ही वरील मालकाची निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ०९/०९/२०२५

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. अशोक रामदास ताम्हाणे**
पत्ता. मु. सावळे, पो. मांडवणे,
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो. ९०२२३७८४५६

## जाहीर सूचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्रीमती सविता घनश्याम गाजरे, समृद्धी घनश्याम गाजरे रा. मुंबई यांच्याकडून कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**बिनशेती जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे वंजारवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

वरील बिनशेत जमीन मिळकत सर्व्हे नं. ८/२/ब/२ एकूण ०.४.४३ गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांनी आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सूचना आहे.

दिनांक : ०९/०९/२०२५

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता : मु.पो. कडाव, ता. कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे वडवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक रंभाजी सखाराम मराडे वय-सज्ञान, रा. वडवली, पो. कडाव, ता. कर्जत, जि. रायगड- ४१०२०१ यांची खालील वर्णन केलेली जमीन मिळकत तिचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| वडवली | ३९/४ | लागवडी योग्य ०.३६.०० हे.आर.पॉ.<br>पोटखराबा क्षेत्र ०.०१.०० हे.आर.पॉ.<br>एकूण क्षेत्रफळ ०.३७.०० हे.आर.पॉ. | ४.३२ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक रंभाजी सखाराम मराडे यांनी आमचे अशिलास सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दिनांक : ०९/०९/२०२५

**ॲड. भारत अंकुश सावंत**
(बी.कॉम.एल.एल.बी.)
पत्ता - मु.पो. मोठे वेणगाव
ता. कर्जत, जि. रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सांगिता वासुदेव ठाकूर रा. साळिंदे मु. पांडूर पो.कासू यांचे मालकीची जमिन यतिश अनिल पाटील रा. सप्तश्रृंगी बिल्डिंग, मॉ. शेलावाली कॉम्पलेक्स, जुना आगरा रोड, भिवंडी, काल्हेर, ठाणे, महाराष्ट्र ४२१३०२ स्वतः कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

| गाव | मालक | गट क्रमांक/ सर्व्हे नं. | एकूण क्षेत्र हे.आर | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| साळिंदे | सांगिता वासुदेव ठाकुर यांच्या हिशाची क्षेत्र ०.१६.०० हे.आर. आकार ०.२९ | ५७ | ३.९३.०० | ४.३७ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती पैकी अविभक्त हिस्सा एवढी मिळकत ही मी स्वतः कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेत आहे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ (सात) दिवसांच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवुन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वतः मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
दि.९-०९-२०२५

सही/-
**यतिश अनिल पाटील**
रा. सप्तश्रृंगी बिल्डिंग, मॉ. शेलावाली कॉम्प्लेक्स
जुना आगरा रोड, भिवंडी,
काल्हेर, ठाणे, महाराष्ट्र ४२१३०२
मो. ८७९६३७४९७०

## 2nd Call RFX (E-TENDER) NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids from reputed and registered contractors of appropriate class with MSETCL. Please visit Mahatransco website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| RFx (Tender) No | Name of work | Estimated cost in Rs. | EMD (Rs.) | Tender fee including. GST (Rs) |
|---|---|---|---|---|
| **7000037423** | 2nd Call for Annual Maintenance Contract for Breakdown, Emergency and planned outage on 500kV Chandrapur-Padghe Bi-Pole HVDC line from Loc No.1364 to 1970 & 33 kV Anjur-Padghe Electrode line from Loc. No. 1A1 to Loc No. 111 under the jurisdiction of Rajgurunagar Division for the Year 2025-26. | 1,00,00,000/- | 1,00,000/- | 590/- |

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of download of RFx (e tender) documents | From- 09.09.2025 from 0000 hrs to 19.09.2025 up to 10.00 hrs. |
| 2 | Date of submission of RFx (e tender) | 19.09.2025 up to 10.00 hrs. |
| 3 | Date of technical bid opening | 19.09.2025 up to 11.00 hrs. (If possible) |
| 4 | Date of commercial bid opening | 19.09.2025 up to 13.00 hrs. (If possible) |

**Contact Person: The Executive Engineer (ADM),**
HVDC RS (O&M) Circle, Padgha Mob. No: 9011021483
For further details visit our website:
**https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**HVDC RS O&M Circle, Padghe**

## जाहीर नोटीस

**कार्यकारी दंडाधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, खालापुर यांचे न्यायालयात**

अर्ज क्रमांक :- ३४२/२०२४

श्री. बाळकृष्ण महादु खांडेकर, — अर्जदार
रा.गागोदे खुर्द, ता.पेण, जि.रायगड

विरुद्ध

जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, — सामनेवाले
नगर पंचायत खालापुर

सर्व लोकांस या जाहिर नाटिसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै. नर्मदा नरेंद्र लोते यांचा दिनांक २५/०४/१९७३ रोजी मौजे खालापुर, ता. खालापुर येथे घरीच आजारामुळे मयत झाले आहेत. ते मौजे खालापुर, ता.खालापुर, जि.रायगड येथे राहत होते परंतू त्यांच्या मृत्यूची नोंद नगरपंचायत खालापुर यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने, अर्जदार यांनी कै. नर्मदा नरेंद्र लोते यांच्या मृत्यूनोंदीचे आदेश जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, नगरपंचायत खालापुर यांना करावेत त्यासाठी या मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. याबाबत कोणत्याही व्यक्तीची हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत मे. न्यायालय खालापूर येथे हजर राहून हरकत घ्यावयाची आहे.

याद्वारे असे जाहिर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे. न्यायालय अर्जदार यांचा अर्ज मंजूर करेल व जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, नगरपंचायत खालापुर यांना कै. नर्मदा नरेंद्र लोते यांचा मृत्यूदाखला देणेबाबत आदेश करील यांची दखल घ्यावी.

आज दिनांक ०४/०१/२०२५ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्यासह दिली.

सही
**(सुधाकर राठोड)**
कार्यकारी दंडाधिकारी तथा
निवासी नायब तहसिलदार, खालापूर

## जाहीर हरकत

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मौजे | गट क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | कुरूळ ता. अलिबाग | ५०/८ | ०-२१-०० | ०.३१ |
| २ | कुरूळ ता. अलिबाग | ५०/१० | ०-८२-०० | १.१९ |

पैकी श्री. हेमंत मधुकर हजारे यांच्या हिश्श्याची ००-३४-०० हे.आर. एवढी मिळकत आमचे अशिल श्री. भरत अमृतलाल तन्ना, मु. प्रितवन, एम.आय. डी.सी. समोर, नवअलिबाग, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी दिनांक ०२/०७/२०१६ रोजीच्या साठेकराराने रू. २०,००,०००/- या किंमतीस विकत देण्याचे ठरवून रू. ५,००,०००/- श्री. हेमंत मधुकर हजारे यांनी आमचे अशिलांकडून घेऊन तसा साठेकरार लिहून दिला आहे व त्यांनी व्यवहार करण्यास टाळाटाळ केल्यामुळे आमचे अशिलांनी १) श्री. हेमंत मधुकर हजारे, २) विजय गणेश आठवले, ३) महेश शरदचंद्र कर्णिक यांच्याविरूद्ध अलिबाग येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात स्पे.मु.नं. ३१/२०२२ चा दावा दाखल केलेला आहे. तो दावा अजूनही प्रलंबित आहे.

असे असतानाही वरील विद्यमान मालक आमचे अशिलांना अंधारात ठेवून वरील मिळकत तिऱ्हाईतासोबत परस्पर विक्री व्यवहार करण्याची माहिती आमचे अशिलांस मिळाली आहे. तशी जाहीर नोटीस दिनांक २३/०८/२०२५ रोजीच्या दैनिक कृषीवल या वृत्तपत्रात ॲड. गणेश जी. पाटील यांनी प्रसिद्ध केली होती त्यास आमचे अशिलांनी लेखी हरकत दिली आहे.

तरी वरील मिळकती संदर्भात कुणीही कसलाही व्यवहार अगर विक्री, साठेकरार, बयाणा, करार वगैरे कोणताही व्यवहार करू नये. जर असा कोणताही व्यवहार केल्यास तो व्यवहार बेकायदेशीर ठरत असून आमचे अशिल संबंधी सर्वांविरूद्ध दिवाणी व फौजदारी स्वरूपाच्या कोर्ट कारवाया करतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०८/०९/२०२५

**ॲड. महेश एस. म्हात्रे**
ऑफिस नं. १, शिवराम भास्कर बिल्डींग
बाजारपेठ रोड, केळकर नाका, अलिबाग
मो.नं. - ९२२६८४७०७७

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.२१३/२०२५

**मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो.,माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. निता रामजी मर्चन्डे
वय : ६० वर्षे, धंदा गृहिणी, — अर्जदार
रा.मु. पो. देगांव,
ता. माणगांव, जि. रायगड

विरूद्ध

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत देगांव
ता.माणगांव, जि.रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड. — सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. निता रामजी मर्चन्डे यांची मुलगी श्रीम.चांदणी रामजी मर्चन्डे- लग्नापूर्वीचे नाव व श्रीम.सरिता संतोष हाटे-लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे देगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १०/०६/१९८८ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. २१/०७/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची मुलगी श्रीम. चांदणी रामजी मर्चन्डे-लग्नापूर्वीचे नाव व श्रीम.सरिता संतोष हाटे-लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे देगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १०/०६/१९८८ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम.निता रामजी मर्चन्डे यांची मुलगी श्रीम.चांदणी रामजी मर्चन्डे लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. सरिता संतोष हाटे-लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे देगांव, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. १०/०६/१९८८ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव — **शिक्का** — सही /-
ता. ०८/०९/२०२५ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.२०६/२०२५

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री.खलील हसन हर्णेकर
वय : ६५ वर्षे, धंदा : शेती, — अर्जदार
रा.मु.पो.मांजरवणे,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मांजरवणे,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. खलील हसन हर्णेकर यांचा जन्म मौजे मांजरवणे, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०१/०६/१९६० रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. २४/०७/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार त्यांचा जन्म मौजे मांजरवणे, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०१/०६/१९६० रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. खलील हसन हर्णेकर यांचा जन्म मौजे मांजरवणे, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. ०१/०६/१९६० रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव — **शिक्का** — सही /-
ता. ०८/०९/२०२५ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, ऑगस्ट २६, २०२५/भाद्रपद ४, शके १९४७

**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक २६ ऑगस्ट २०२५.**
**अधिसूचना**

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम**

क्रमांक खाक्षेस-२०२४/प्र.क्र. १२३ (भाग-१)/रस्ते-८,- ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) च्या कलम १५ (२) नुसार प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन अधिसूचना क्र. खाक्षेस-२०२४/प्र.क्र.१२३/रस्ते-८, दिनांक १३ मार्च, २०२४ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :-

उक्त अधिसूचनेला जोडलेली अनुसूची :-

(iv) पृष्ठ क्र. ३९ वरील अ.क्र. ५९ च्या नोंदीनंतर, खालील नोंदी समाविष्ट केल्या जातील.

| | | | |
|---|---|---|---|
| | दांडा | ११३ | ०.०१९९ |
| ५९ अ | दांडा | १०२ | ०.००८ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**सचिन चिवटे,**
शासनाचे उपसचिव

## महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, ऑगस्ट २६, २०२५/भाद्रपद ४, शके १९४७

PUBLIC WORKS DEPARTMENT
Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032, Dated the 26th August, 2025.
NOTIFICATION

MAHARASHTRA HIGHWAYS ACT.

No.PPP-2024/C.R.123(Part-1)/Road-8.-In exercise of the powers conferred by sub-section (2) of section 15 of the Maharashtra Highways Act (LV of 1955), the Government of Maharashtra hereby amends the Government Notification, Public Works Department, No.PPP-2024/C.R. 123/ Road-8, published in the Maharashtra Government Gazette, Extraordinary No. 140, dated the 13 March 2024, on pages 1- 84 as follows:-

In the Schedule appended to the said Notification,-

(iv) On page 42, after entry at serial No.59, the following entries shall be inserted, namely:-

| | | | |
|---|---|---|---|
| | 0.0199 | DANDA | 113 |
| 59 A | 0.0008 | DANDA | 102 |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**SACHIN CHIVATE,**
Deputy Secretary to Government.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बेलवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**परिशिष्ठ**
**मौजे बेलवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| विद्यमान मालकाचे नाव | गट क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| सत्य नारायण सोमाणी, प्रेम सोमाणी, | १५४/२ | ०-१७-९०<br>पो.ख. ०-०२-१०<br>एकूण ०-२०-०० | ४.०२ |
| सत्य नारायण सोमाणी, शिप्रा सोमाणी, | १५४/३ | ०-२१-१०<br>पो.ख. ०-०२-५०<br>एकूण ०-२३-६० | ४.७४ |
| प्रेम सोमाणी, सत्य नारायण सोमाणी, | १५५ | ०-२०-५०<br>पो.ख. ०-०१-८०<br>एकूण ०-२२-३० | ४.८७ |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ९/९/२०२५

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. २१३/२०२५

**मे.तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगाव यांचे न्यायालयात**

श्रीम. वैशाली विजय लकेश्री
वय ५० वर्षे, धंदा गृहिणी, — अर्जदार
रा. वडगाव कोंड,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत वडगांव
२. गटविकास अधिकारी सो.
पंचायत समिती माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड. — सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्रीम. वैशाली विजय लकेश्री यांचे सासरे कै. तुकाराम भिवा लकेश्री हे दि. ०७/०१/१९८५ रोजी मौजे वडगांव कोंड, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले आहेत. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १३/०८/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे सासरे कै. तुकाराम भिवा लकेश्री हे दि. ०७/०१/१९८५ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. वैशाली विजय लकेश्री यांचे सासरे कै. तुकाराम भिवा लकेश्री हे दि. ०७/०१/१९८५ रोजी मौजे वडगांव कोंड, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

ठिकाण :- माणगांव — **शिक्का** — सही
ता. : ०८/०९/२०२५ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## निवडक



### नवीन पनवेलचे रस्ते खड्ड्यात

**नवीन पनवेल :** नवीन पनवेल शहरातील रस्ते खड्ड्यात गेल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. ऐन गणेशोत्सवातदेखील नागरिकांना या खड्ड्यातूनच प्रवास करावा लागला. त्यामुळे ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.नवीन पनवेल शहरातील रस्ते बनवून सहा महिनेदेखील उलटून गेले नाहीत, तेच या रस्त्यांवर मोठ मोठ्या प्रमाणात खड्डे पडण्यास सुरुवात झाली. गणेशोत्सवापूर्वी खड्डे बुजवण्यात येतील, असे सांगण्यात आले होते. मात्र, गणेशोत्सवाच्या काळात मातीच्या सहाय्याने येथील खड्डे भरण्याचा पराक्रम सुरू होता. त्यामुळे पुन्हा त्या खड्ड्यांवर खड्डे पडले. सेक्टर १, २, ३, ४ परिसर तसेच नवीन पनवेल द्वारका स्वीट समोरदेखील मोठा खड्डा पडलेला आहे. नवीन पनवेल ते पनवेलला जोडणाऱ्या ब्रिजवरदेखील खड्डे पडल्याने ठेकेदाराच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. गणेशोत्सव काळातदेखील नागरिकांना तसेच गणेशभक्तांना याच खड्डे पडलेल्या रस्त्यावरून प्रवास करावा लागत होता.



### खड्डे बुजविण्यासाठी पोलीस रस्त्यावर

**पनवेल :** ऐन सणासुदीच्या दिवसांमध्ये पनवेलजवळील पळस्पे परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती. याला उपाय म्हणून पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने कर्तव्यावर असताना त्या परिसरातील रस्त्याला पडलेले खड्डे बुजवून घेतल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली आहे. सध्याच्या सणासुदीच्या दिवसांमुळे पनवेल शहर पोलीस ठाण्यातील पोलिसांची विविध पथके हे पळस्पे फाटा राहुल हॉटेल परिसर त्याचप्रमाणे मुंबई-पुणे महामार्गावर कर्तव्य बजाविण्यासाठी कार्यरत आहेत. यावेळी त्यांना रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी होत असल्याचे लक्षात आले. यासंदर्भात त्यांनी वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः रस्त्यावर उतरुन हे खड्डे बुजवून घेण्यास सुरूवात केली. त्याचा फायदा येथून ये-जा करणाऱ्यांना वाहन मालकांना झाला व मोठ्या प्रमाणात होणारी वाहतूक कोंडी ही आता सुरळीत होताना दिसत आहे. याबद्दल चाकरमान्यांनी पनवेल शहर पोलिसांचे आभार मानले आहेत.



### रस्त्याला गतिरोधक बसविण्याची मागणी

**कोलाड :** मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गांवरील गोवे, पुई, पुगाव, मुठवली, सुकेली खिंड या ठिकाणी अपघात हे कुठे ना कुठे तरी घडतच आहेत. यामुळे प्रवासाच्या दृष्टीने हा महामार्ग अत्यंत धोकादायक ठरत असून, वाहन चालकांच्या वेगाची नशा दिवसेंदिवस अपघाताचे मुख्य कारण ठरत आहे. यामुळे या ठिकाणी रस्त्याला गतिरोधक बसविण्याची गरज निर्माण झाली. मुंबई-गोवा महामार्गावरील गोवे व पुई नाका येथे येण्या-जाण्यासाठी मार्ग बंद केला असून, गोवे येथील स्टॉपवरून कोलाडकडे जाण्यासाठी ५०० मीटर पुढे जाऊन कुंडलिका नदीच्या पुलाजवळून पलीकडे जावे लागत आहे, तर कोलाडकडून पुई कॉलनीकडे जाताना याच मार्गाचा उपयोग केला जातो. यामुळे भरधाव वेगात येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांमुळे या मार्गावरून प्रवास करणे धोकादायक ठरत आहे. मुंबई-गोवा महामार्गावरून नम्रता गार्डन पुगाव येथून मढाली, डोळवहाळ, रेवेचीवाडी, ऐनवहाळ, गरभट विठ्ठलवाडी, अशी दहा ते बारा गावांतील नागरिक याच मार्गांवरून ये-जा करीत असतात. या सर्वच ठिकाणी महामार्गाच्या चौपदरीकरणाचे दोन्ही बाजूचे काम पूर्ण झाले आहे. यामुळे या मार्गावरून येणारी वाहने मर्यादेपेक्षा वेगाने जात आहेत. ही वाहने अपघाताचे मुख्य कारण ठरत आहेत.



### अलिबाग-रेवदंडा रस्त्याची चाळण


**चौल :** अलिबाग तालुक्यातील अलिबाग-रेवदंडा या मुख्य रस्त्याची खड्ड्यांमुळे ठिकठिकाणी चाळण झाली असून, वाहनचालकांना वाहन चालविताना कसरत करावी लागत आहे. याकडे संबंधित विभागाचे सपशेल दुर्लक्ष झाल्याने रस्त्याची दुरवस्था झाल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. ऐन गणेशोत्सवातही चाकरमान्यांचे या खड्डेमय रस्त्यामुळे चांगलेच हाल झाले. पावसाच्या पाण्याने खड्डे भरल्यानंतर खड्डा आहे की रस्ता, हेसुद्धा व्यवस्थित दिसत नसल्यामुळे वाहन चालवताना चालकांना अडचणी निर्माण होत आहेत. खड्डे चुकविण्यासाठी वाहने अनेकदा विरुद्ध बाजूने चालवावी लागत असल्याने मध्येच वाहन आल्यास अपघाताचा धोका निर्माण होत आहे. अनेक वेळा यावरुन वाहनचालकांमध्ये आपापसात वादावादीचे प्रसंग उद्भवत आहेत. परंतु, याबाबत संबंधित विभागाला काहीच देणे-घेणे नसल्याचे समोर येत आहे. एमएसआयडीसीकडे रस्ता हस्तांतरीत केला असल्याचे सांगत सार्वजनिक बांधकाम विभाग सातत्याने रस्तादुरुस्तीची जबाबदारी झटकत असल्याचे दिसून येत आहे. त्यातच एमएसआयडीसीचे अधिकारी थातुरमातुर डागडुजी करुन वेळ मारुन नेत असल्याने रस्त्यावरील खड्डे अद्याप जैसे थे आहेत.

---

# ‘रानबाजिरे’च्या बॅकवॉटरची सुरक्षा रामभरोसे

**सुरक्षारक्षक केवळ वाहनांना प्रवेश देणे अथवा नाकारण्यासाठी**

**हौशींचे ड्रोनही घालताहेत धरण परिसरात घिरट्या**





**शैलेश पालकर**
**| पोलादपूर |**

तालुक्यातील पोलादपूर शहरालगतच्या रानबाजिरे गावात सावित्री नदीवर बांधण्यात आलेल्या धरणाच्या बॅकवॉटरची सुरक्षा रामभरोसे असून पोलादपूर ते महाबळेश्वर वाई-सुरूर राज्यमार्ग क्र.७४ लगत सुमारे अर्धा कि.मी. अंतराला २४ मिलीयन क्युसेस बॅकवॉटर अगदी जवळून स्पर्श करीत असताना, या ठिकाणी केवळ वाहनांना प्रवेश देण्यासाठी अथवा नाकारण्यासाठी तसेच टिलींग वॉटरबेसकडे असे दोन सुरक्षारक्षक तैनात ठेवण्यात आले आहेत. अलीकडेच हौशी सोशल मीडियाचे ड्रोन कॅमेरे धरण परिसरात मुक्तसंचार करीत शूटिंग करीत असल्याने बॅकवॉटरसह धरणाला असलेल्या संभाव्य धोक्याकडे महाड एमआयडीसीच्या अभियंत्यांकडून सपशेल दुर्लक्ष केले जात आहे.

पोलादपूर शहरानजीक रानबाजिरे धरणामध्ये गेल्या महिन्यात ५७.५५ मीटर पाण्याच्या साठ्याची पातळी नोंदविण्यात आली असून, सुमारे २४ मिलीयन क्युसेस बॅकवॉटर उपलब्ध आहे. या धरणाची बॅकवॉटरची बाजू पोलादपूर ते महाबळेश्वर वाई-सुरूर राज्यमार्ग क्र.७४ लगत सुमारे अर्धा कि.मी. अंतराला स्पर्श करीत असून, या रस्त्यावरून हे रानबाजिरे धरण समोरच दिसून येत आहे. पूरस्थिती तसेच स्वातंत्र्यदिनाच्या काळात रानबाजिरे धरण परिसरामध्ये हौशी सोशल मीडियाचे ड्रोन कॅमेरे धरण परिसरात मुक्तसंचार करीत शूटिंग करीत असल्याचे तसेच या कॅमेऱ्यांतील शूटिंगचे रिल्स व्हायरल झाल्याचे दिसून आले असल्याने या धरणाच्या असुरक्षिततेची एकप्रकारे रेकी झाल्याची शक्यता दिसून आली आहे.

> **कार्यवाही कधी?**
> रानबाजिरे धरणाचे तत्कालीन एक्झीक्युटीव्ह इंजिनियर वुईके आणि डेप्युटी इंजिनियर वाळके यांनी यासंदर्भात तातडीने पाहणी करून येथील फेन्सिंग आणि कंपाऊंड वॉलची उंची वाढविण्याच्या आवश्यकतेला मान्यता दर्शविली होती. परंतु, लवकरच सुरक्षिततेच्या प्रश्नावर ठोस उपाययोजना करण्यात येईल, अशी माहिती देऊनही प्रत्यक्षात कोणती कार्यवाही आजमितीस करण्यात आली नसल्याने रानबाजिरे येथील एमआयडीसीच्या धरणाची सुरक्षा रामभरोसे ठेवली आहे.

काही वर्षांपूर्वी महाड एमआयडीसीने सुरक्षारक्षकांची मागणी केल्यानंतर रायगड सुरक्षा मंडळ पनवेल या मंडळाने पुरविलेले सुरक्षारक्षक सध्या एमआयडीसी कॉलनी, ऑफिस आणि धरणाजवळ तीन शिफ्टमध्ये सहा सुरक्षारक्षक म्हणजेच एका शिफ्टमध्ये दोनच सुरक्षा रक्षक तैनात करण्यात येत आहेत. यापैकी एक सुरक्षारक्षक टिलींग वॉटर बेसजवळील गेटजवळ, तर दुसरा प्रवेशद्वाराजवळ उभा असतो. प्रवेशद्वाराजवळच्या सुरक्षारक्षकाला वाहने अडविणे आणि प्रवेश देण्याचे काम करण्यासाठी चौकी बांधून देण्यात आली आहे. मात्र, या चौकीचे ठिकाण प्रवेशद्वाराच्या आतील भागात असल्याने प्रवेशद्वारापासून सुमारे ५०० मीटर्स अंतरापर्यंत या धरणाच्या बॅकवॉटरचे सावित्री नदीचे पात्र पोलादपूर-वाई-सुरूर राज्यमार्ग क्र.७४ ला समांतर आहे. मात्र, त्याकडे या प्रवेशद्वारावरील चौकीमध्ये असलेल्या सुरक्षारक्षकाची नजरही पोहोचू शकत नाही.

पोलादपूरचे काही वर्षांपूर्वीचे पोलीस निरीक्षक विजय कदम यांनी येथे गस्तीदरम्यान हजेरीपत्रक तयार केले होते. मात्र, रात्रीच्या वेळी येथे असलेली सुरक्षा व्यवस्था कुचकामी असल्याचे पोलीस निरीक्षक कदम यांना संबंधितांना कळवावे लागले होते.

---

# एसटीचा प्रवाशांच्या जीवाशी खेळ

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**



- **धावत्या बसच्या चाकाचे बोल्ट सैल**
- **चालकाच्या प्रसंगावधानतेमुळे अपघात टळला**

श्रीवर्धन परिवहन आगाराकडून प्रवाशांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार अद्यापही सुरू आहे. सोमवारी सकाळी मुंबईहून श्रीवर्धनकडे सुटलेली बस वाशी खाडी पुलावर आली असता गाडीच्या चाकाचे बोल्ट सैल झाल्याने चाकातून आवाज येऊ लागल्यामुळे चालकाने गाडी बाजूला उभी केली. त्यावेळी असे लक्षात आले की, चाकाचे बोल्ट पूर्णपणे सैल झालेले आहेत. त्यामुळे आवाज येत आहे. त्यानंतर चालकाने चाकाचे बोल्ट टाईट करून घेतल्यानंतर बस पुढील प्रवासासाठी रवाना झाली. बोल्ट सैल असतानासुद्धा या गाडीने वाशीपर्यंतच प्रवास केल्याने श्रीवर्धन आगाराकडून प्रवाशांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

आगाराला लागलेले नादुरुस्त गाड्यांचे ग्रहण काही संपता संपत नाही. याअगोदरदेखील वडघर पांगलोली या गावाजवळ बसचे चाक निघून बाजूला गेले होते, तर मेंदडी येथे स्टार्टरमध्ये धूर येऊ लागल्याने प्रवाशांची एकच पळापळ झाली होती. याअगोदर बोर्ली पंचतन बस स्थानकाजवळदेखील मुंबईहून आलेल्या एसटी बसच्या चाकाचे बोल्ट पूर्णपणे सैल असण्याचा प्रकार घडला होता. सदरचे बोल्ट हातानेदेखील फिरत असल्याचे लक्षात आल्यानंतर प्रवाशांनी चालकाच्या निदर्शनास आणून दिले. जर एसटी महामंडळाच्या श्रीवर्धन आगाराकडून प्रवाशांच्या जीवाशी चाललेला खेळ सुरूच राहिला, तर श्रीवर्धन आगाराविरोधात नागरिकांना आंदोलनाचे पाऊल उचलावे लागेल, असा इशारा देण्यात आला आहे.

सदर एसटी बसला पेणच्या अगोदर असलेल्या हॉटेल मिलन पॅलेस या ठिकाणी थांबा नसूनसुद्धा बस त्या ठिकाणी चहापाणी, नाश्त्यासाठी थांबवण्यात आली होती. याबाबत पेणचे जिल्हा वाहतूक नियंत्रक दीपक घोडे यांच्याजवळ संपर्क साधला असता त्यांनी सदर ठिकाणी श्रीवर्धन आगाराच्या बसेसना थांबा नसल्याचे मान्य केले. पण, तरीसुद्धा वाहक व चालकाने त्या ठिकाणी नाश्त्यासाठी बस का थांबवली? याबाबतदेखील त्यांनी चौकशी करणे गरजेचे आहे. एकूणच, श्रीवर्धन आगाराच्या ढिसाळ कारभाराबाबत प्रवासी वर्गामधून प्रचंड नाराजी व्यक्त होत आहे.

---

# बेशिस्त चालकांवर कारवाईचा बडगा

**रोहा पोलिसांकडून १४ लाखांचा दंड वसूल**

**| रोहा | प्रतिनिधी |**



रोहा शहरात वाहतुकीचे नियम भंग होत असल्याने काही प्रमाणात वाहतुकीचा प्रश्न निर्माण होत आहे. यावर जालीम उपचार म्हणून वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या बेशिस्त वाहन चालक मालकांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करुन अद्याप १४ लाख २२ हजार ५०० रुपये दंड वसूल करुन कारवाईचा हिसका दिला आहे.

सोमवार (दि. ८ ) पासून नवीन नियमानुसार वाहन उभे करण्याचा नियम लागू करण्यात आला आहे. यापुढे सम-विषम पद्धतीने दुचाकी वाहने उभे करण्यात येतील. या नियमाचे पालन करावे, असे माहितीवजा आवाहन कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी केले आहे. नवीन वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या वाहन चालक मालकांची गय केली जाणार नाही, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारादेखील पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी दिला आहे.

रोहा बाजारपेठ, एस टी स्टँड, राम मारुती चौक, पोलीस चौकी, दमखाडी नाका, सागर डेअरी परिसर अशा गजबजलेल्या परिसरात वाहन चालकांनी बेशिस्त पद्धतीने आपली वाहने उभी केल्याने इतर वाहनांच्या वाहतुकीस आडथळा निर्माण होत आहे. पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या नेतृत्वाखाली कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली. पोलिसांनी बेशिस्त वाहन चालकांवर धडक कारवाई करुन वाहतुकीचे नियमांचे पालन करावे, असे आवाहन केले.

---

# आरोपीला सहा वर्षांनंतर बेड्या

**| पनवेल | प्रतिनिधी |**

कामोठे येथील जुई गावात सहा वर्षांपूर्वी एकाने आपल्या पत्नीला रॉकेलमध्ये पेटवले होते. पाच दिवसांनी उपचारादरम्यान या महिलेचा मृत्यू झाल्यापासून कामोठे पोलीस संशयित पतीचा शोध घेत होते. मात्र, पोलिसांच्या विविध पथकाने शोध घेऊनही माथेफीरू पती सापडत नव्हता. अखेर कामोठे पोलिसांच्या अथक प्रयत्नांनंतर पत्नीचा खून करून फरार असलेल्या आरोपी पतीला हैदराबाद येथून अटक केली.

जुई गावातील एका भाड्याच्या घरात मनोहर सरोदे आणि त्याची पत्नी आणि मुले असे कुटुंबिय राहात होते. ४ डिसेंबर २०१९ रोजी मनोहरने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत तिला रॉकेल ओतून पेटवून टाकले. या घटनेनंतर मनोहर पळून गेला. तर, मुलांची वाताहत झाली. दोन मुलांना अनाथ आश्रमात आश्रय घ्यावा लागला. पोलिसांच्या वेगवेगळ्या पथकाने या घटनेनंतर मनोहरच्या गावापर्यंत शोध घेतला. परंतु, घटना घडल्यावर मनोहर एकदा त्याच्या मूळ गावी नांदेड येथे गेला आणि त्याचे वडील त्याला पोलिसांत घेऊन जात असल्याचे समजल्यावर तो तेथून पळाला. त्यानंतर तो गावी कधीच परतला नाही.

फरार मनोहरच्या एका दूरच्या नातेवाईकाने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, तो नाव बदलून हैदराबाद येथे राहात असून, त्याची नांदेड येथे राहणारी मुलगी व जावयाच्या तो संपर्कात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. याच माहितीच्या आधारावर त्याच्या मोबाईलवर पाळत ठेवल्यानंतर त्याचा पत्ता पोलिसांना सापडला.

---

# ३१ वर्षीय तरुण बेपत्ता

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

राहत्या घरातून कोणाला काहीही न सांगता ३१ वर्षीय मुरारी शुभकांत झा हा कोणार्क सिटी कोप्रोली नेरे येथून निघून गेल्याने तो हरवला असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. तो अंगाने मध्यम असून, रंग सावळा आणि चेहरा उभट आहे. त्याची उंची ५.११ फूट असून, अंगात सफेद फिकट रंगाचा शर्ट, निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट आणि पायात चप्पल घातली आहे. त्याच्या पाठीवर चामखीळ असून, उजव्या हातामध्ये निळ्या आणि काळ्या रंगाचा धागा बांधलेला आहे. या तरुणाबाबत अधिक माहिती असल्यास हवालदार अण्णासाहेब हसबे यांच्याशी संपर्क साधावा.

---

# घराबाहेर पडलेला इसम बेपत्ता

**| पनवेल | प्रतिनिधी |**

जेवण करण्यासाठी घराबाहेर जातो असे सांगून एक इसम घराबाहेर पडला तो अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार उलवा पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. हसमुद्दीन इस्माईल अन्सारी (२२, रा. एलॲन्टटी कॉलनी, नवी मुंबई विमानतळ) रंग गोरा, उंची ५ फूट ४ इंच, अंगाने सडपातळ, डोळे काळे नाक सरळ, केस लांब व काळे, दाढी मिशी आहे. अंगात सफेद रंगाचा शर्ट व सफेद रंगाची जिन्स पॅन्ट तसेच पायात चप्पल आहे. सोबत मोबाईल फोन आहे.या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवा पोलीस ठाणे किंवा हवालदार दिपककुमार पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

---

# वृक्षसंवर्धनासाठी पत्रकार सरसावले

**तालुका पत्रकार विकास मंचाच्यावतीने माझे झाड उपक्रमाचा शुभारंभ**

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तालुका पत्रकार मंचाच्या वतीने साक्षरता दिनाच्या औचित्याने वृक्षसंवर्धन साक्षरता दिनाचे आयोजन करण्यात आले होते. इंडियन ऑइल, पनवेल तालुका पत्रकार विकास मंच आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला.

वृक्ष पूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. मान्यवरांचे स्वागत सत्कार झाल्यानंतर पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे अध्यक्षमंदार दोंदेयांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाच्या नियोजनाची संकल्पना उपस्थितांसमोर मांडली. या उपक्रमांतर्गत पनवेल महापालिका हद्दीत १०० बहुवार्षिक वृक्ष लावून त्यांचे संवर्धन करण्यात येणार आहे. पनवेल महानगरपालिकेचे उद्यान विभाग यांच्या समन्वयाने सदर वृक्षांचे संवर्धन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते, भाजप उत्तर जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, इंडियन ऑइलचे पश्चिम विभाग एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर पी. त्रिपाठी, इंडियन ऑइल एव्हिएशन विभागाचे जनरल मॅनेजर रत्नशेकर भट्टाचारजी, माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिमंडळ ३ चे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, इंडियन ऑइलचे पश्चिम विभाग कॉर्पोरेट कम्युनिकेशन जनरल मॅनेजर अभिषेक कुमार, पश्चिम विभाग कॉर्पोरेट कम्युनिकेशन अधिकारी अनिल नागवेकर, नगरसेवक मनोहर म्हात्रे, पमपा उद्यान विभागाच्या वतीने सिद्धार्थ कांबळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. पनवेल तालुका पत्रकार मंचाच्या वतीने सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील, सल्लागार विवेक पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, खजिनदार संजय कदम, सरचिटणीस हरेश साठे, प्रविण मोहोकर, नितीन कोळी,राजू गाडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

---

# गावांना मिळणार जुनी ओळख

**| पनवेल | प्रतिनिधी |**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे चिंचपाडा, कोल्ही, कोपर, वाघीवली वाडा, वरचे ओवळे, कोंबडभूजे, तरघर, गणेशपुरी, आणि उलवे ही गावे विस्थापित झाली. पण त्यांच्या खरी ओळख जपण्याऐवजी सिडकोने त्यांना आर-१, आर-२, आर-३, आर-४, आर-५ अशी नवीन नावे दिली आणि गावांचा इतिहास व संस्कृती पुसून टाकली. या गावांना त्यांची जुनी ओळख कायम राहावी यासाठी दहा गाव समिती आणि भाजपचे समीर केणी यांनी पाठपुरावा केला होता. त्याला आ. महेश बालदी यांनी पाठबळ देऊन सिडकोने आता या गावांना जुनी ओळख कायम केली आहे.

सह व्यवस्थापकीय संचालक यांच्या अहवालानुसार बैठक घेण्यात आली होती. या निवेदनामध्ये त्यांनी आर. १ आर.२. आर.३. आर ४, आर ५ क्षेत्रासाठी चिंचपाडा गावाचे ग्रामस्थांच्या मागणीनुसार गावासंबंधित कागदपत्रावर नामांकनावर फलक उभारून देण्याबाबत विनंती केलेली होती. वरील नियोजनकार व मुख्य अभियंता नवी मुंबई यांना आर.१. आर.२. आर.३. आर ४. आर ५ क्षेत्रासाठी चिंचपाडा गावाचे कागदपत्रावर नामांकरण व फलक उभारून देण्याबाबतची योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी सूचना समीर केणी यांनी केली होती.

याबाबत वडघर ग्रामपंचायतीने ठरावदेखील घेतला होता. आता मात्र सिडकोला समीर केणी यांनी झुकवले आहे. सिडकोने मागणी मान्य केली असून, या गावांना आता त्यांची जुनी ओळख कायम मिळणार आहे.

---

**आमचा विकास आम्हीच करणार | मतदानावर टाकणार बहिष्कार**

# नऊ गाव ग्रामस्थांचा एल्गार

**| पाली/वाघोशी | प्रतिनिधी |**

वर्षानुवर्षे रखडलेला रस्ता, गावांमध्ये विकास कामाची बोंबाबोंब, कर भरूनही विकासाच्या नावाने ठेंगा, लोकप्रतिनिधींचे मतदानानंतर तोंडाला पान पुसण्याचे काम या सर्व गोष्टींना कंटाळून सुधागड तालुक्यातील नऊ गावांनी एकत्र येऊन आपला विकास आपणच करण्याचा निश्चय केला आहे. याचे पहिले पाऊल म्हणजे, रविवारी (दि.७) ग्रामस्थांनी स्वखर्चाने पाच्छापूर फाटा ते पाच्छापूर गाव हा सहा किलोमीटरचा रस्ता बनवण्यास सुरुवात केली आहे.

पाच्छापूर, रामवाडी, असानेवाडी, झेंडेवाडी, पंचशील नगर, दर्यागाव, गौळमाळ, गौळमाळ ठाकूरवाडी व सोनारवाडी या नऊ गावांतील ग्रामस्थांनी वर्षापासूनच्या समस्यांना आता स्वतः सोडवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यासाठी त्यांनी नऊ गाव संघर्ष समितीची स्थापनासुद्धा केली आहे. आगामी कोणत्याही निवडणुकांमध्ये मतदान न करण्याचा निर्णयदेखील येथील ग्रामस्थांनी घेतला आहे.



**स्वखर्चाने विकासकामे**

**दुर्गम भागामध्ये असल्याने या गावांमध्ये मोबाईल नेटवर्क नाही. परिणामी, लोकांना संपर्क साधणे अवघड जात होते. त्यामुळे गावकऱ्यांनी लोकवर्गणी काढून स्वतःच्या घरांमध्ये वायफाय बसवले आहेत. याशिवाय स्वदेस फाऊंडेशनच्या माध्यमातून तसेच लोकवर्गणी काढून गावात पथदिवे बसवले आहेत.**

> **पाच्छापूर गाव व आजूबाजूचा परिसर हा ऐतिहासिक व पर्यटनदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा आहे. मात्र, वर्षानुवर्षे येथील खराब रस्ते, पाणीपुरवठा, दिवाबत्ती अशा अनेक समस्या जैसे थेच आहेत. प्रशासन व लोकप्रतिनिधी याकडे अक्षरशः डोळेझाक करताना दिसत आहेत. त्यामुळे अखेर ग्रामस्थांनी एकजूट दाखवून गावांचा विकास स्वतःच करण्याचे ठरवले आहे. यास खूप चांगला प्रतिसाददेखील मिळत आहे. असंख्य लोक सढळ हस्ते पैसे व इतर प्रकारची मदतदेखील करत आहेत.**
> **- जितेंद्र गद्रे, ग्रामस्थ**

मागील अनेक वर्षांपासून पाच्छापूर ते पाच्छापूर फाटा या सहा किलोमीटर रस्त्याची प्रचंड दुरवस्था झाली आहे. शाळकरी मुले, रुग्ण, व्यावसायिक, दूधवाले यांना या खडतर मार्गावरून प्रवास करावा लागतो. त्यामुळे अखेर ग्रामस्थांनी एकत्र येऊन लोकवर्गणी गोळा करुन स्वतः श्रमदान केले आणि या रस्त्याच्या कामाला सुरुवात केली. यासाठी जितेंद्र गद्रे, उमेश तांबट, रोशन बेलोसे, बाळू दिघे, प्रल्हाद ओंबळे, प्रवीण ओंबळे, भगवान दिघे आदींसह ग्रामस्थ एकत्र आले होते.

> **कर न देता स्वतःच विकासकामे करणार**
> शासनाकडे कुठल्याही प्रकारचा कर जसे घरपट्टी, पाणीपट्टी आदी न जमा करता त्याच पैशातून स्वतःच गावाचा सर्वांगीण विकास करण्याचा निर्धार गावकऱ्यांनी केला आहे. कारण शासनाकडे कर भरूनदेखील मूलभूत गरजाच पूर्ण होत नसतील, तर करदेखील का द्यावा, असे येथील ग्रामस्थांचे म्हणणे आहे. तसेच यातून भ्रष्टाचारालादेखील आळा बसेल, असे ग्रामस्थ म्हणतात. विकासकामे झाल्यास येथील लोकांना रोजगार व चांगल्या सोयी सुविधादेखील उपलब्ध होतील. तसेच सर्वच कामे ग्रामस्थ करणार असल्याने निवडणुकींवरती बहिष्कार टाकण्याचा निर्णयदेखील त्यांनी घेतला आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# जरा तरी विचार करा

दहा दिवसांचा गणेशोत्सव शनिवारी संपला. पण शिमगा संपला तरी त्याचे कवित्व बाकी उरावे तसे उत्सव संपला तरी गणेश विसर्जनाच्या मिरवणुका मात्र संपता संपत नव्हत्या अशी स्थिती होती. पूर्वी केवळ पुण्याच्या गणेश विसर्जन मिरवणुकीचे सर्वांना आकर्षण वाटे. तेव्हा अगदी मुंबईतील बहुतांश विसर्जन मध्यरात्रीपर्यंत आटोतत असे. पण आता दरवर्षी मिरवणुका व विसर्जनाला लागणारा वेळ वाढतच चालला आहे. कशाचाच कशाला ताळमेळ राहिलेला नाही. यंदा पुण्याची मिरवणूक तब्बल ३५ तास चालली. शनिवारी सकाळी नऊ वाजता सुरु झालेली मिरवणूक रविवारी रात्री आठ वाजेपर्यंत चालू होती. अनंतचतुर्दशी शनिवारी होती. यंदा रविवारी ग्रहण होते. त्यामुळे शास्त्रानुसार विचार करायचा तरीही विसर्जन वेळेत करणे आवश्यक होते. पण उत्सव साजरे करणाऱ्यांना आपल्या मजेच्या कल्पनेपुढे सर्व गोष्टी किरकोळ आहेत. पुण्यातील मिरवणूक गेली तीन वर्षे किमान तीस तास चालते आहे. यंदा मुंबईची मिरवणूकही कमालीची लांबली. तब्बल ३३ तास चालली. भरतीओहोटीचे गणित चुकल्याने लालबागच्या राजाला विसर्जनासाठी बारा तास गिरगाव चौपाटीवर थांबून राहावे लागले. ज्या राजाच्या दर्शनासाठी लोक कित्येक तास रांगेत घालवतात, तो राजा स्वतःच कित्येक तास असा ताटकळत थांबलेला होता. दरवर्षी ज्या कोळी बांधवाकडून हे विसर्जन करवले जाते त्याच्या ऐवजी गुजरातमधून आधुनिक तराफा आणण्यात आला. पण ऐन वेळी त्यानेच दगा दिला व भरती सुरू झाली. परळचा राजा मित्रमंडळाने आपली मूर्ती विसर्जनाशिवाय तशीच चौपाटीवर सोडून दिली. अशा काही मूर्ती सोडल्या जातातच. त्यांचे विसर्जन महापालिकेला करावे लागते. आता हे लोण सर्वच महाराष्ट्रभर पसरले असून कोल्हापुरात २३ तास, इचलकरंजीत २७ तास, जालन्यात २० तास अशा मिरवणुका चालल्या. सर्वच शहरांमध्ये सरासरी सोळा तास विसर्जन चालू होते. आता तर अगदी लहान खेडेगावे वगळता, सर्वच छोटी शहरे, तालुक्याची गावे यांनी याचे अनुकरण सुरू केले आहे.

## प्रदूषणाचा प्रश्न

या मिरवणुकांसाठी वेगळे रथ करायला, म्हणजेच गाड्या सजवायला प्रचंड खर्च केला जातो. प्रचंड आवाजाचे डीजे स्पीकर्स आणि लायटिंग हेही सर्वत्र अत्यावश्यक झाले आहे. या आवाजाने सर्व परिसर दणाणून जातो. या आवाजाने बहिरेपण व लेझर लायटिंगच्या वापरामुळे डोळे जाण्याच्या घटनाही घडलेल्या आहेत. डीजेवर न्यायालयाने बंदी घातली आहे. आवाजावरही मर्यादा घालण्यात आल्या आहेत. पण त्या सर्रास धुडकावल्या जातात. पुण्याच्या मिरवणुकीचे सर्व टीव्ही वाहिन्यांनी कित्येक तास लाईव्ह प्रसारण केले. त्यात डीजेंचे आवाज कान फाडताहेत हे स्पष्ट दिसत होते व ऐकूही येत होते. पुण्यात सरासरी १०० डेसिबलच्या वर आवाज होता. तो अत्यंत घातक मानला जातो. यंदा याला सोलापूर शहर अपवाद ठरले. तिथे डीजेवर पूर्ण बंदी पाळण्यात आली. तो कित्ता इतर शहरांनी गिरवायला हवा. अनेक ठिकाणी मिरवणुकीत सहभागी तरुण दारु पिऊन नाचत असतात. अत्यंत घाणेरडी म्हणावी अशी गाणी लागलेली असतात. त्यात धार्मिक श्रध्देचा, पावित्र्याचा, भक्तीचा लवलेशही नसतो. तरुणांचा उत्साह म्हणून त्याचे अनेक जण समर्थन करतात. पण गणपती ही जर बुध्दीची देवता असेल तर हा वेडाचार किती दिवस व का चालू द्यायचा याचा विचार करण्याची वेळ आली आहे. या विसर्जनानंतर होणारा कचरा ही आणखीनच वेगळी समस्या आहे. मुंबईत यंदा गणेशोत्सवात दोन लाख मूर्ती विसर्जित केल्या गेल्या. एकट्या अनंतचतुर्दशीला ३६ हजार मूर्तींचे विसर्जन झाले. रविवार दुपारपर्यंतच्या आकडेवारीनुसार महापालिकेने या दोन हजार मेट्रिक टन इतके पीओपी समुद्रातून गोळा केले. याखेरीज फुले, गणपतीला वाहिलेला प्रसाद, माळा, तऱ्हतऱ्हेची प्लास्टिक सजावट यांचाही असाच शेकडो टनांचा कचरा यातून निर्माण होतो. समुद्र अमर्याद आहे व त्याच्यात काहीही गडप होऊ शकते असे आपल्याला वाटते. प्रत्यक्षात येत्या एक-दोन दिवसात हा सर्व कचरा समुद्र मुंबईच्या चौपाट्यांवर आणून टाकणार आहे. मुंबई वगळता इतर शहरांमध्ये तर समुद्रही नाही. तेथे विसर्जनानंतरचे निर्माल्य व मूर्तींचे पीओपी हे विहिरी, तलाव, नद्या यांच्यात साठत चालले आहे. ते सर्वांसाठीच अत्यंत धोकादायक आहे.

## छोट्या गावांनाही लागण

या उत्सवांमध्ये लोकांच्या भावना गुंतलेल्या असतात. शिवाय, यातूनच मूर्तीकार, सजावटकार व इतरांना खूप मोठ्या प्रमाणात रोजगार मिळत असतो. एकूण उत्सवाची उलाढाल हजारो कोटींच्या घरात जाणारी असते. हे उत्सव बंद करावेत असे कोणीच म्हणणार नाही. म्हटले तरी कोणी ऐकणारही नाही. मात्र यांना योग्य वेळीच चांगले वळण लावणे गरजेचे आहे. अन्यथा, आज मुंबई-पुण्यात जे घडते आहे तेच उद्या राज्यातील हरेक गावात घडू लागणार आहे. शिवाय मुंबई, पुणे व इतर शहरांसाठीही या उत्सवाचे असे सादरीकरण हे त्रासदायक ठरू लागले आहे. काही हजार लोकांच्या मजेसाठी बाकीच्या सर्व शहराचे व्यवहार सलग दोन दोन दिवस ठप्प होणे हे काही आधुनिकतेचे लक्षण नाही. आता मुंबईमध्ये मोठ्या गणेशमंडळांनी तर हा उत्सव जवळपास महिनाभर चालू राहावा असा चंग बांधला आहे. या मंडळांची मूर्ती जेव्हा कारखान्यात तयार होते तेव्हा तिचे पूजन केले जाते. नंतर गोकुळाअष्टमीच्या नंतर ही मूर्ती वाजतगाजत मिरवणुकीने मंडपात आणली जाते. नंतर मूर्तीच्या मुखदर्शनाचा एक सोहळा केला जातो. आणि नंतर प्रत्यक्ष गणेशोत्सवात दिवसरात्र लोकांना त्यात गुंतवून ठेवले जाते. लालबागच्या राजासारख्या गणपतींची मिडियामधून इतकी प्रसिध्दी केली जाते की त्यांचे वेगळेच माहात्म्य तयार होते. त्यांच्या दर्शनाला सिनेस्टार, क्रिकेटपटू आल्याची जाहिरात केली जाते. त्यातून मग लोक बारा-पंधरा तास रांगेत उभे राहून दर्शन घेऊ लागतात. प्रत्यक्ष दर्शनाच्या ठिकाणी दोन सेकंदही उभे राहू दिले जात नाही. तिथले कार्यकर्ते दादागिरी करतात. आता तर लालबागच्या राज्याच्या नियंत्रक मंडळात रिलायन्सच्या अंबानीने शिरकाव केला आहे. काही वर्षांनी आयपीएलसारख्या हाही एक इव्हेंट करून यातूनही अंबानी पैसे काढू शकेल. त्यातही मग जिओ फोनसारखे दर्शनाचे वेगवेगळे प्लॅन्स देऊन जेवढे पैसे द्याल तितके सेकंद दर्शन अशा कल्पना काढू शकेल. पुण्यात माणिकचंद जर्दावाल्याचा जावई पुनीत बालन याने जवळपास सर्व उत्सव कबजात केला आहे. सर्वत्र तोच प्रायोजक असतो. यामध्ये उत्सवाचे पावित्र्य काय राहते याचा भक्तांनी आता विचार करायला हवा. आजही कोकणातल्या खेड्यापाड्यांमध्ये अत्यंत साध्या रीतीने घरगुती गणपती आणले जातात. त्यांची अत्यंत साधी पण सुंदर सजावट होते. आरत्या व भजने केली जातात. पण याच्या बरोबर विरुध्द अशी बकाली शहरातील उत्सवांमध्ये आली आहे. दुर्दैवाने ही बकाली आता खालपर्यंत पोचू लागली आहे. त्यामुळे वेळीच सावध होण्याची गरज आहे.

विचार

# भारत-जपान संबंधाची नवी दिशा

***पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जपान दौऱ्यामुळे दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये नवीन बळकटी आली. या भेटीत दोन्ही देशांमधील आर्थिक सहकार्याबाबत ऐतिहासिक घोषणाच करण्यात आल्या नाहीत, तर शीर्ष नेत्यांमध्ये अभूतपूर्व जवळीकता दिसून आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा यांनी भारत-जपान आर्थिक मंचाला हजेरी लावली, जिथे दोघांनीही आर्थिक सहकार्य आणखी वाढवण्याचे स्वप्न पाहिले.***



प्रा. जयसिंग यादव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यात जपानने एक मोठी घोषणा केली. त्यानुसार पुढील दहा वर्षांमध्ये भारतात दहा ट्रिलियन येनची खासगी गुंतवणूक होईल. ही या भेटीतील सर्वात महत्त्वाची कामगिरी मानली जात आहे. या भेटीने येत्या दशकासाठी भारत-जपान संबंधांची दिशा निश्चित केली आहे. या रोडमॅपचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे 'पुढील दशकासाठी भारत-जपान संयुक्त दृष्टी'. यानुसार आर्थिक विकासापासून सुरक्षा, तंत्रज्ञान, नवोपक्रम, आरोग्य, शाश्वत विकास, गतिशीलता आणि परस्पर देवाणघेवाण अशा अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये सहकार्य दिले-घेतले जाणार आहे. भारत आणि जपानमध्ये संरक्षण, मानव संसाधन देवाणघेवाण, डिजिटल नवोपक्रम, महत्त्वपूर्ण खनिजे, स्वच्छ ऊर्जा, अंतराळ सहकार्य आणि सांस्कृतिक भागीदारी यासारख्या क्षेत्रात अनेक महत्त्वाचे करार करण्यात आले. मोदी आणि इशिबा यांनी महत्त्वाचे करार केले. दोन्ही नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत द्विपक्षीय संबंध नवीन उंचीवर नेण्याचा संकल्प व्यक्त केला. या प्रसंगी मोदी म्हणाले की, भारत आणि जपान या दोन मोठ्या अर्थव्यवस्था आहेत. अशा परिस्थितीत जागतिक शांतता आणि स्थैर्यासाठी त्यांची भागीदारी महत्त्वाची आहे. दोन्ही देशांनी आर्थिक सुरक्षा सहकार्य उपक्रम सुरू करण्यास आणि शाश्वत इंधन उपक्रम आणि बॅटरी पुरवठा साखळी भागीदारी पुढे नेण्यास सहमती दर्शवली. मोदी आणि इशिबा यांनी आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत युक्रेनमध्ये कायमस्वरूपी शांततेचे समर्थन केले आणि पश्चिम आशियातील स्थिरतेबद्दल चिंता व्यक्त केली. गाझामधील मानवतावादी परिस्थितीबद्दल गंभीर चिंता व्यक्त करताना, दोन्ही नेत्यांनी तात्काळ युद्धबंदी, सर्व ओलिसांची सुटका आणि मानवतावादी मदत सुनिश्चित करण्यावर भर दिला.

२०१४ मध्ये पदभार स्वीकारल्यानंतर मोदी यांचा हा आठवा जपान दौरा आहे आणि पंतप्रधान इशिबा यांच्यासोबत त्यांची पहिली वार्षिक शिखर परिषद होती. हा दौरा भारत जपानसोबतच्या संबंधांना देत असलेल्या उच्च प्राधान्यावर प्रकाश टाकतो. दोन्ही देशांचा राजनैतिक संबंधांचा इतिहास मोठा आहे. त्यात व्यापार, गुंतवणूक, स्वच्छ ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञानातील अनेक उच्चस्तरीय भेटी आणि भागीदारी समाविष्ट आहेत. भारत आणि जपानमधील द्विपक्षीय व्यापार २२.८ अब्ज डॉलर्स आहे. जपान हा भारतातील थेट परकीय गुंतवणुकीचा पाचवा सर्वात मोठा स्रोत आहे. दोन्ही देशांमधील व्यापार डिसेंबर २०२४ पर्यंत ४३.२ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचेल. दोन्ही देश सेमीकंडक्टर, स्टार्ट अप्स, स्वच्छ ऊर्जा, पुरवठा साखळी लवचिकता, औद्योगिक स्पर्धात्मकता आणि कौशल्य विकास यासारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये सहकार्याच्या शक्यतादेखील शोधत आहेत. परराष्ट्र मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, मोदी यांच्या या भेटीमुळे भारत आणि जपानमधील दीर्घकालीन मैत्री मजबूत होईल, सहकार्याचे नवे मार्ग खुले होतील आणि इंडो-पॅसिफिक प्रदेश आणि त्यापलीकडे शांतता, समृद्धी आणि स्थिरतेसाठी दोन्ही देशांच्या सामायिक वचनबद्धतेची पुष्टी होईल.

जपान हा भारतातील पाचवा सर्वात मोठा गुंतवणूकदार आहे. त्याची भारतातील थेट गुंतवणूक ४३.२ अब्ज डॉलर आहे. भारतात १४०० जपानी कंपन्या सक्रिय असून शंभरहून अधिक भारतीय कंपन्या जपानमध्ये कार्यरत आहेत. डिजिटल सहकार्य, स्वच्छ ऊर्जा आणि कौशल्य विकास यासारख्या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढत आहे. जपान १९५८ पासून भारताचा सर्वात मोठा देणगीदार आहे. तो मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेलसारख्या प्रकल्पांना पाठिंबा देत आहे. २०२३ मध्ये या प्रकल्पासाठी तीनशे अब्ज येनची मदत देण्यात आली. पर्यटन आणि पर्यावरणीय उपक्रमदेखील सहकार्याचा एक भाग आहेत. या भेटीमुळे दोन्ही देशांमधील आर्थिक, धोरणात्मक आणि सांस्कृतिक संबंध आणखी मजबूत होतील. ते इंडो-पॅसिफिक प्रदेशातील शांतता आणि समृद्धीसाठी महत्त्वाचे आहेत. भारत आणि जपानमध्ये २००० पासून जागतिक भागीदारी आहे आणि २०१४ पासून एक विशेष धोरणात्मक भागीदारी आहे. भारताचे ॲक्ट ईस्ट पॉलिसी आणि जपानचे फ्री अँड ओपन इंडो-पॅसिफिक उपक्रम एकमेकांना पूरक आहेत. दोन्ही देश 'क्वाड', 'इंटरनॅशनल सोलर अलायन्स' आणि 'कोअलिशन फॉर डिझास्टर रेझिलिएंट इन्फ्रास्ट्रक्चर'सारख्या व्यासपीठांवर एकत्र काम करतात. मोदी आणि जपानचे शिगेरू इशिबा यांनी टोकियो इलेक्ट्रॉन फॅक्टरीला भेट देऊन कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला. जपान आणि भारत यांच्यात सेमीकंडक्टरबाबत करार झाला आहे. या दोन नेत्यांनी सेंडाई येथील सेमीकंडक्टर क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या टोकियो इलेक्ट्रॉन मियागी लिमिटेड (टेल मियागी)ला भेट दिली. या दरम्यान, मोदी यांना जागतिक सेमीकंडक्टर मूल्य साखळीत 'टेल' ची भूमिका, त्याची प्रगत उत्पादन क्षमता आणि भारतासोबत सुरू असलेल्या आणि नियोजित सहकार्याबद्दल माहिती देण्यात आली. सेमीकंडक्टर क्षेत्र हे भारत-जपान सहकार्याचे एक प्रमुख क्षेत्र आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारताने या क्षेत्रात बरीच प्रगती केली आहे. अनेक तरुणही त्यात सामील होत आहेत. भारत आणि जपानने सेमीकंडक्टर पुरवठा साखळीबाबत करार केला आहे. अशा परिस्थितीत परस्पर मदतीने दोन्ही देश आता मजबूत, लवचिक सेमीकंडक्टर तयार करण्यासाठी एकत्र काम करतील. मोदी यांनी भारतीय लोको पायलटांशी चर्चा केली. त्यांनी नवीन अल्फा-एक्स ट्रेनची पाहणी केली आणि कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून बुलेट ट्रेन प्रकल्पाची माहिती घेतली. शिगेरू इशिबा यांच्यासोबत मोदी यांनी मियागी प्रीफेक्चरमधील ओहिरा गावात बांधल्या जाणाऱ्या सेमीकंडक्टर वेफर फॅब्रिकेशन प्लांटला भेट दिली. हा प्लांट तैवानच्या पीएसएमसी, एसबीआय होल्डिंग्ज आणि जपानी भागीदारांचा संयुक्त उपक्रम असलेल्या जपान सेमीकंडक्टर मॅन्युफॅक्चरिंग कंपनी (जेएसएमसी) द्वारे बांधला जात आहे. जपानच्या चिप उत्पादन क्षमतेला पुनरुज्जीवित करण्यासाठी उचलले गेलेले हे एक मोठे पाऊल आहे. भारत आणि जपान सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), महत्त्वपूर्ण खनिजे आणि स्वच्छ ऊर्जा यासारख्या क्षेत्रात परस्पर सहकार्य करत आहेत.मोदी यांचा दौरा दोन्ही देशांमधील भागीदारी मजबूत करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. या दोन दिवसांच्या भेटीदरम्यान दोन्ही देशांनी 'पुढील दशकासाठी भारत-जपान संयुक्त व्हिजन: आठ दिशानिर्देश' नावाचा एक सामायिक व्हिजन दस्तावेज स्वीकारला. या अंतर्गत सुरक्षा सहकार्यावरील संयुक्त घोषणापत्रावर स्वाक्षरी करण्यात आली. याशिवाय चंद्रयान-५ मोहिमेसाठी ध्रुवीय प्रदेशाच्या संयुक्त शोधासाठी दोन्ही देशांच्या अंतराळ संस्थांमध्ये करारावर स्वाक्षरी करण्यात आली. अर्धवाहक आणि 'एआय' सारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात भारत आणि जपानमधील सहकार्य अधिक मजबूत होत आहे. चंद्रयान-५ मोहिमेवर आणि सुरक्षा सहकार्यावर दोन्ही देशांमध्ये करार झाले आहेत. मोदी यांच्या जपान दौऱ्यामुळे दोन्ही देशांमधील आर्थिक आणि तांत्रिक भागीदारी नवीन उंचीवर जाईल. पंतप्रधान मोदींचा हा दौरा भारत-जपान संबंधांच्या भविष्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. सेमीकंडक्टर उद्योगातील सहकार्यामुळे भारताला चिप उत्पादन क्षमता वाढवण्याची संधी मिळेल. 'एआय' आणि स्वच्छ ऊर्जा यासारख्या क्षेत्रातील जपानसोबतची भागीदारी भारताच्या तांत्रिक प्रगतीला गती देऊ शकते. भारताच्या बुलेट ट्रेन प्रकल्पात जपानचे सहकार्य भारतीय रेल्वे नेटवर्क आधुनिक आणि जलद बनवण्यास मदत करेल. अल्फा-एक्स बुलेट ट्रेन मॉडेलचा आढावा आणि लोको पायलटच्या प्रशिक्षणामुळे रेल्वेक्षेत्रात सुधारणा होईल. यामुळे रेल्वे वाहतूक प्रणालींच्या बांधकाम आणि विकासात जपानकडून तांत्रिक सहकार्याला चालना मिळेल. चांद्रयान-५ मोहिमेवर विशेष लक्ष केंद्रित करून भारत आणि जपानमधील अवकाश तांत्रिक सहकार्य वाढवले जाईल. अवकाश संशोधन आणि संयुक्त प्रकल्पांमध्ये नवीनतम प्रगतीसाठी अवकाश संस्थांचे सहकार्य काम करेल. हे सहकार्य अवकाश प्रवास आणि अन्वेषणात जागतिक स्तरावर भारताला बळकटी देईल. मोदी यांच्या जपान दौऱ्याचा उद्देश स्वच्छ ऊर्जा आणि हरित ऊर्जा क्षेत्रात दोन्ही देशांमधील भागीदारीला चालना देणे हा होता. सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जेच्या क्षेत्रात भारत आणि जपानमधील सहकार्य वाढल्यामुळे पर्यावरणीय दुष्परिणाम कमी होतील. या भेटीमुळे भारत आणि जपानमधील सुरक्षा संबंधही मजबूत होतील. दोन्ही देशांनी विशेषतः प्रादेशिक सुरक्षेच्या संदर्भात लष्करी आणि धोरणात्मक सहकार्य वाढवण्यावर भर दिला. परिणामी, संरक्षण उद्योग आणि लष्करी प्रशिक्षण क्षेत्रातही दोन्ही देशांचे सहकार्य असेल.

चर्चा आजची

# संपकरांचा विचार व्हावा

प्रमोद जाधव

अपूऱ्या कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी करण्यासाठी कंत्राटी आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती शासनाने केली. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा परिषद व जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या अखत्यारित येणाऱ्या दवाखान्यांमध्ये भरती करण्यात आली. रात्रीचा दिवस करून कंत्राटी कर्मचाऱ्यांनी सेवा केली. असांसर्गिक रोग (उच्च रक्तदाब, मधुमेह, कॅन्सर) तपासणी शिबिरे, गरोदर महिलांची तपासणी इत्यादी उपकेंद्र स्तरावरील सेवांवर परिणाम झाला आहे.तरी शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यावर योग्य तो तोडगा लवकरात लवकर काढावा जेणेकरून आरोग्य व्यवस्था लवकरात लवकर पूर्ववत होऊ शकेल. संपकरांचा विचार व्हावा, अशी प्रतिक्रीया उमटत आहे.

वैद्यकिय अधिकाऱ्यापासून परिचारिका, आरोग्य सेवक अशी एकूण ७१ पदे भरण्यात आली. या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मदतीने आरोग्य सेवा बळकट करण्याचा प्रयत्न केला. तुटपुंज्या मानधनावर गेल्या अनेक वर्षापासून हे कर्मचारी काम करीत आहेत. त्यांचे समायोजन करण्यात यावे अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून होती. अखेर समायोजन करण्यासाठी १४ मार्च २०२४ मध्ये परिपत्रक काढण्यात आले. वेगवेगळ्या विभागाची लागणारी परवानगीदेखील घेण्यात आली. परंतु समायोजनचे गाजर दाखवत ही प्रक्रीया थांबविण्यात आली. परिपत्रक काढून एक वर्षे होत आले तरीदेखील समायोजन केले नसल्याने कंत्राटी कर्मचाऱ्यांनी १९ऑगस्टपासून बेमुदत संप सुरु केला. संप सुरु होऊन पंधरा दिवस होत आली आहेत. मात्र प्रशासनासह सरकारकडून कोणतीही दखल घेण्यात आली नाही.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत अधिकारी आणि कर्मचारी यांनी दिनांक १९ ऑगस्ट २०२५ पासून राज्यभर आंदोलन सुरू केले आहे.



जिल्ह्यातील सर्व समुदाय आरोग्य अधिकारी व वेगवेगळ्या विभागातील आरोग्य कर्मचारी या संपामध्ये सामील झाले आहेत.रायगड जिल्हा परिषद अंतर्गत असणारे ८०० हुन अधिक राष्ट्रीय आरोग्य अभियान मधील समुदाय अधिकारी व कर्मचारी संपामध्ये सहभागी झाले आहेत.रायगड जिल्ह्यात संप सुरू झाला आहे. संपामुळे जिल्ह्यात किमान १५० ते २०० उपकेंद्रातील बाह्य रुग्ण सेवा कोलमडली आहे. त्याचवेळी उच्च रक्तदाब, मधुमेह, कॅन्सर तपासणी शिबिरे, गरोदर महिलांची तपासणी आदी उपकेंद्र स्तरावरील सेवांवर परिणाम झाला आहे. जिल्हा सामान्य विभागाच्या अखत्यारित असणाऱ्या ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडला आहे. सध्या तापाचे रुग्ण वाढत आहे. या रुग्णांची तपासणी करण्यापासून ग्रामीण भागातील अंगणवाडी, शाळांमधील विद्यार्थ्यांच्या नियमीत तपासणीला अडथळा येत आहे. समुदाय आरोग्य अधिकारी यांच्याकडून उपकेंद्रस्तरावर समुदाय आरोग्य अधिकारी हे कंत्राटी ऐवजी नियमित कायम पद निर्माण करावे आणि केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सहा वर्षे सेवा पूर्ण झालेल्या समुदाय आरोग्य अधिकारी यांना वरील नियमित समुदाय आरोग्य अधिकारी पदावर कायम करणे.अपघाती निधनास ५० लाख विमा संरक्षण, अपंगत्वासाठी २५ लाख व दुर्धर आजारासाठी सर्वांना किमान पाच लक्ष विमा संरक्षण मिळावे.वाढत्या महागाईचा विचार करता किमान १५ टक्के वेतन वाढ सर्वांना मिळावी. अशा मागण्या आहेत. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातील कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याचे परिपत्रक २०२४ मध्ये काढले होते. परंतु एक वर्षे होऊनही त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप पुकारला आहे. त्याचा फटका आरोग्य सेवेवर मोठ्या प्रमाणात बसला आहे. आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संपाचा फटका ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य सेवेवर होऊ लागला आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयासह उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा परिषद आरोग्य विभागात काम करणाऱ्या नियमीत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडला आहे. त्यामुळे आरोग्य सेवा वेळेवर पुरवताना या कर्मचाऱ्यांची दमछाक होत आहे. हा लढा न्याय मिळेपर्यंत सुरु राहणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे शासनाने समन्वयाची भूमिका घेत संपकरांचा विचार करावा अशी मागणी होत आहे.

लोकसंसद

## साक्षरतेचे प्रमाण वाढावे

८ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा केला जातो. साक्षरता म्हणजे माणसाला दैनिक जीवनाशी निगडित बाबीविषयी लिहिता वाचता येणे, मानवी जीवनातील घडामोडींचे विश्लेषण करता येणे व वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित ठेवून स्वतःच्या व समाजाच्या प्रगतीस हातभार लावणे. शिक्षणाचे महत्व कोणाला नाही? मानवी कल्याणासाठी शिक्षण अतिशय महत्वाचे आहे मात्र केवळ शिक्षण देणे म्हणजेच साक्षरता नव्हे तर मानवी प्रगतीच्या वाट्यात अडथळा बनण्याचा, गरिबीला नष्ट करण्याचा तो एक वैशिष्ट्यपूर्ण आणि शक्तिशाली मार्ग आहे. जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि समाज बदलवण्यासाठी साक्षरता एक परिणामकारक साधन आहे. भारताच्या बाबतीत बोलायचे झाले तर देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्ष झाली तरी १०० टक्के साक्षरता आपण साध्य करु शकलो नाही. देशातील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी शासकीय पातळीवर विविध उपक्रम राबवून साक्षरतेचा टक्का वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे. या सर्व उपक्रमांना चांगला प्रतिसादही मिळत असल्याने लवकरच आपण १०० टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करू. जागतिक साक्षरता दिनाच्या आपल्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

## देवाभाऊंची गूढ जाहिरात

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला ''देवाभाऊ'' यांची लक्षणीय पण तितकीच गोपनीय जाहिरात राज्यातील सर्वच छोट्या मोठ्या वर्तमानपत्रात झळकली. देवाभाऊंनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून गोपनीयतेची शपथ घेतली आहे म्हणून बहुदा जाहिरातीच्या मागील पुरस्कर्ते कदाचित गोपनीय असावेत. महाराजांचा कुठलाही विशेष घटनाक्रम नसताना अचानक या जाहिरातीने संभ्रम निर्माण होणे अपेक्षित आहे. परंतु कदाचित या जाहिराती मागे मराठा आंदोलनाची किनार असावी. असा समज करावयास काय हरकत नसावी. आता तर अनेक विद्यमान नेते आणि मंत्र्यांचे वाढदिवस त्यांचे तथाकथित आणि नेत्यांपासून मिळणाऱ्या कंत्राटामुळे किंवा तत्सम ''लाभार्थी'' असणारे आजही मोठमोठे होर्डिंग्ज आणि जाहिराती देतात. परंतु देवाभाऊंच्या जाहिराती मागे कोणते अदृश्य हात आहेत याचे गूढ मात्र कायम राखण्यात यशस्वी झाले किंवा राज्यातील मराठा नेत्यांच्या आधी जाहिरात प्रसारित करण्यात यशस्वी झाले.कारण सरकारी जाहिरातीमध्ये सहयोगी मराठा नेत्यांचे फोटो येतात किंवा कदाचित गोपनीयतेची शपथ घेतल्याने देवाभाऊंनी ही ''गूढ जाहिरात'' प्रसिद्ध केली असावी.

**- दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई**

दिनविशेष

# अभ्यासपूर्ण रसग्रहणातून उलगडले 'गीतरामायणा'चे पैलू

आपल्याकडे अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्व आहेत आणि होऊन गेलीत. आज ९ सप्टेंबर, संगीतकार श्रीधर फडके यांचा जन्मदिन. श्रीधर फडके हे भारतातील श्रेष्ठ गायक आणि संगीतकार म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म मुंबईत १९५० मध्ये झाला. महान कलाकार सुधीर फडके यांचा मुलगा श्रीधर फडके. मुंबईत जन्मलेले श्रीधर फडके हे मराठी संगीत उद्योगात चार दशकांहून अधिक काळ एक प्रेरणाशक्ती म्हणून कार्यरत आहेत. मराठी चित्रपट आणि संगीतातील त्यांचे योगदान अतुलनीय आहे आणि त्यांची प्रतिष्ठित गाणी सर्व वयोगटातील प्रेक्षकांच्या जवळची बनली आहेत.



संगीतकार, गायक आणि निर्माता म्हणून फडके यांनी मराठी संगीत जगतात आपली प्रभावी छाप सोडली आहे. 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय' आणि 'राजा शिवछत्रपती' ही त्यांची गाणी मराठी अभिमान आणि संस्कृतीचे गीत बनली आहेत. त्याच्या संगीताने अनेक पिढ्या ओलांडल्या गेल्या आहेत. वडिलांच्या शास्त्रीय संगीतावरील प्रभाव असल्यामुळे श्रीधर फडके यांचा संगीतातील प्रवास तरुण वयात सुरू झाला. एकल संगीतकार म्हणून ठसा उमटवण्यापूर्वी त्यांनी कीबोर्ड प्लेअर आणि सहाय्यक संगीतकार म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. १९८३ मध्ये 'चिमणी पाखर' या चित्रपटाने त्यांची प्रगती झाली आणि तेव्हापासून त्यांनी १०० हून अधिक मराठी चित्रपट आणि असंख्य अल्बमना संगीत दिले आहे. त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत, फडके यांना प्रतिष्ठित महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार आणि व्ही. शांताराम पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळून सन्मान मिळाला आहे.

'स्वये श्री रामप्रभू ऐकती' या गीतासाठी केलेला 'भूप' रागाचा वापर.. 'दशरथा घे हे पायसदान' या गीतामध्ये 'दशरथा' म्हणताना समेवर कसे यायचे.. 'सावळा गं रामचंद्र' या गीताला दिलेली ओवीची चाल.. 'आकाशाशी जडले नाते' गीत गाताना आकाशाशी नाते स्वरांतून कसे जोडले गेले.. 'ज्येष्ठ तुझा पुत्र मला देई दशरथा' या गीतामध्ये 'ज्येष्ठ' या शब्दावर केलेला आघात.. अशा अभ्यासपूर्ण रसग्रहणातून 'गीतरामायणा'चे वेगवेगळे पैलू प्रसिद्ध संगीतकार-गायक श्रीधर फडके यांनी उलगडले आणि 'पुत्र सांगती चरित पित्याचे' या गीतरामायणातील काव्यपंक्तीची प्रचिती रसिकांना आली. मला आणखी किती आयुष्य आहे, त्यामुळे नवोदित गायकांनी गीतरामायणाचे शिवधनुष्य जरूर पेलावे. पण, 'अभ्यासोनि प्रकटावे' अशा पद्धतीने ही गाणी सादर करावीत, अशी अपेक्षाही श्रीधर फडके यांनी बोलून दाखविली. महाराष्ट्राचे आधुनिक वाल्मीकी ग. दि. माडगूळकर आणि ज्येष्ठ संगीतकार-गायक सुधीर फडके यांच्या अलौकिक प्रतिभेचा आविष्कार असलेल्या 'गीतरामायण' च्या हीरकमहोत्सवी वर्षांचे औचित्य साधून भारतीय शिक्षण मंडळ संस्थेने श्रीधर फडके यांच्या मुलाखतीचे आयोजन केले होते. 'सुधीर फडके यांचे संगीत' या विषयावर पीएच. डी. केलेल्या भाग्यश्री मुळे यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

# सफाई कर्मचाऱ्यांची उपासमार

## ● चार महिन्यांचे वेतन थकीत; वित्त, नगरविकास विभागाविरूद्ध आज मुंबईत मोर्चा

**। उरण । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्यातील नगरपरिषद नगरपंचायत सफाई कामगार व कर्मचाऱ्यांची वेतनाअभावी उपासमार होत आहे. तसेच शासनाच्या वित्त विभागाची आडमुठी भूमिका व नगर विकास विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे समन्वय समितीतर्फे ९ सप्टेंबर रोजी आझाद मैदान ते मंत्रालय मुंबई यादरम्यान मोर्चाचे आयोजन केले असल्याची माहिती सुरेश पोसतांडेल प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य नगरपरिषद, नगपंचायत कर्मचारी/संवर्ग कर्मचारी संघटना (शासन मान्यताप्राप्त) यांनी दिली आहे.

राज्यातील नगरपरिषद नगरपंचायत कर्मचाऱ्यांना शासनामार्फत वेतनासाठी दिल्या जाणाऱ्या सहाय्यक अनुदानाबाबत वित्त विभागाची फार मोठी भूमिका आहे. मात्र, नगरविकास विभाग आणि नगरपालिका प्रशासन संचालनालय यांच्या ढिसाळ कारभारामुळे राज्यातील नगरपरिषद नगरपंचायतीमधील कर्मचाऱ्यांचे मागील चार महिन्यांपासून वेतनासाठी हाल होत आहेत. वेतनामुळे सफाई कामगार व कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असून, बँकेचे व विमा कंपन्यांचे हप्ते थकीत होत असल्याने कर्मचाऱ्यांचा सिबील स्कोर खराब होत आहे. अनेकवेळा निवेदन देऊनही शासन स्तरावर बैठकाही घेण्यात आल्या; परंतु त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे समन्वय समितीला आंदोलनाची भूमिका घ्यावी लागली. याकरीता मंगळवारी (दि.९) भव्य मोर्चाबाबत प्रलंबित मागण्यासाठी शासनालाही निवेदन देण्यात आले.



चार महिन्यांचे थकीत वेतन एकाच वेळी देऊन प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेच्या आत कर्मचाऱ्यांना वेतन मिळालेच पाहिजे, नगरपंचायतीमधील राहिलेले सर्व कर्मचारी सफाई कामगार संगणक ऑपरेटर आदी सर्व कर्मचाऱ्यांचे विनाअट समावेशन करावे, नगरपंचायतची सेवा स्थापना दिनांकापासून ग्राह्य धरून थकीत वेतन अदा करावे, आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील कर्मचाऱ्यांना एक स्तर वेतन श्रेणी लागू करावी, सफाईचा ठेकापद्धती बंद करून प्रत्येक सफाई कामगारांना हक्काचे घर बांधून द्यावे, नगरपरिषद आस्थापनेच्या कर्मचाऱ्याऱ्यांची वेतन पडताळणी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करावी, स्वच्छता निरीक्षकांची वेतनश्रेणी २८०० चे ऐवजी ४२०० रुपये करून त्यांचे अधिकार व कर्तव्य निश्चित करणे, २००५च्या नंतरच्या कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती वेतनाचे धोरण निश्चित होईपर्यंत जुनी पेन्शन लागू करावी, नगरपरिषद कर्मचाऱ्यांना संवर्ग समावेशनाची एक संधी द्यावी, नगर परिषद नगरपंचायतमधील कंत्राटी कामगारांना कायम करावे आदी विविध मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना दिले असून, निवेदनावर नगरपरिषद, नगपंचायत कर्मचारी/संवर्ग कर्मचारी संघटना (शासन मान्यताप्राप्त) महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष सुरेश पोसतांडेल, समन्वय समितीचे प्रमुख विश्वनाथ घुगे, नागेज कंडारे, पी. वी भातकुले, दीपक रोडे, धर्मा खिल्लारे, मारुती गायकवाड, अनुप खटारे आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.


---

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**९ सप्टेंबर**

१) श्रीम.सुमती गणेश आठवले
अलिबाग-रायगड ०९-०९-१९४२
२) श्री.अनंत दिनकर जोशी
चेंढरे-अलिबाग ०९-०९-१९५०
३)श्रीम.स्मिता दिलीप प्रधान
पिंपळभाट, अलिबाग ०९-०९-१९५८

## सुवर्णकण



**जे गुण संसारात आवश्यक आहेत त्याच गुणांची परमार्थ देखील अत्यंत गरज आहे परमार्थ वाटतो तितका सोपा नाही देव देव करणे सोपे परंतु चिकाटी ने निष्ठा ठेवून साधना नित्य आचरणात आणणे फार कठीण आहे.**

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**

---

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

---

## माथेरान घाटात चाचणीसाठी आलेली जीप अपघातग्रस्त

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नेरळ-माथेरान घाटरस्त्यात चाचणी घेण्यासाठी आलेली नवी कोरी जीप रस्त्याच्या कडेला गटारात गेली. या जीप गाडीला अपघात झाल्याने घाट रस्त्यात ही गाडी कशी धावणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

पनवेल येथे असलेल्या शोरुममधील गाडी ही शुक्रवारी नेरळ-माथेरान घाटात चाचणीसाठी आली होती. नेरळ येथून माथेरान घाटातील प्रवास करीत माथेरान येथील दस्तुरी नाका येथे पोहोचली. त्यानंतर पुन्हा नेरळकडे येत असताना दहा मीटर रुंदीच्या रस्त्याने खाली उतरत असताना सपाट भाग असलेल्या रस्त्याने जात असताना जुम्मापट्टी येथे ही नवी कोरी गाडी रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेल्या गटारात पोहोचली.



त्या ठिकाणाचा रस्ता किरकोळ वळण असलेला रस्ता असूनदेखील आणि घाटरस्त्यात फारशी वाहने नसतानादेखील ती नवी कोरी गाडी रस्त्याच्या खाली पोहोचली. त्यामुळे या गाडीच्या घाटरस्त्यातील प्रवासाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या नव्या कोऱ्या गाडीच्या सर्व भागात स्टिकर लावण्यात आल्याने गाडी कोणत्या कंपनीची आहे याबद्दल कोणतीही माहिती मिळाली नाही. त्याचवेळी गाडीला अपघात झाल्यानंतर चालकाने त्या गाडीवर कव्हर टाकून ठेवण्याची चलाखी केली.

---

## अलिबागमध्ये ईद-ए-मिलाद उत्साहात साजरा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

इस्लामिक कॅलेंडरनुसार रबी-उल-अव्वलच्या १२ तारखेला साजरा होणाऱ्या ईद-ए-मिलादनिमित्त शुक्रवारी (दि. ०५) अलिबाग येथील मांडवी मोहल्ला येथे मोठ्या उत्साहात ईद-ए-मिलाद साजरा करण्यात आला.

सायंकाळी आसरच्या नमाजीनंतर लहान मुलां-मुलींनी मोहम्मद पैगंबर यांच्या गौरवापित्यर्थ नातशरीफचे पठाण केले. त्या मुलां-मुलींना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यात आली. त्यांनतर मांडवी मोहल्ला चिराग मस्जिद येथील मौलाना मुफ्ती शकील सिद्दीकी यांनी प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या जीवनकार्याचा गौरव करून त्यांच्या शिकवणी आणि आदर्श जीवनाचे स्मरण करून देणारे प्रवचन केले आणि

तसेच, सर्व मुस्लिम बांधवांनी प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या शिकवणीप्रमाणे एकमेकांशी प्रेम भावनेने आणि आदराने राहून त्यांची शिवण आचरणात आणण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास अलिबाग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर साळे हेदेखील आवर्जून उपस्थित होते.

हा कार्यक्रम मांडवी मोहल्ला येथील जेष्ठ नागरिक नियाज अहमद सय्यद उर्फ बाबू भाई यांच्या मार्गदर्शनाखाली मोहल्ल्यातील सर्व तरुणांनी एकजुटीने आणि एकोप्याने मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला आणि आपल्या एकजुटीचे दर्शन घडविले. या कार्यक्रमासाठी चावडी मोहल्ला येथील अध्यक्ष मोहतसीम पल्लवकर, उपाध्यक्ष सय्यद महामुद कादरी, असिफ दणदणे, जाहिद बुकबाईंडर, ॲड, अजहर घट्टे, मनसूर कादरी, मुजफ्फर पल्लवकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी सलीम शेख, रमजान मेमन, सुहेल मेमन, मिकात फकी, अफजल सय्यद, अफसर सय्यद, मोईन फकी, एजाज सय्यद, शब्बीर सय्यद, शाहिद खान, नवाज सय्यद, रफिक पठाण, अमीर मुमेरे आणि त्यांचे सहकारी यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि कुराणचे पठण करून मोहम्मद पैगंबरांच्या शिकवणीप्रमाणे जीवन जगण्याबाबत अल्लाहकडे प्रार्थना करून कार्यक्रमाची सांगता केली. तसेच, यावेळी अनेक गोरगरिबांना भोजन वाटप केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इकबाल बुराण यांनी केले.

---

## खवय्यांचा मासळीवर ताव

**। अलिबाग । प्रतिनिधी।**

श्रावणात मांसाहार बंद असतो. त्यानंतर गणेश उत्सवात अनेकजण मांसाहार खाणे टाळतात. शिवाय मासेमारी देखील बंद असल्याने बाजारात मासळीचा तुटवडा असतो जेणेकरून मासळीचे भाव या काळात सर्वाधिक असतात. मात्र, आता श्रावण महिना संपला असून दहा दिवसाच्या गणरायाचे विसर्जन झाले आहे. त्यामुळे खवय्यांनी आता मासलीकडे आपला मोर्चा वळविला आहे. दरम्यान, समुद्रातील असलेली मासेमारी पुन्हा सुरू झाली आहे.

---

## मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ कर्जत यांनी तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, दादर-मुंबईतील ज्योविस आयुर्वेद, नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबीर व मोफत औषधे वाटप शिबिराचे आयोजन केले होते. या चिकित्सा शिबिरात १६२ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हे प्रतिष्ठानने आयोजित केलेले ३५ वे आरोग्य शिबीर होते.

यावेळी बोलताना मुकेश सुर्वे यांनी, कर्जत तालुक्यासह अन्य ठिकाणी मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिरे आयोजित करून आरोग्य आपल्या दारी ही संकल्पना घेऊन काम करीत आहोत. तसेच, आयुर्वेदाचा खेडोपाडी प्रसार व प्रचार करण्याचा संकल्प केला आहे. हे एकोणतीसावे शिबीर असून, आत्तापर्यंत सुमारे अकरा हजारांच्या वर रुग्णांना याचा लाभ मिळाला आहे. यासाठी सर्वांचे सहकार्य मिळत आहे, असे स्पष्ट केले.



■ (छायाचित्र : संजय गायकवाड)

या शिबिरात चामखीळ आणि भोवरी तत्काळ काढण्यात आली तर पित्त, पाठदुखी, वात, रक्त मोक्षण, आमवात, अग्निकर्म, लकवा आजाराच्या रुग्णांची चिकित्सा करून त्यांच्यावर उपचार सुरु केले. बहिरेपणा, सांधेदुखी, कंबरदुखी, गुडघेदुखी आदी व्याधींवर उपचार करण्यात आले. १६२ रुग्णांची तपासणी आणि चिकित्सा करण्यात आली. या सर्व रुग्णांना मुंबई येथील नारी सामाजिक संघटना यांच्या माध्यमातून सर्व औषधे मोफत देण्यात आली.

---

## शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा सन्मान

**खोपोली** : खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या के.एम. सी.महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्ताने शिक्षकांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी संस्थेचे उपाध्यक्ष अबूबकर जळगावकर, कार्यवाहक किशोर पाटील, के.एम.सी. महाविद्यालयाचे अध्यक्ष दिलीप पोरवाल, प्राचार्य डॉ. दयानंद गायकवाड उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, शिपाई यांच्या सन्मान करण्यात आला.

---

## निवडक



### धनाजी जाधव सेवानिवृत्त

**नवीन पनवेल** : आरोग्य सहाय्यक धनाजी सीताराम जाधव प्राथमिक आरोग्य केंद्र वावंजे यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापून सेवानिवृत्ती समारंभ करण्यात आला. या कार्यक्रमासाठी शासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी काशिनाथ पाटील माजी सभापती, पंचायत समिती पनवेल, मदन मते, सरपंच कानपोली राजेश गोंधळी, सहचिटणीस शे.का.प, डॉ. अपर्णा खेडेकर, तालुका आरोग्य अधिकारी, पनवेल डॉ. प्रभाकर पाटील, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, वावंजे, डॉ. विजया पवार, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र वावंजे आरोग्य कर्मचारी तसेच आशा स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### तरूणाईला भजनाचा छंद



**खांब** : गणेशोत्सवादरम्यान होत असलेल्या जागरणाच्या कार्यक्रमात तरूणाई भजनाच्या प्रेमात पडून तरूणाईला भजनाच्या कार्यक्रमाचा छंद लागला असल्याचे दिसून येत आहे. रोहा तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यात धार्मिक तथा अध्यात्मिक क्षेत्रासाठी नावाजलेल्या तळवलीतर्फे अष्टमी या गावात गेली अनेक वर्षे तरूणाईनेदेखील गावातील जुन्या जाणत्या मंडळींचा आदर्श घेऊन गणेशोत्सव कालावधीत होत असलेल्या जागरणाकरिता भजनाचा मार्ग पत्करला असून, तरूणाई जणू काही भजनाच्या प्रेमातच पडली आहे. एरवी मोबाईल अथवा आपापल्या छंदात रमून जात असलेली तरूणाई पाहता आमच्या तळवली तर्फे अष्टमी येथील भजनाच्या कार्यक्रमात रंगून जाणाऱ्या तरूणाईने समाजासमोर एक आदर्श निर्माण केला असल्याची प्रतिक्रिया येथील सरपंच रवींद्र मरवडे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली आहे.



### प्रसाद साळवी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**कोलाड** : रोहा तालुक्यातील राजिप केंद्रशाळा पुगाव येथे कार्यरत असणारे प्रसाद यशवंत साळवी यांना सन २०२५-२६ चा रायगड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. नेहमीच विद्यार्थ्यांसाठी झटणारे उपक्रमशील शिक्षक अशी त्यांची तालुक्यात ओळख आहे. रोहा तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा खारी, शाळा वरसगाव आणि शाळा पुगाव या शाळांमध्ये त्यांनी गेले १९ वर्ष ज्ञानदानाचे उत्तम कार्य केले आहे. त्यांनी घडविलेले विद्यार्थी हे आज डॉक्टर, इंजिनियर, पायलट, शिक्षक, प्रशासक, समाजसेवक, यशस्वी व्यवसायिक तसेच मोठमोठ्या हुद्द्यांवर काम करताना दिसत आहेत. विद्यार्थ्यांना सर्वांगीण ज्ञानाबरोबर संस्कारक्षम शिक्षण देणे हे त्यांचे नेहमीच वैशिष्ट्य राहिले आहे. तसेच, शाळेचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यामध्ये त्यांची खूप मेहनत आहे. शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य, सांस्कृतिक, कला, क्रीडा या सर्वच क्षेत्रांमध्ये सरांनी नेत्रदीपक कामगिरी केली आहे.

### पोलीस ठाण्यातील बाप्पांना निरोप

**नागोठणे** : गणेशोत्सव काळात बंदोबस्तामुळे पोलीस कर्मचाऱ्यांना रजा मिळत नसल्याने रायगड जिल्ह्यातील बहुतांश पोलीस ठाण्यात गणेशोत्सव साजरा करण्यात येत असतो. त्यामुळेच गणेशोत्सव काळातील आपले कर्तव्य बजावुन गणपती बाप्पांची सेवा ड्युटीवर असतानाच करण्याची संधी पोलीस कर्मचाऱ्यांना मिळत असते. त्यानुसारच नागोठणे पोलीस ठाण्यालगत असलेल्या श्रीदत्त मंदिरात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही गणपती बाप्पांची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. गणेशोत्सव बंदोबस्तातून मोकळे झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी सायंकाळी आपल्या बाप्पांची वाजत गाजत मिरवणूक काढली. विसर्जन मिरवणुकीसाठी खास वेशभूषा केलेल्या महिला कर्मचारी, गणेश विसर्जनासाठी खास तयार केलेले टी शर्ट परिधान केलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी पारंपारिक बेंजोच्या तालावर ठेका धरत विसर्जन मिरवणुकीत मनसोक्तपणे नाचण्याचा आनंद लुटला.

---

## प्रलंबित वेतनवाढ कराराची पूर्तता

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंडा अर्बन बँकेच्या सभागृहात रविवारी (दि.७) को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन रायगड व दि. रेवदंडा को-ऑप. बँक ऑप. अर्बन बँक, रेवदंडा यांच्यामधील १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२५ या कालावधीतील प्रलंबित व्दिपक्षीय वेतनवाढ करारावर माजी केंद्रीय मंत्री आनंदराव अडसुळ तसेच रेवदंडा अर्बन बँक चेअरमन नजमुस्साकिब म.अ. लांबाते, उपाध्यक्ष धरती राऊत, संचालक वामन घरत, तसेच संचालक मंडळ व मुख्याधिकारी दिनेश माळी यांनी सह्या करून मंजूर करण्यात आला.



यावेळी रेवदंडा प्रधान कार्यालय, रेवदंडा शाखा, अलिबाग शाखा, रोहा शाखा, पोयनाड शाखेमधील सर्व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी माजी केंद्रीय मंत्री आनंदराव अडसूळ यांनी कर्मचारीवर्गास ग्राहकांशी प्रेमाने, सलोख्याने वागून बँकेच्या आर्थिक उन्नती व प्रगतीस प्राधान्य द्यावे व बँकेचे हित जोपासावे, असे मार्गदर्शन केले.

---

## शिवशंभो युवा हायकर्सकडून गणेशभक्तांना मदत

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरात वाहत्या पाण्यात बाप्पांचे विसर्जन केले जाते. सतत सुरु राहिलेल्या पावसामुळे उल्हास नदीचे वाढलेले पाणी ही मोठी समस्या बनली होती. त्यामुळे कर्जतमधील ३० वर्षे सेवा देणाऱ्या शिवशंभो युवा हायकर्सकडून गणेश भक्तांसाठी मदत करण्यासाठी हायकर्स तैनात होते. दरम्यान, सलग आठ तास शिवशंभो युवा हायकर्स यांनी गणेश घाटावर सेवा बजावण्याचे काम केले.

अनंत चतुर्दशीच्या दिवशी दहिवली गणेश घाटावर गावातील घरगुती गणपती आणि सार्वजनिक मंडळाच्या गणेश मुर्तीचे विसर्जन होत असते. गेले काही दिवस पाऊस सुरु असल्याने उल्हास नदी दुथडी भरून वाहत होती. त्यामुळे कर्जत शहरातील प्रति पंढरपूर येथील गणेश घाटावर भक्तांच्या सेवेसाठी शिवशंभो युवा हायकर्स यांनी आपले स्वयंसेवक यांची टीम तैनात ठेवली होती. सर्व ठिकाणी पोलीस पोहचू शकत नसल्याने शेवटी प्रशासनाला मदत करण्यासाठी कर्जत शहरात गेली ३० वर्षे आपत्तीच्या काळात सेवा देणारी शिवशंभो हायकर्स यांची मदत मिळाली. या कार्याबद्दल कर्जत पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांनी शिवशंभो हायकर्सचे कौतुक केले.

---

## पान १ वरून

### गेल प्रकल्पग्रस्तांना आश्वासनाचे गाजर

आंदोलन मोडीत काढण्यासाठी गेल प्रशासनाकडून पोलिसांची मदत घेण्यात आली. परिसरात जमावबंदी आदेश लागू करण्यात आले. मात्र, प्रकल्पग्रस्त व स्थानिक त्यांच्या भूमिकेशी ठाम होते. अखेर गेल कंपनी प्रशासन प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनासमोर नमले. जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत अलिबागमध्ये ११ जुलैला बैठक घेण्यात आली. या बैठकीत जिल्हाधिकारी यांच्या मध्यस्थीने प्रकल्पग्रस्तांच्या अनेक मागण्या मान्य करण्यात आल्या. प्रकल्पग्रस्त, स्थानिक, गेल कंपनी प्रशासन व पुनर्वसन विभागाचे अधिकारी या बैठकीत उपस्थित होते.

या बैठकीत कंत्राटी स्वरूपात २६० कामगारांना दहा दिवसांत कामावर घेतले जाईल. प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र वारसांना देणे, कंपनीत अग्रक्रमाने प्रकल्पग्रस्त, गावातील त्यानंतर दुसऱ्या गावांतील उमेदवारांना कंपनीत कामावर घेणे, प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरुपी नियुक्ती देणे, ७० टक्के सीएआर निधी प्रकल्पबाधित गावांतील ग्रामपंचायतींना वाटप करणे, अशा अनेक विषयांवर चर्चा झाली असून, जिल्हा प्रशासनाच्या मध्यस्थीने मागण्यांना मान्यता देण्यात आली. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी संप मागे घेतले. परंतु, दोन महिने होत आले तरीदेखील एकही प्रकल्पग्रस्त व स्थानिकांना कंपनीत कंत्राटी कामगार म्हणून घेण्यात आलेले नाही. कंपनीला कामगारांची यादी पाठविण्यात आली आहे. परंतु, त्याची कार्यवाही करण्यास जिल्हा पुनर्वसन अधिकारी उदासीन ठरल्याची प्रतिक्रिया प्रकल्पग्रस्त व स्थानिकांमधून उमटत आहे. प्रकल्पग्रस्तांना आश्वासनाचे गाजर दाखविल्याची चर्चा जोरात सुरु आहेत. याकडे जिल्हा प्रशासन गांभीर्याने लक्ष देईल का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### एसटीची जागा खासगी संस्थांच्या घशात

जिल्ह्यातील अलिबागसह अन्य स्थानकांचे नूतनीकरण करण्याचा निर्णय घेतला होता. अद्ययावत अशी कार्यालये, सर्व सोयी सुविधांसह सुसज्ज असे फलाट व प्रतीक्षा कक्ष या स्थानकांमध्ये होणार होते. त्यामुळे प्रवासी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मोठा गाजावाजा करीत जिल्ह्यातील बस स्थानकांच्या कामांचे भूमीपूजन करण्यात आले होते. त्यानंतर जागांचे माती परीक्षण झाले. नवीन स्थानके उभारण्याची हालचाली सुरु झाल्याने हे काम लवकर होईल, अशी आशा प्रवाशांना होती. परंतु, त्यांची मोठी निराशा झाली आहे.

**नूतनीकरण लाल फितीत**

जिल्ह्यातील स्थानकांचे नूतनीकरण अद्यापही लाल फितीतच अडकून असल्याचे चित्र आहे. भूमीपूजन होऊन आठ ते दहा वर्षे उलटून गेली आहेत. तरीदेखील त्या जागांमध्ये नवीन स्थानकांची निर्मिती करण्यास महामंडळ विभाग उदासीन ठरले आहे. परंतु, अन्य खासगी संस्थांना एसटीची जागा भाड्याने देण्यावर भर देण्यात आला आहे. स्थानके सुसज्ज नसल्याने प्रवाशांना अनेक असुविधांचा फटका बसत आहे. स्थानकात ठिकठिकाणी खड्डे पडले असून, स्थानकांच्या इमारतीचे स्लॅब कोसळण्याच्या घटना घडत आहेत. त्याकडे मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे चांगल्या स्थानकांचे स्वप्न कधी पूर्ण होणार, असा सवाल जनमानसातून उमटत आहे.

### रायगडात गिधाडांच्या संख्येत वाढ

पहिला आठवडा आणि शनिवार हा दिवस जगामध्ये गिधाड पक्ष्याबद्दल जनजागृती आणि संवर्धन वाटचालीतील महत्त्वाचा दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून सिस्केप संस्था महाड, वनपरिक्षेत्र कार्यालय महाड आणि नाणेमाची, वाकी दहिवड ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने वाकी दहिवडी येथे गावकऱ्यांसमवेत आंतरराष्ट्रीय गिधाड जनजागृती दिन साजरा करण्यात आला. राजस्थान, गुजरात, उत्तर प्रदेश, हिमाचल, पूर्वांचल आणि बंगाल येथून स्थलांतर करणारी स्थलांतरित गिधाडे ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यामध्ये महाड आणि रायगड परिसरात येतात. प्रदेशातील युरेशियन ग्रीफन व्हल्चर्स ही गिधाडेदेखील आपल्या रायगड जिल्ह्यात नोंदवली गेली आहेत. ही गिधाडे दोन महिने तरी आपल्या रायगड जिल्ह्यात वास्तव्यास असतात. त्यांच्या नोंदी सिस्केप संस्थेच्या माध्यमातून वारंवार घेण्यात आली आहेत.

**नामशेष होण्याची कारणे**

गिधाडे हे पर्यावरण स्वच्छ करणारे सफाई कामगार असल्याने पर्यावरण संवर्धनात गिधाडांचे मोठे महत्त्व आहे. जंगलतोड, वाढती लोकसंख्या, शेतीतील दुग्ध व्यवसायात होणाऱ्या उत्पादनवाढीसाठी औषध प्रयोग व पर्यावरणाचा बिघडता समतोल यामुळे गिधाडांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील निष्कर्षानुसार, गिधाडांच्या जंगल निवासस्थानाचे नुकसान होत आहे. शिवाय नदी प्रदूषण, अन्न आणि पाण्याची उपलब्धता, आफ्रिका, चीन, मंगोलिया, दक्षिण अमेरिकासारख्या देशांत गिधाड शरीराच्या अवयवांचा अवैध व्यापार नोंद, हत्तीची तस्करी करणारी मंडळी विषप्रयोग करून त्यावर येणाऱ्या गिधाडांना ठार मारतात. आधुनिक विकसित तंत्रज्ञान पद्धती इलेक्ट्रोक्युशन आणि पवन टर्बाइन यांचाही गिधाडांच्या उड्डाण मार्गात अडथळा होतो आणि ते मृत्युमुखी पडतात. यामुळे गिधाडे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

**गिधाडांविषयी जनजागृती**

रायगड जिल्ह्यात पांढऱ्या पाठीचे गिधाड, भारतीय लांब चोचीचे गिधाड या दोन प्रजातीची वीण होते. शिवाय काळे मोठे गिधाड, इजिप्शियन गिधाड, युरोपीय ग्रिफ्फन गिधाड आणि हिमालयीन ग्रिफोन गिधाड या प्रजाती हिवाळ्यात आपल्याकडे स्थलांतर करतात आणि काही काळ वास्तव्य करतात. गिधाडांची संख्येत वाढ होण्यासाठी त्यांचा अधिवास निश्चित करणे. पशुवैद्यकीय उपचारांमध्ये डायक्लोफेनाक सोडियमच्या वापरावर बंदी घालणे आणि जंगलातील गिधाडांच्या लोकसंख्येवर लक्ष ठेवणे, यासारखी विविध पावले सिस्केप संस्थेने तीन दशकात यशस्वी उचलली. अवघ्या २८ गिधाड संख्येवरून आणि दोन घरट्यावरून ही संख्या आज ८४ घरटी नोंद आणि ३४७ वर गणसंख्या नोंदविण्यात आली होती. नव्याने होणाऱ्या गणनेत गिधाडांची संख्या ४०० पर्यंत पोहचेल अशी आशा प्रेमसागर मेस्त्री यांनी व्यक्त केली.

### बाबू खानविलकरांसह चौघांविरोधात गुन्हा दाखल

हा गुन्हा रविवारी (दि.७) घटन घडल्यानंतर सागर खानविलकर आणि बाबू खानविलकर तसेच त्यांच्या सोबत असलेल्या सहकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलादपूर पोलिसांनी ई-साक्ष केली असून, या गुन्ह्याचा तपास तपासिक अंमलदार उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार शिंदे हे करीत आहेत.

### महाडमध्ये महिला कामगाराचा विनयभंग

बचाव करण्याचा प्रयत्न केला तरी आरोपीने पाठीमागून मिठी मारत अश्लील बोलणे सुरू केले. या घटनेनंतर पीडित महिलेने महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. याप्रकरणी व्यवस्थापकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वीही रसायनी पाताळगंगा एमआयडीसीतील एका नामांकित कंपनीत महिला कामगाराचा विनयभंग झाल्याची घटना घडली होती. त्यामुळे पुन्हा अशाच स्वरूपाचा प्रकार समोर आल्याने महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तसेच, या घटनेनंतर औद्योगिक वसाहतीत काम करणाऱ्या महिला कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कंपनी व्यवस्थापनाने महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही कामगार वर्गातून पुढे येत आहे.

### समुद्रकिनाऱ्यावर संशयास्पद कंटेनर

कंटेनर प्रवाहासोबत पालघर तसेच गुजरातच्या किनाऱ्यावर येण्याची शक्यता मत्स्यव्यवसाय विभागाने वर्तविली होती. अर्धवट तरंगणाऱ्या कंटेनरपासून बोटींना धोका होण्याची शक्यताही सांगण्यात आली होती. हे कंटेनर तरंगत सातपाटी व शिरगाव समुद्रासमोर खडकात अडकले आहेत. किनाऱ्यावर आलेले हे कंटेनर नेमके कसे, कुठून आले? त्यात काय आहे? याबाबत स्थानिक यंत्रणा व पोलीस शोध घेत आहेत. रविवारी समुद्राला सकाळी भरती असल्याने कंटेनरपर्यंत पोहोचणे सुरक्षा यंत्रणांना कठीण होते; मात्र ओहोटीनंतर कंटेनरपर्यंत पोहोचणे शक्य झाल्यानंतरच त्यांची तपासणी व त्याबाबत सुरक्षितता कळणे शक्य असल्याचे सातपाटी सागरी पोलिसांनी सांगितले.

# भात पिकांना सुरळी अळीचा धोका

## सूर्यप्रकाश मिळत नसल्याने रोगाचा प्रादुर्भाव, कृषी सहाय्यकांचे औषध फवारणीचे आवाहन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

**मागील काही दिवसांपासून सततच्या पावसामुळे भात शेतीला सुरळीच्या अळीचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे येथील शेतकरी चिंताग्रस्त झाले असून, भातशेती आडवी होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.**



जुलै ऑगस्ट महिन्यात पावसाने काही दिवस दडी मारल्याने उष्णता वाढली होती. मात्र, सध्या सततच्या पावसामुळे भात पिकांना सूर्यप्रकाश मिळत नसल्याने पिकांवर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मे महिन्यात झालेल्या पावसात शेतकऱ्यांच्या पेरण्या वाया गेल्या होत्या. त्यानंतर पावसाने दडी मारली होती.

तर दुसरीकडे शेतकऱ्यांनी अगदी मेहनतीने उभे केलेले पीक सध्या धोक्यात आले आहे. यावर शासन आणि कृषी विभागाने उपाययोजना करण्याचा विचार करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. एकेकाळी उरण तालुका भाताचे कोठार म्हणून ओळखला जात होता. मात्र वाढत्या औद्योगिक कारणामुळे तालुक्यात भात शेतीच्या लागवडीचे क्षेत्र कमी झाले आहे.

तालुक्यात आजही पारंपरिक पद्धतीने भातशेती केली जाते. मात्र, पावसामुळे बऱ्याचशा ठिकाणी खरीपाची भात पेरणी जशी हवी तशी न झाल्यामुळे भाताची रोपे उगवलीच नाहीत.

मूळ पेरणीला संधी न मिळाल्याने शेतीला सूर्यकिरणांची उब आवश्यक असताना, ती मिळालीच नाही. त्यामुळे रोपे कमकुवत झाली. त्यानंतर शेतकऱ्यांनी कशीबशी शेतीची लागवड पूर्ण केली. मात्र, त्यानंतर पावसाने एवढा कहर केला की, भातपिके गारठून गेली आहेत. जमिनीत सतत ओलावा राहिल्यामुळे, भात पीके फारसी फोफावलेली दिसत नाहीत. महागडे बियाणे, वाढत्या मजुरीचे दर आणि आता भात पिकांना सुरळीच्या अळ्यांचा धोका यामुळे येथील शेतकरी मेटाकुटीला आला आहे.

भात पिकांची हिरवी पाती तपकिरी रंगाची होत असल्याचे शेतकऱ्यांनी तालुका कृषी विभागाला कळविण्यात आले आहे. दरम्यान पाऊस थांबून भात पिकांना सूर्यप्रकाश भरपूर प्रमाणात मिळाला. तर भातपिके रोगाला सहसा बळी पडणार नसल्याचे मत कृषी विभागाने व्यक्त केले आहे.

> शेतात पाणी साचून राहिल्याने भात पिकांवर सुरळीच्या अळी पडत असतील तर कृषी सेवा कार्यालयाकडून विशिष्ट औषधांची फवारणी करावी. यासाठी उरण तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायत कार्यालयात याबाबतचा तक्ता लावण्यात आला आहे.
>
> – सुषमा गायकवाड
> कृषी सहाय्यक अधिकारी चिरनेर

## महाडमध्ये निबंध स्पर्धेला प्रतिसाद

**महाड** : मागील आठ दशकांपेक्षा जास्त काळापासून महाडच्या ऐतिहासिक भूमी १० सप्टेंबर १९४२ रोजी किसान मोर्चावर इंग्रज शासनाने केलेल्या अंधाधुंद गोळीबारातील पाच भारत मातेच्या सुपुत्रांच्या आठवणींना उद्या महाडमध्ये उजाळा दिला जाणार असून यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या ८३ व्या स्मृतिदिनानिमित्त संयोजन समितीमार्फत महाड तालुकास्तरीय वक्तृत्व तथा निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते वक्तृत्व स्पर्धेसाठी मराठी व हिंदी भाषेत आपले विचार व्यक्त करण्याची संधी देण्यात आली होती. या स्पर्धेकरता ६० पेक्षा जास्त विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला तर निबंध स्पर्धेमध्ये तालुक्याच्या जवळपास ४०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आपले विपुल लेखन देण्याची माहिती संयोजन समितीमार्फत देण्यात आली .

## निवडक



### गणेश घाटांची स्वच्छता

**नेरळ** : कर्जत शहरात अनंत चतुर्दशीनिमित्त गणपती बाप्पांचे विसर्जन झाले आहे. त्यावेळी गणेशभक्तांकडून विसर्जन सोहळ्यात काही निर्माल्य घाटावर पडले होते. ते सर्व निर्माल्य गोळा करून एकत्र करण्याचे काम कर्जत शहरातील शिव मल्हार गटाने हाती घेतले होते. त्याच्या या सामाजिक कार्याबद्दल कौतुक होत आहे. नगरपरिषदेच्या वतिने बांधण्यात आलेल्या निर्माल्य कलश ठेवण्यात आले होते. मात्र सर्व गणेश घाटांवर बाप्पांवर केलेल्या पुष्पवृष्टीमधील फुले तिथेच पडून राहिले होते. हे सर्व साहित्य उचलून घाट स्वच्छ करण्याची मोहीम या गटाने आपल्या खांद्यावर घेतली. सागर सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली दहिवलीतर्फे उल्हास नदी आश्रम या घाटावर स्वच्छता मोहीम घेण्यात आली. स्वच्छता मोहिमेसाठी ओमकार कनोजे, लावण्या कनोजे, ईशांत मालुसरे, सार्थक गुरव, वेदांत सुपे, गौरव मूर्ती, यज्ञेश कनोजे, युगान सुर्वे, भव्य सुर्वे, तन्वी कनोजे, संकेत वरदाळे, नेत्रा कनोजे यांनी एकत्र येत गणेश घाट स्वच्छ करून गोळा झालेले निर्माल्य संकलित करून नगरपरिषदेच्या गाडीपर्यंत नेवून दिले.



### तळ्यात गणरायाचे विसर्जन

**तळा** : गणेश चतुर्थीला, सार्वजनिक गणेशमूर्तींच्या विसर्जनाला आपले कर्तव्य बजावत असलेल्या तळा पोलिसांनी रविवारी पोलीस ठाण्यात विराजमान झालेल्या आपल्या लाडक्या गणरायाला वाजत गाजत निरोप दिला. प्रत्येक सणाला कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असल्याने पोलिसांना आपल्या परिवारासोबत वेळ घालवता येत नाही तसेच कोणते सणही साजरे करता येत नाही. त्यामुळे दरवर्षी पोलीस ठाण्यात गणरायाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून कर्तव्य बजावत असल्याने पोलीस ठाण्यातील गणरायाचे विसर्जन गणेश चतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी केले जाते. सायंकाळी पाच वाजता तळा पोलीस ठाण्यातून बाप्पाच्या मिरवणुकीला सुरुवात झाली पारंपरिक खालुबाजावर सर्व स्टाफने ठेका धरला होता. 'गणपती बाप्पा मोरया पुढल्या वर्षी लवकर या' च्या जयघोषाने मिरवणुकीचा आनंद लुटला. या मिरवणुकीत शहरातील नागरिक तसेच राजकीय मान्यवर देखील सहभागी झाले होते. रात्री आठच्या सुमारास आरती करून पोलीस ठाण्यातील गणरायाला निरोप देण्यात आला.

### श्री जोगेश्वरीची वार्षिक सभा

**नागोठणे** : नागोठण्यातील नावाजलेल्या श्री जोगेश्वरी मर्चंट सहकारी पतसंस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा येथील शिवगणेश सभागृहात रविवारी (दि. ७) सायंकाळी उत्साहात संपन्न झाली. यावेळी किशोरशेठ जैन यांच्यासह उपाध्यक्ष प्रकाश जैन, नागोठण्याच्या सरपंच सुप्रिया महाडिक, संजय भोसले, राजेश पोवळे, पतसंस्थेचे सचिव संजय काकडे, संचालक डॉ. मिलिंद धत्रक, रितेश दोशी, राजकुमार जैन, मोहन नागोठणेकर, विजया परमार, कल्पना टेमकर, दीपिका गायकवाड, शबाना मुल्ला, व्यवस्थापक सुनील नावले आदींसह अनेक मान्यवर व सभासद यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.



### शिवनाथ बाबांनी घेतला संन्यास

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील वारकरी संप्रदायमधील ज्येष्ठ प्रवचनकार शिवराम तुपे यांनी आपल्या सांसारिक जीवनाचा त्याग करीत संन्यास घेतला. नाथ संप्रदायात सहभागी होण्याचा निर्णय घेतल्यावर शिवराम तुपे यांचे नाव आता श्री शिवनाथ बाबा असे ठेवले गेले. दरम्यान तुपे यांच्या संन्यास कार्यक्रमाला त्यांचे सर्व कुटुंबीय आणि तालुक्यातील असंख्य वारकरी उपस्थित होते. नेरळ जवळील देवपाडा गावातील प्रवचनकार आणि १९८९ पासून माळकरी बनलेले तुपे यांनी वारकरी संप्रदायात अनेक वर्षे सेवा केली आहे. पत्नी सिंधू, पुत्र रामदास, दिलीप कन्या संगीता राणे, भारती राणे आणि बायजा राणे हे उपस्थित होते.

# नेरळमध्ये शिक्षकांची वैद्यकीय तपासणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयात शाळेत शिक्षण देणारे शिक्षकांची शिक्षक दिनाचे औचित्याने साधून नेरळ कळंब रस्त्यावरील धामोते येथील नेरळ मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल क्रिटिकल केअर सेंटर यांच्या माध्यमातून तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षण देणाऱ्या शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचार आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराचे उद्घाटन आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले.



याप्रसंगी महेश विरले, विवेक पोतदार, रमेश कुंभार, सचिन अभंगे, मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल डॉ. विवेक भगत, दिलीप म्हसे, संतोष कांबरी, अनिल बडेकर, शरद कुंभार, डॉ. ज्ञानेश्वर मगर, डी. के. म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरामध्ये ७७ शिक्षकांनी वैद्यकीय सुविधेचा लाभ घेतला. यावेळी डॉ. विवेक भगत, डॉ. दिपक सिंग,डॉ. हेमंत इंगोले, डॉ. श्रुती शिंदे, डॉ.मिनिष काटकर या वैद्यकीय पथकाने शिक्षकांची आरोग्य तपासणी केली.

## गतिरोधक बसविण्याची मागणी

**रसायनी** : दांड-रसायनी रस्त्यावरील चांभार्लीचा उतार हा जीवघेणा असून या रस्त्यावरून प्रवास करताना अनेकांना जीवाला मुकावे लागले आहे. या रस्त्याच्या उतारालगत दुकाने, कार्यालये आहेत. येथे नागरिकांची नेहमी रहदारी असते. शिवाय रस्त्यालगत शिशुविकास बालमंदिर, जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, प्रिआ स्कूल आदी असल्याने रस्ता ओलांडत असताना जीव मुठीत घेऊन ओलांडावा लागत असल्याने गतिरोधक बसवावेत अशी, मागणी नागरिक करीत आहेत.

# महसूल अभियानात म्हसळा उत्कृष्ट

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

राज्य सरकार अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान अभियान सुरू करण्यात आले आहे. नागरिकांना विविध योजनांचा लाभ मिळावा यासाठी राज्यभरात शासकीय यंत्रणा सुसज्ज करून त्याद्वारे हे अभियान राबविले जात आहे. म्हसळा तालुक्यात हे अभियान अतिशय उत्कृष्टपणे राबविण्यात येत असून प्रांत महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार सचिन खाडे आणि संपूर्ण महसूल कर्मचारी तसेच विविध कार्यालयाकडून हे अभियान यशस्वी होत आहे. जिल्ह्यातील पहिल्या पाच तालुक्यामध्ये म्हसळा तालुक्याचे नाव आहे. या अभियानात तहसील विभागासह, पंचायत समिती, कृषी विभाग, आरोग्य विभाग यांनी आयुष्यमान कार्ड, आभा कार्ड, रेशनकार्ड इत्यादी दाखले काढण्यासाठी चांगले सहकार्य लाभल्याबद्दल आभार मानले. या शिबिरास अल्पसंख्यांक मंडळाचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले, प्रांत महेश पाटील, तहसीलदार साचिन खाडे, निवासी नायब तहसीलदार डॉ. मृणाली शिरसाठ, महेश शिर्के, सलीम शहा, साचिन धोंडगे, सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ, आशा सेविका, रेशन दुकानदार, कोतवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

# रेल्वे पोलिसांची उत्तम कामगिरी

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत लोहमार्ग पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई गोरख मासाळ व पूजा मने हे दि. ७ सप्टेंबर २५ रोजी कर्तव्यावर असताना दुपारी १ वाजेच्या सुमारास नेरळ स्टेशन येथे कर्तव्यावर असलेले पो. शि. श्रीकांत जाधव यांनी फोनद्वारे कर्जतवरून दुपारी १ वा. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनलला जाणारी लोकल गाडीच्या प्रथम वर्गाच्या डब्याच्या बाजूचा जनरल डब्यामध्ये एक बॅग राहिली आहे. तरी तुम्ही ती गाडी चेक करण्याच सांगितले कर्तव्यावर असलेल्या मासाळ व मने यांनी लोकल डब्बा चेक केला असता बॅग मिळून आली. बॅग चेक केली असता सदर बॅगमध्ये १ लॅपटॉप, स्मार्ट वॉच, व इतर साहित्य व कागदपत्रे मिळून आले. ज्यांच्या वस्तू होत्या त्या प्रवाशाला पोलीस स्टेशनला बोलवून सविस्तर चौकशी केली असता शिवा आकुज डाकुआ, वय ३४ वर्ष, राहणार धामसे नेरळ असे सांगितले. त्याने त्यांचे साहित्य तपासले असता ते बरोबर आहे. सर्व साहित्य जसेच्या तसे मिळून आले आहे. म्हणून त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी खाडे व कर्जत रेल्वे पोलिसांचे आभार मानले आहेत.

# रस्त्यासाठी करंजवाडी ग्रामस्थांचे प्रांत अधिकाऱ्यांना निवेदन

**। रोहा । प्रतिनिधी ।**

देशाला स्वातंत्र्य मिळवून कित्येक वर्ष उलटली तरी रोहा तालुक्यातील करंजवाडी या गावाला साधा रस्ता नाही स्थानिक आमदार, खासदार लक्ष घालत नाही सदर ग्रामस्थांना न्याय देण्याकरिता शरद पवार गट पक्षाच्या नेते आक्रमक झाले असून त्यांनी ग्रामस्थ महिलांचे मोर्चाद्वारे शासनाला निवेदन दिले. यावेळी उपस्थित महिला ग्रामस्थ तरुणवर्गांनी लोकप्रतिनिधी व शासनाच्या विरोधात संताप व्यक्त केला आहे.





धोंडखार ग्रामपंचायत हद्दीतील करंजवाडी येथे धनगर समाजाचे लोकवस्ती आहे. गेले कित्येक वर्षे या वस्तीला रस्ता नाही ग्रामस्थांनी अनेक राजकीय नेत्यांचे उंबरठे झिजवले, परंतु कोणीही दखल घेतली नाही. या वस्तीवरील कोण व्यक्ती आजारी पडला. महिला गरोदर असेल तर डोलीमध्ये न्यावे लागते अशी भयावह अवस्था ग्रामस्थांची आहे.

सदर ग्रामस्थांनी शरद पवार गट पक्षाचे रोहा तालुका अध्यक्ष तुषार खरीवले यांची भेट घेतली व व्यथा मांडली. यावेळी तातडीने या गंभीर प्रश्नाने दाखल घेत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ( शरद पवार ) गटाचे जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या समवेत अन्य कार्यकर्ते मंडळींना रोह्यात बोलावून ग्रामस्थातर्फे सार्वजनिक बांधकाम विभाग व प्रांत अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांना निवेदन दिले. यावेळी जिल्हाध्यक्ष चव्हाण यांनी रोह्यातील लोकप्रतिनिधी बद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. करंजवाडी येथील लोकांना आपण पारतंत्र्यात आहोत असे वाटते. साधा रस्ता नाही त्यामुळे यापुढे शासनाने जर रस्ता केला नाही तर आम्ही ५० कुटुंबे आमची चिता रचू असा इशारा ग्रामस्थांनी दिला.

# नागोठणे पोलीस ठाण्यातील बाप्पांना भावपूर्ण निरोप

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सव काळात नागोठणे शहर व ग्रामीण विभागात कोणताही अनुचित प्रकार घडु न देण्याची आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडल्यानंतर कर्मचाऱ्यांनी आपल्या लाडक्या गणपती बाप्पांना भावपूर्ण निरोप दिला. अंबा नदी किनारील विसर्जन घाटावर रविवारी (दि. ७) रात्री ९.०० वा.च्या सुमारास मोठ्या उत्साहाने संपन्न झालेल्या बाप्पांच्या विसर्जन सोहळ्यास नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी, पोलीस उपनिरिक्षक राजहंस नागदिवे, जि. डी. पावरा, नरेश



थळकर, सुरज पाटील यांच्यासह सर्व पोलिस कर्मचारी, त्यांचे कुटुंबिय, पत्रकार व नागरिक सहभागी झाले होते.

बंदोबस्तामुळे कर्मचाऱ्यांना रजा मिळत नसल्याने त्यांना आपल्या गावी जाता येत नाही. त्यामुळेच जिल्ह्यातील बहुतांश पोलीस ठाण्यात गणेशोत्सव साजरा करण्यात येत असतो. गणेशोत्सव काळातील आपले कर्तव्य बजावून गणपती बाप्पांची सेवा ड्युटीवर असतानाच करण्याची संधी कर्मचाऱ्यांना मिळत असते. त्यानुसारच नागोठणे पोलीस ठाण्यालगत असलेल्या श्री दत्त मंदिरात दरवर्षी प्रमाणे यावर्षीही गणपती बाप्पांची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. अनंतचतुर्दशीच्या बाप्पांचे विसर्जन करण्यात आल्यामुळे गणेशोत्सव बंदोबस्तातून मोकळे झालेल्या कर्मचाऱ्यांनी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास आपल्या बाप्पांची वाजत गाजत मिरवणूक काढली. त्यांच्या कुटुंबियांनी पारंपारिक बेंजोच्या तालावर ठेका धरत विसर्जन मिरवणुकीत मनसोक्तपणे नाचण्याचा आनंद लुटला.

# प्रा. डॉ. साळुंखे यांना शिक्षक रत्न पुरस्कार प्रदान

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

भाऊसाहेब नेने महाविद्यालय पेण येथील प्राध्यापक डॉ. मधुकर हेमराज साळुंखे यांना त्यांच्या उत्कृष्ट अध्यापन, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान, सामाजिक कार्य यासाठी या वर्षाचा साहित्यसंपदा, पेणचा शिक्षक रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.



प्रा. डॉ. साळुंखे यांचे शिक्षण क्षेत्रात ३२ वर्षाचे योगदान आहे. या प्रदीर्घ शैक्षणिक वाटचालीत त्यांनी मार्गदर्शन केलेले अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्यरत असून नावलौकिक मिळवत आहेत. शैक्षणिक कार्याबरोबरच त्यांनी वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन, रक्तदान शिबीरे, आरोग्य तपासणी शिबिरे, व्यसनमुक्ती, मतदार जनजागृती, गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत यात त्यांचे फार मोठे योगदान आहे. ५ सप्टेंबर या शिक्षक दिनानिमित्त त्यांना या पुरस्काराने गौरवण्यात आले.

## गणेश पेठ मंडळाची मोहीम | गणेश मुर्तींचे पुन्हा विसर्जन

# दिवेआगरचा समुद्र किनारा स्वच्छ

**। दिघी । प्रतिनिधी ।**

**श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन परिसरात विविध सामाजिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमात अग्रेसर असणाऱ्या गणेश पेठ खोती मंडळानी दिवेआगर समुद्रकिनारी रविवारी स्वच्छता केली.**



गेल्या काही दिवसामध्ये दीडदिवस, पाचदिवस व दहा दिवसाच्या गणपतीचे विसर्जन या शनिवारपर्यंत करण्यात आले. यावेळी दिवेआगर समुद्रकिनारी दिवेआगर व बोर्लीपंचतन शहरातील हजारो घरगुती गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. त्यावेळी गणेश मूर्तीबरोबरच मोठ्या प्रमाणात समुद्रात सोडले गेले. समुद्राला ओहोटी लागल्यानंतर किनाऱ्यावर जमा झालेल्या या मूर्ती दिवेआगर समुद्रकिनारी परत आलेले सर्व निर्माल्य तसेच किनाऱ्यावर साचलेला प्लॅस्टिकचा किंवा अन्य कचरा उचलून त्याचे पुनर्विसर्जन करण्यात आले. एका अर्थी, महिलांनी हा उपक्रम यशस्वी करून अनेकांसाठी एक नवा पायंडा घालून दिला आहे.

गणेश पेठ खोती महिला मंडळातील सभासदांनी मिळून मागील कित्येक वर्षे आपले सामाजिक कार्याचे भान जपले आहे.

दरवर्षी मोठ्या प्रमाणात गणेश मूर्तींचे विसर्जन होते, व नंतर दुसऱ्या दिवशी श्री मूर्तींचे भग्न अवशेष किनारी इतरत्र पडलेले असतात. त्याची विटंबना होऊ नये म्हणून या विसर्जनाच्या दुसऱ्या दिवशी गणेश मूर्तींचे पुनर्विसर्जन करतात. दिवेआगर समुद्र किनारा व आसपासचा परिसर स्वच्छ करुन वेळोवेळी प्रत्यक्ष कृतीद्वारे स्वच्छतेचा संदेश दिला आहे.

पर्यावरणपीरक भूमिका सदैव घेत असून, त्यानुसार आम्ही समुद्र किनारा स्वच्छ केला असल्याचे महिलांनी यावेळी सांगितले. दरम्यान, या सामाजिक कार्याबद्दल त्याचे कौतुक होत आहे.

> **जनजागृती गरजेची**
>
> पर्यावरणाला घातक मूर्ती खरेदी करू नका याबाबत जनजागृती केली जाते पण त्याचा वापर पूर्णपणे बंद होताना दिसत नाही. किनारे स्वच्छ करतात पण जनजागृती होऊन मतपरिवर्तन होणे गरजेचे आहे त्यासाठी सुशिक्षित लोकांनी पुढे येऊन स्वतः शाडूच्या मूर्ती आणणे गरजेचे आहे.

# आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

गेल्या महिनाभरापासून मुरुड शहराला गढूळ अशुद्ध पाणी पुरवठा होत आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेऊन नगरपरिषदेला शुद्ध पाणी पुरवठा करण्यात निर्देश देण्यात यावेत याबाबत संजय गुंजाळ यांनी बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांना एक निवेदन देण्यात येऊन मागणी करण्यात आली आहे. सद्यस्थितीत नगरपालिकेचे पाणीपुरवठा व्यवस्थेकडे दुर्लक्ष झाले आहे. दुषित पाणीपुरवठा होत असल्यामुळे शहरात रोगराई पसरलेली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. संजय गुंजाळ यांनी देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबाग, श्रीबाग येथे घरकाम व जेवणासाठी बाई पाहिजे आहे. पगार : रू.८,०००/- संपर्क : ९३७२४८०५५४
- मेडिकल एजन्सीमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत शैक्षणिक पात्रता - १० वी व १० वीच्या पुढे मो नं. ९५०३३५५८८६/८६९८१३४६८९ तसेच मालाच्या डिलीव्हरी साठी ड्रायव्हर पाहिजे.
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, मोरी सहाय्यक (Helper) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबाईल : ७५५९१८४६१२
- दुकान गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग एसटी स्टँडजवळ ९७६४५४८६७९
- Teachers Required : Full Time/Part Time Teachers are to be appointed Subjects : Science, Maths, English. Std : 8th,9th. Job location : Alibag. Attractive Salary. Apply : shikshaknokri@gmail.com

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे कुशिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक १. शरद नथू बडेकर, २. हेमा शरद बडेकर ३. गिलबर्ट बाप्टीस्ट डिसोझा या मालकांपैकी गिलबर्ट बाप्टीस्ट डिसोझा यांच्या अविभक्त मालकीच्या क्षेत्राची मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १५/१ | एकुण क्षेत्र ४-९२-०० पैकी विकत देणार गिलबर्ट बाप्टीस्ट डिसोझा यांचे मालकीचे विक्री केलेले क्षेत्र १-६४-०० | १-३१ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०९/०९/२०२५

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता गाळा नं. ०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता.कर्जत,जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे - आढे, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.-पॉ. | रुपये | पैसे |
| सुर्याजी विठ्ठल शेळके व इतर | ६७ | ९अ | ०-४८-३० | ५ | ५० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/ -
**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ०९/०९/२०२५
मो. नं. ९०२८९८२२७७

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता.कर्जत, जि.रायगड.४१०२०१ ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक ऋषिकेश अरुण गायकवाड व विद्या ऋषिकेश गायकवाड यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे कुशिवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १७/१ | एकुण क्षेत्र ०-७२-०० हे आर पॉ | ०-४१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०९/०९/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
**मोबा. ८५३०१४६८५४**
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे**
**मोबा. ९८२२६९११०९**
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९. तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर. अमराई रोड. कर्जत ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं.. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चौरस मिटर | रुपये | पैसे |
| भुषण शिवाजी इरमाळी, स्वप्नील शिवाजी इरमाळी | २६/१/अ/२८/क | १० | २७८.४३ | २७ | ८५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही /-
**ॲड. नितीन अर्जुन क्षिरसागर**
दिनांक : ०९/०९/२०२५
मो.नं.९३७२९६४६६५

कार्यालयीन पत्ता :- शॉप नं.२, तळमजला, साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ, नेरळ पूर्व, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०१०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-सातघर, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर ५, क्षेत्र ०-२६-२० हे.आर; पो.ख. ०-०६-३० हे.आर; एकूण क्षेत्र ०-३२-५० हे.आर; आकार ६.६४ रू.पैसे ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक स्मिता प्रकाश पाटील, रा.मु. सातघर, पो. नारंगी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : ८/०९/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता : श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो; ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

## पनवेल महानगरपालिका

पनवेल महानगरपालिके मार्फत विविध प्रकाराचे उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमांच्या जनजागृती करिता पथनाट्य सादर करणेकामी जाहिर ई निविदाद्वारे वार्षिक दर मंजूर करणेबाबत सदर निविदेचा तपशिल www.mahatender.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

जा.क्र.पमपा/भांडार/४७२५/प्र.क्र./७१८/२०२५

दिनांक : ०४/०९/२०२५

सही /-
**(गणेश शेटे)**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे.बोपेले, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकतीचे मालक मे.दक्षिणा बिल्डर्स भागीदारी तर्फे भागीदार धीरज लधाराम सेगानी व इतर ४ यांची सदर खालीलप्रमाणे वर्णन केलेली बिनशेती मिळकत विकत घेणेचे ठरविलेले आहे.

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ५० | १४ | ७९९-०० | ७९-९० |

सबब सदरबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक ०७/०९/२०२५

**ॲड. शिवाजी किसन टोकरे**
पत्ता-शॉप नं.:९, समर्थ कृपा हौसिंग सोसायटी नेरळ, महेश टॉकीज जवळ, नेरळ ता.कर्जत, जि.रायगड
पिनकोड नं. ४१०१०१
फोन नं.७३५०१९४२००

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.प्रविण तुकाराम घरत, रा. चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड यांचे कडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतींचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) (बिनशेती) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चेंढरे ता.अलिबाग | २०/१/ब/७ | ८-५०-०० | ८५-०० |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग,
दि. ०८-०९-२०२५.

सही/-
**ॲड.आर.बी.कोसमकर**
चिरायु बिल्डींग, राम मंदिर शेजारी ब्राम्हण आळी अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन विकसीत करण्याकरीता घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या विकसन कराराच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला विकसन करारनामा लिहुन व नोंदवुन ठेवतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - बोपेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं.. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चौरस मिटर | रुपये | पैसे |
| १) श्री.अरविंद रघुनाथ बाबरे, | २९/२/ब | ३ | २८८.८४ | २८ | ८८ |
| २) श्री.नारायण वाळकु बाबरे, | २९/२/ब | ४ | २८१.१२ | २८ | ११ |
| ३) श्री.अजय मारुती बाबरे | | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- शॉप नं.२, तळमजला, साईकृपा सोसायटी, नेरळ बस स्टॅण्डजवळ, नेरळ पूर्व, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०१०१

सही/-
**ॲड. नितीन अर्जुन क्षिरसागर**
(ॲडव्होकेट)
दिनांक : ०९/०९/२०२५
मो.नं.९३७२९६४६६५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-सातघर, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर ३, क्षेत्र ०-२७-२० हे.आर; पो.ख. ०-०६-५० हे.आर; एकूण क्षेत्र ०-३३-७० हे.आर; आकार ६.८९ रू.पैसे ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक प्रभाकर रघुनाथ पाटील, रा.मु. सातघर, पो. नारंगी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : ८/०९/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता : श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो; ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक श्री. अनंता हाल्या दळवी यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| भुमापन क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर. | आकारणी रु.पै |
|---|---|---|---|
| ८ | २० | ०-१०-०० क्षेत्र मिळकतीचे | ०-१२ |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक : ०९/०९/२०२५

**ॲड. मोनाली रामदास हजारे**
एम.कॉम. एल. एल. बी.
पत्ता: दहिवली, ए. व्ही. एफ. रेसिडेन्सी, ललानी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९२६०१०९२८२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची बिन शेतीजमिन मिळकत त्याचे मालक मंजूर रियाज बुबेरे यांचे कडून कायमची विकत घेण्याचे ठरले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : साळोख तर्फे वरेडी, तालुका कर्जत, जिल्हा : रायगड**

| सं.नं./हि.नं. | क्षेत्रफळ एकर.आर चौ. मी | आकार रू. पै |
|---|---|---|
| १५/२ | ६४.०० पैकी विकत देणार यांच्या मालकीचे क्षेत्र २४.०० चौरस मिटर | २४०.०० |

वर नमूद केलेल्या मिळकतीच्या संबंधात कोणास काही कायदेशीर हक्क, अधिकार व हितसंबंध, गहाण, दान, फरोक्त, वहिवाट, दावा, करार, बोजा, वहिवाट, वारसा, मृत्युपत्र, बक्षीसपत्र, विसारा, पावती, साठेखत, जनरल मुखत्यारपत्र, बँकेचे अगर कोणत्याही प्रकारची हरकती व कोणत्याही प्रकारचा बोजा असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपले वकिला/प्रतिनिधी मार्फत ही जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेलेच्या दिवसापासून १४ दिवसांचे मुदतीत आपल्या हरकती लेखी व कागदपत्रांसोबत कळवाव्यात, जर नमूद केलेल्या मुदतीत कोणीही हरकती न कळविल्यास कोणाचीही काही एक हरकत नाही असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार करतील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे नोटीस आहे.
दि. ०६/०९/२०२५

**ॲड. ज्ञानेश्वर हरिश्चंद्र राणे**
२०२, तैयब अर्पा, दुसरा मजला, सेंट्रल बँकेच्या मागे, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो. ९४२२०७१११२

## जाहीर नोटीस

मुरूड येथील मे. तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण सो. यांचे कोर्टात

दावा क्रमांक /२०२५

श्रीम. हिराबाई नथुराम सुभेदार व इतर ... अर्जदार

विरूद्ध

नबाबजादी कमरूजमाबेगम सि. महमदखान नवाब व इतर ... सामनेवाला

सर्व लोकांस कळविण्यात येते की, सदर नोटीसीतील वर्णन केलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत अर्जदार यांनी या न्यायालयात कुळवहिवाट दावा क्रमांक /२०२५ दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | जुना सर्व्हे क्रमांक | नवीन सर्वे क्रमांक | एकूण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सावरोली ता. मुरूड | २३/१ | २३/१ | १.४६.८० | १३.१३ |

सदर दाव्याच्या सुनावणीच्या नोटीसा अर्जदार व सामनेवाले यांना देण्यात आल्या असता खाली नमूद केलेल्या सामनेवाले यांना नोटीसांची बजावणी झाली नसल्याने अर्जदार यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याची विनंती केली आहे.

१) नबाबजादी कमरूजमाबेगम सि. महमदखान नबाब
२) मिसेस फातिमाबेगम जसदनवाला
३) मिसेस मुमताजमाबेगम सलीम खान सामनेवाला
४) सि. शहामदमूदखान सि. महमदखान नबाब
सर्व राहणार मुरूड, ता. मुरूड

अर्जदार यांनी मौजे सावरोली, ता. मुरूड, जि. रायगड येथील जुना सर्व्हे २३/१, नवीन सर्व्हे नं. २३/१ क्षेत्र १.४६.८०, आकार १३.१३ रू. पै. लागवड भात या मिळकतीसंदर्भात या न्यायालयात मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन न्यायाधिकरण, १९४८ च्या कलम ७० ब प्रमाणे संरक्षित कुळ असल्याचे ठरवून मिळणेकरीता दावा दाखल केला आहे.

दाव्याची पुढील सुनावणीची तारीख दि. १६.९.२०२५ रोजी निश्चित करण्यात आली आहे. वरील सामनेवाले यांनी सुनावणी कामी स्वतः किंवा प्रतिनिधी यांच्यामार्फत उपरोक्त सुनावणीच्या तारखेस व वेळी या न्यायालयात हजर रहावे. सुनावणीकामी आपण स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधी मार्फत गैरहजर राहिल्यास कागदपत्राच्या आधारावर गुणवत्तेवर निर्णय दिला जाईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**आदेश डफल, रोहन शिंदे**
अप्पर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, मुरूड-जंजिरा


**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**



**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनिमय क्र. ५.१.१ (i) चे तरतुदींना अनुसरुन उक्त अधिनियमातील कलम २० (३) चे तरतूदींनुसार सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**सहायक संचालक, नगर रचना,**
**रायगड अलिबाग शाखा कार्यालय रायगड**
**सूचना**

ज्याअर्थी, राज्य शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ''उक्त अधिनियम'' असे संबोधिले आहे) नुसार, महाराष्ट्र राज्यातील विविध प्रदेशांसाठी प्रादेशिक योजना मंजूर केल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१ कक) (ग) व २० (४) मधील तरतुदींनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र.-२३६/१८/डिपी व आरपी/कलम ३७ (१कक) (ग) व कलम २० (४)/नवि-१३, दि. ०२.१२.२०२० अन्वये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली महाराष्ट्र राज्याकरिता (काही अपवाद वगळता) मंजूर केली असून, दि. ०३.१२.२०२० पासून अंमलात आलेली आहे व ती प्रादेशिक योजना क्षेत्रांकरिता लागू आहे (यापुढे ''उक्त नियमावली'' असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, सदर नियमावलीमधील विनियम क्र. ५.१.१ चे तरतुदींनुसार महानगरपालिकेच्या हद्दीपासून २ कि.मी., नगरपरिषदेच्या हद्दीपासून १ कि.मी. आणि नगरपंचायतीच्या हद्दीपासून ०.५० कि.मी. अंतरातील प्रादेशिक योजनेचे क्षेत्रामध्ये, जिथे प्रादेशिक योजनेत झोन नकाशे तयार केलेले आहेत किंवा तयार केलेले नाहीत, अशा क्षेत्रांसाठी योग्य रस्त्यांच्या जाळ्यांचे नकाशे तयार करणेचे आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीतील विनियम क्र. ५.१.१ चे तरतुदीनुसार प्रादेशिक योजना क्षेत्रातील प्रारूप रस्त्यांच्या जाळ्यांच्या नकाशांबाबत उक्त अधिनियमाच्या कलम २० (३) चे तरतुदीनुसारची कार्यवाही पूर्ण करणेकरिता शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. टिपीएस- १८२०/६१४/प्र.क्र.७९/२०२१/नवि-१३, दि. २७.०३.२०२५ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम १५४ चे तरतुदीनुसार दिलेल्या शासन निदेशान्वये संबंधीत जिल्ह्याचे सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय यांना अधिकार प्रत्यायोजित करण्यात आले आहे;

आणि त्याअर्थी, आता, सदर सूचनेशी संलग्न परिशिष्ट अ नुसारच्या परिघस्त क्षेत्रातील प्रारूप रस्त्यांच्या जाळ्यांच्या नकाशांचे प्रसिद्धीकरण करणे व त्याअनुषंगाने ३० दिवसांचे विहित मुदतीत नागरीकांच्या प्राप्त सूचना व हरकती यावर सुनावणी घेणे आवश्यक असल्याने, उक्त अधिनियमाच्या कलम २० (३) च्या तरतुदीन्वये सदरहू सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येत आहेत;

उक्त प्रारुप रस्त्यांच्या जाळ्यांच्या नकाशांच्या अनुषंगाने नागरीकांच्या काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सहायक संचालक, नगर रचना, रायगड अलिबाग शाखा अलिबाग कार्यालयाकडे लेखी स्वरुपात पाठवाव्यात, सदरची सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत सहायक संचालक, नगर रचना, रायगड अलिबाग शाखा अलिबाग या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जातील;

उक्त प्रारूप रस्त्यांच्या जाळ्यांचे नकाशे नागरिकांच्या अवलोकनार्थ सहायक संचालक, नगर रचना, रायगड अलिबाग शाखा अलिबाग या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. उक्त प्रारूप रस्त्यांच्या जाळ्यांचे नकाशे व तपशील योग्य शुल्क आकारुन सहायक संचालक, नगर रचना, रायगड अलिबाग शाखा अलिबाग या कार्यालयात नागरीकांना उपलब्ध होऊ शकतील.

सही/-
**(कुणाल अ. मुळे)**
**प्राधिकृत अधिकारी तथा,**
**सहायक संचालक, नगर रचना,**
**रायगड अलिबाग शाखा अलिबाग**

**परिशिष्ट 'अ'**

| क्रमांक | जिल्हा | अनुक्रमांक | रस्ता जाळे नकाशे |
|---|---|---|---|
| १ | रायगड | १ | रोहा (नगरपरिषद) |
| | | २ | माणगाव (नगर पंचायत) |
| | | ३ | पाली (नगर पंचायत) |
| | | ४ | महाड (नगरपरिषद) |
| | | ५ | पोलादपूर (नगरपंचायत) |

Maharashtra Region and Town Planning Act, 1966. Notice under the provisions of section 20(3) of the said Act in pursuance with the provisions of the Regulation No. 5.1.1 (i) of the Unified Development Control & Promotion Regulations

**Government of Maharashtra**
**Assistant Director of Town Planning,**
**Raigad Alibag Branch, Alibag.**
**NOTICE**

Whereas, the State Government has been sanctioned the Regional Plans for various Regions in Maharashtra State as per the provisions of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as 'the said Act');

And whereas, the Unified Development Control and Promotion Regulations for Maharashtra State (with some exceptions) has been sanctioned under the provisions of section 37(1AA) (c) & 20(4) of the said Act, by the Government in Urban Development Department vide Notification No. TPS-1818/CR-236/18/DP & RP/Scc.37 (1AA)(c) & 20(4)/UD-13, dated 02.12.2020 and come into force with effect from 03.12.2020 and it is applicable for the area under Regional Plans (hereinafter referred to as 'the said Regulations');

And whereas, as per the provisions of Regulation No. 5.1.1 of the said Regulations, the areas in Regional Plan within a belt of 2 k.m. from the boundaries of Municipal Corporation, 1 k.m. from the boundaries of Municipal Council and 0.50 k.m. from the boundaries of Nagar Panchayat, where zone plans are prepared or not prepared, appropriate Road Network Plans to be prepared for such areas;

And whereas, as per the provisions of Regulation No. 5.1.1 of the said Regulations, the Government in Urban Development Department vide Government Order No. टिपीएस-१८२०/६१४/प्र.क्र.७९/२०२१/नवि-१३, dated 27.03.2025, has been delegated the powers as per the provisions of section 154 of the said Act to the respective Assistant Director of Town Planning, Branch Office, of the Concerned District, in order to carry out the process under the provisions of section 20(3) of the said Act regarding the draft Road Network Plans for the areas within the Regional Plan area;

And therefore, now, it is necessary to publish the draft Road Network Plans in the said area as per 'Schedule A' attached to the said notice to hear the suggestions and objections from the public within the prescribed period of 30 days, therefore, the said notice is being published in the Maharashtra Government Gazette under the provisions of section 20(3) of the said Act;

If any person have any suggestions/objections in accordance with the Draft Road Network Plans, they should send these suggestions/objections in writing to the office of the Assistant Director of Town Planning Raigad Alibag Branch, Alibag. within the period of 30 days from the date of publication of this Notice in Maharashtra Government Gazette. The suggestions/objections received by the office of Assistant Director, Town Planning, Raigad Alibag Branch, Alibag within 30 days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette will be considered;

The draft Road Network Plans are available for the public inspection during office hours at the office of the Assistant Director, Town Planning Raigad Alibag Branch, Alibag. The copies of the said draft Road Network plans and its particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Assistant Director of Town Planning Raigad Alibag Branch, Alibag.

Sd/-
**(Kunal A. Muley)**
**Assistant Director of Town Planning**
**Raigad Alibag Branch, Alibag**

***Schedule 'A'***

| No. | District | Sr. No. | Road Network Plan |
|---|---|---|---|
| 1 | Raigad | 1 | Roha (Municipal Council) |
| | | 2 | Mangaon (Nagar Panchayat) |
| | | 3 | Pali (Nagar Panchayat) |
| | | 4 | Mahad (Municipal Council) |
| | | 5 | Poladpur (Nagar Panchayat) |

# निवडक

## लक्ष्य चाहर प्री-क्वार्टर फायनलमध्ये

**लिव्हरपूल :** लिव्हरपूलमध्ये सुरू असलेल्या जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२५ मध्ये भारताच्या खेळाडूंनी चांगली कामगिरी सुरूच ठेवली आहे. लक्ष्य चाहरने पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात प्री-क्वार्टरफायनल गाठली आहे, तर जास्मिनने महिलांच्या ५७ किलो वजनी गटात क्वार्टरफायनलमध्ये स्थान मिळवले आहे. लक्ष्य चाहरने पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात शानदार कामगिरी केली आणि जॉर्डनच्या हुसेन इशायशचा ५-० असा पराभव केला. त्याने सामन्याची आक्रमक सुरुवात केली आणि पहिल्या फेरीत आघाडी घेतली. हुसेनने दुसऱ्या फेरीत पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, परंतु लक्ष्यने तिसऱ्या फेरीत पुन्हा वर्चस्व गाजवले आणि शानदार विजय नोंदवला. महिलांच्या ५७ किलो वजनी गटात, जास्मिनने ब्राझीलच्या ज्युसिलिन सेर्केरा रोमेयूचा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटात भारताच्या पवन बर्टवालला उझबेकिस्तानच्या मिर्झाखालोलोव्ह मिराझिझबेककडून पराभव पत्करावा लागला.

## अल्कारोज युएस ओपनचा विजेता

**नवी दिल्ली :** जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या कार्लोस अल्काराजने २०२५ च्या यूएस ओपनच्या अंतिम फेरीत जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या जॅनिक सिनरचा पराभव करून त्याचे सहावे ग्रँड स्लॅम विजेतेपद जिंकले. अल्काराजने दुसऱ्यांदा यूएस ओपन विजेतेपद जिंकले, यापूर्वी त्याने २०२२ मध्ये ही ट्रॉफी जिंकली होती. न्यूयॉर्कमध्ये खेळल्या गेलेल्या या अंतिम सामन्यात स्पॅनिश खेळाडू अल्काराजने शानदार सुरुवात केली आणि पहिला सेट ६-२ असा जिंकला. दुसऱ्या सेटमध्ये सिनरने पुनरागमन केले आणि ६-३ असा विजय मिळवला. तिसऱ्या सेटमध्ये अल्काराजने वर्चस्व गाजवले आणि फक्त एक गेम गमावत सेट ६-१ असा जिंकला. चौथ्या सेटमध्ये सिनरने जोरदार झुंज दिली, परंतु अल्काराजने ६-४ असा विजय मिळवला आणि विजेतेपद पटकावले. यूएस ओपनपूर्वी, दोन्ही खेळाडू सिनसिनाटी मास्टर्सच्या अंतिम फेरीतही एकमेकांसमोर आले होते. त्या सामन्यात, सिनेरला दुखापतीमुळे सामना अर्ध्यावर सोडावा लागला आणि अल्काराज चॅम्पियन ठरला.

## इंग्लंडचा विश्वविक्रमी विजय

**नवी दिल्ली :** मालिका गमावलेल्या इंग्लंडने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तिसऱ्या वनडेत ३४२ धावांच्या प्रचंड फरकाने विजय मिळवला. वनडे क्रिकेटमधला हा धावांच्या फरकाने सर्वोत्तम विजय आहे. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना ४१४ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरादाखल खेळताना दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी सपशेल शरणागती पत्करली. जोफ्रा आर्चरच्या भेदक गोलंदाजीसमोर एडन मारक्रम, रायन रिकलटन, मॅथ्यू ब्रिजट्स, ट्रिस्टन स्टब्ज हे प्रमुख फलंदाज निष्प्रभ ठरले. दक्षिण आफ्रिकेची स्थिती २४/६ अशी झाली होती. कार्बिन बॉशने २० तर केशव महाराजने १७ धावा करत आफ्रिकेचा सन्मान वाचवला. आर्चरला आदिल रशीद आणि ब्रायडन कार्स यांनी तोलामोलाची साथ दिली. रशीदने १३ धावांत ३ तर कार्सने २ विकेट्स घेतल्या. दक्षिण आफ्रिकेचा डाव २१ षटकात ७२ धावांतच आटोपला आणि इंग्लंडने विश्वविक्रमी विजयाची नोंद केली. आर्चरने ९ षटकात अवघ्या १८ धावा देत ४ विकेट्स पटकावल्या. यामध्ये ३ निर्धाव षटकांचाही समावेश होता.

## बीसीसीआयची सूत्रे क्रिकेटच्या देवाच्या हाती

**नवी दिल्ली :** सप्टेंबर अखेरीस बीसीसीआयची वार्षिक सर्वसाधारण बैठक पार पडणार आहे. या बैठकीत नव्या अध्यक्षांची निवड होण्याची शक्यता आहे. सध्या राजीव शुक्ला यांच्याकडे अंतरिम पदभार आहे. महत्त्वाचे म्हणजे नव्या अध्यक्षपदासाठी सचिन तेंडुलकरच्या नावाची जोरदार चर्चा सुरु आहे. मात्र, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती पुढे आलेली नाही. येत्या २८ सप्टेंबर रोजी ३ वर्षांसाठी बीसीसीआयचा अध्यक्ष निवडला जाणार आहे. यापूर्वी सौरव गांगुली आणि रॉजर बिन्नी यांनी हे पद सांभाळलं आहे. त्यानंतर आता सचिन तेंडूलकर बीसीसीआयचा नवा अध्यक्ष होईल का? याकडे सर्वांच लक्ष लागलं आहे. बीसीसीआयचे निवृत अध्यक्ष रॉजर बिन्नी यांनी जुलै महिन्यात वयाची ७० वर्ष पूर्ण झाली. त्यामुळे त्यांनी पद सोडले आहे. सध्या उपाध्यक्ष राजीव शुक्ला अंतरिम अध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. २८ तारखीला होणाऱ्या बैठकीत अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, संयुक्त सचिव आणि कोषाध्यक्ष अशा प्रमुख पदांसाठी निवडणुका होणार आहेत. याशिवाय, अपेक्स कौन्सिलसाठी एक सदस्य, आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलसाठी दोन सदस्य आणि भारतीय क्रिकेटर असोसिएशनचे प्रतिनिधी निवडले जाणार आहेत.

# हॉकी आशिया कप

# भारताने चौथ्यांदा जिंकला




**। राजगीर । वृत्तसंस्था ।**

भारताने पुरुष हॉकी आशिया कप २०२५ चे विजेतेपद जिंकले आहे. रविवारी बिहारमधील राजगीर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या अंतिम सामन्यात टीम इंडियाने दक्षिण कोरियाचा ४-१ असा पराभव केला. भारताने हे विजेतेपद चौथ्यांदा जिंकले. या विजयासह भारताने २०२६ च्या विश्वचषकातही स्थान मिळवले.

अंतिम सामन्याच्या पहिल्याच मिनिटाला भारताकडून सुखजीत सिंगने गोल केला. दुसऱ्या क्वार्टररध्ये दिलप्रीत सिंगने पुन्हा गोल केला आणि भारताला २-० अशी आघाडी मिळवून दिली. तिसऱ्या क्वार्टरमध्ये दिलप्रीतने आणखी एक गोल केला. चौथ्या क्वार्टरमध्ये अमित रोहिदासने पेनल्टी कॉर्नरवर गोल करून भारताला ४-० अशी आघाडी मिळवून दिली. दक्षिण कोरियाकडून सन ड्युनने एकमेव गोल केला.

टीम इंडियाने अंतिम सामन्यात ५ वेळा विजेत्या दक्षिण कोरियाला हरवून चौथ्यांदा विजेतेपद पटकावले. भारताने २०१७ मध्ये अंतिम सारन्यात मलेशियाला हरवून आशिया कप जिंकला होता. कोरिया दुसऱ्यांदा उपविजेता ठरला. २००७ मध्ये अंतिम सामन्यातही संघाला भारताकडून पराभव पत्करावा लागला होता.

### भव्य मखर स्पर्धेत

## सुमित पाटील, प्रणाली म्हात्रे व करण पाटील विजयाचे मानकरी



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील कलाकारांच्या कलेला वाव देण्यासाठी बोरखार येथील तेजस कैलास डाकी यांनी आपल्या सामाजिक विकास मंडळातर्फे भव्य मखर सजावट स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेत १०० स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेचा निकाल अनंत चतुर्थीच्या दिवशी बोरखार येथे जाहीर करण्यात आला. यात सुमित पाटील हे प्रथम क्रमांकाच्या पारितोषिकाचे मानकरी ठरले. त्यांना पंचवीस हजार रुपये व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्यांनी कालिका मातेचा सुंदर देखावा साकारला होता.

शिव रूपातील गणेश मूर्ती आणि खाली शिव शंकराची पिंडी विराजमान करण्यात आली होती. त्यामुळे देखाव्याची शोभा आणखीन वाढली होती.

प्रणाली म्हात्रे हिने हस्तकलेच्या माध्यमातून सर्वांना आकर्षित करणारी देखाव्याची कलाकृती साकारली होती. त्यांना द्वितीय क्रमांकाचे १५ हजाराचे पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले. चिरनेर येथील करण पाटील यांना तृतीय क्रमांकाचे दहा हजाराचे पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले. त्यांनी कैलास पर्वताचा देखावा अगदी हुबेहूब साकारला होता. देखाव्यात शिवरूपी गणरायाच्या मूर्तीसोबत बालगणेशाची मूर्ती भक्तांना भुरळ घालीत होती.

## क्रिकेटच्या मैदानात बॉम्बस्फोट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



पाकिस्तानमधील खैबर पख्तूनख्वा भागात क्रिकेटचा सामना सुरू होता. दोन्ही संघाचे समर्थक घोषणा देत होते. षटकार ठोकल्यावर, फलंदाज बाद झाल्यावर जल्लोष सुरू होताच. दरम्यान त्याचवेळी मैदानात भीषण स्फोट झाला. प्रेक्षक मिळेल त्या रस्त्याने धावत सुटले. यामध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झाला तर इतर प्रेक्षक जखमी झाले. त्यांना उपचारांसाठी जवळच्याच रुग्णालयात भरती करण्यात आले.

जखमींपैकी काहींची स्थिती नाजूक असल्याची माहिती समोर येत आहे. हा बॉम्बस्फोट कोणी आणि का घडवून आणला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पण खेळाच्या मैदानात झालेल्या स्फोटाने सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे.

खैबर पख्तूनख्वा प्रदेशातील बाजौर जिल्ह्यात ही घटना घडली. खार तहसीलअंतर्गत कौसर क्रिकेट मैदान आहे. येथे स्थानिक संघ क्रिकेट खेळायला येतात. शनिवार आणि रविवार सुट्टीच्या दिवशी येथे क्रिकेट सामने आयोजित करण्यात आले होते. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे या ठिकाणी याच सामन्यात बॉम्बस्फोट घडवून आणण्याचा कट रचण्यात आल्याचे पोलिसांच्या तपासाता समोर आले आहे. इम्प्रोवाईज्ड एक्सप्लोसिव्ह डिव्हाईसच्या माध्यमातून लक्ष्य निश्चित करून हा हल्ला केल्याचे जिल्हा पोलीस अधिक्षक वकास रफीक यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.

## शास्त्रींचा गौतमला 'गंभीर' सल्ला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आशिया चषक २०२५ उद्यापासून सुरू होत असून माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी संजू सॅमसनला सलामीला खेळू द्यावे आणि गिलसाठी दुसरी जागा शोधावी असा सल्ला गंभीरला दिला. शुभमन उप कर्णधार म्हणून ट्वेंटी-२० संघात परतल्याने संजूचे सलामीचे स्थान धोक्यात आले आहे. अनेकांनी संजूला तिसऱ्या, चौथ्या किंवा पाचव्या क्रमांकावर खेळवण्याचा सल्ला दिला. पण, रवी शास्त्री यांनी गौतम गंभीरला सल्ला दिला आहे. संजू सॅमसनला एकटं सोडा आणि त्याला सलामीला खेळू द्या, अशी रवी शास्त्री यांची इच्छा आहे. त्यांनी गौतम गंभीर व संघ व्यवस्थापनाला गिलसाठी अंतिम ११ मध्ये दुसरी जागा शोधा असा सल्ला दिला आहे.

## राष्ट्रीय थाई बॉक्सिंगमध्ये रायगडला आठ सुवर्ण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय थाई बॉक्सिंग स्पर्धेत रायगड जिल्ह्याला आठ सुवर्णपदके मिळाली. दिशा शेळके आणि निसर्गा गवळी यांचे राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळविल्याबद्दल कौतुक होत आहे.

उत्तर प्रदेश वाराणसी येथे झालेल्या राष्ट्रीय थाई बॉक्सिंग स्पर्धेत रायगड जिल्ह्याला आठ सुवर्णपदके मिळाली. पिंपळोली ग्रामपंचायतमधील तलवडे गावातील दिशा शेळकेची महाराष्ट्र संघात निवड झाली होती. दिशा शेळके ५६ किलो वजनी गटात सुवर्णपदकाची मानकरी ठरली आणि रायगड जिल्ह्याचे आणि महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधी करत भारतातील सुवर्ण पदकाच्या यादीत आपले नाव कोरले. दिशा शेळके ही वंजारपाडा येथील माथेरान व्हॅली स्कूल शाळेची विद्यार्थिनी आहे. दहावीच्या वर्गात शिकत असलेल्या दिशा हिची वयाच्या पंधराव्या वर्षीच आशियाई स्पर्धेत निवड झाली आहे. सुवर्णक्षण खेचून आणणाऱ्या या यशस्वी खेळाडूंना नेरळ परिसरात कौतुकाची थाप मिळत आहे. त्याशिवाय चांदई तासगावकर इंजिनिअरिंग कॉलेजची विद्यार्थिनी निसर्गा गवळी हिने महाराष्ट्र संघातून सुवर्णपदक प्राप्त केले.

या स्पर्धेसाठी इंडिया थाई बॉक्सिंग फेडरेशनचे सर्वस्व पाशा आतार तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.



**पदक विजेते**

- दिशा शेळके.. सुवर्ण पदक आणि रौप्य पदक )
- दिशांत भोईर.. सुवर्ण पदक आणि रौप्य)
- निसर्गा गवळी... सुवर्ण पदक आणि रौप्य)
- गायत्री डामसे.. कांस्य पदक)
- वैदेही जाधव ..कांस्य पदक)

### जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धा

## नीरज चोप्रा करणार नेतृत्व

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्रा आणि पाकिस्तानचा ऑलिम्पिक चॅम्पियन अरशद नदीम पुन्हा एकदा समोरासमोर येणार आहेत. पॅरिस येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेनंतर पहिल्यांदाच ते एका स्पर्धेत खेळताना दिसणार आहेत. जपानच्या टोकियोमध्ये आयोजित जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत या दोघांमध्ये कांटे की टक्कर पाहायला मिळेल. १३ ते ३१ सप्टेंबर या कालावधी पार पडणाऱ्या स्पर्धेत नीरज चोप्रा १९ सदस्यीय भारतीय ताफ्याचे नेतृत्व करणार आहे.

भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रा हा जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेतील गत चॅम्पियन आहे. याच जोरावर त्याला या स्पर्धेत थेट एन्ट्री मिळाली आहे. दुसरीकडे पाकिस्तानी खेळाडूनं मे महिन्यात दक्षिण कोरियात झालेल्या आशियाई चॅम्पियनशिप स्पर्धेत ८६.४० मीटर थ्रोसह गोल्डन कामगिरीसह या स्पर्धेच तिकीट मिळवलं आहे. नीरज चोप्रा हा मागील काही स्पर्धेत सातत्याने ८५.५० मीटर पेक्षा लांब भाला फेकताना दिसला आहे. यावेळी पुन्हा तो ९० पारचं लक्ष्य गाठत सुवर्ण कामगिरीसह या स्पर्धेतील बादशाहत कायम ठेवण्याच्या इराद्याने मैदानात उतरेल. एवढेच नाही तर पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेतील फायलमधील हिशोब चुकता करण्याची संधीही त्याच्याकडे आहे.

यंदाच्या हंगामात जर्मनीच्या भालाफेकपटूनं तीन वेळा ९० मीटर पेक्षा अधिक अंतर भाला फेकला आहे. नीरजनं याचवर्षी दोहा डायमंड लीगमध्ये ९० पारचा आकडा गाठला होता. ९०.२३ मीटर थ्रोनंतर नीरजच्या कामगिरीत सातत्य दिसले, पण नव्वदीचा आकडा गाठण्यात तो कमी पडला. यात सुधारणा करून तो सर्वोत्तम कामगिरीसाठी प्रयत्नशील असेल.

## महाराष्ट्राचा डंका

### गुजरात-छत्तीसगडनेही मिळवलं यश

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

वेस्ट झोन बॅडमिंटन स्पर्धेचा निकाल अखेर लागला आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रासह गुजरात आणि छत्तीसगडने विजयी पताका फडकवली. महाराष्ट्राच्या पुरुष सांघिक आणि ज्युनियर मुलींच्या सांघिक गटाने बाजी मारली. महाराष्ट्राच्या पुरुष संघाने छत्तीसगडवर ३-१ असा विजय मिळवला.

छत्तीसगडच्या रौनक चौहानने महाराष्ट्राच्या वरूण कपूरला ८-२१, १५-२१ असं पराभूत केलं होतं. पण त्यानंतर महाराष्ट्राने जबरदस्त कमबॅक केलं. दर्शन पुजारीने हर्षित ठाकूरचा २१-१५, २१-१६ असा पराभव केला, तर दुहेरीत विप्लव कुवळे आणि विराज कुवळे या जोडीने एमव्ही अभिषेक आणि सुजे तांबोळी या जोडीवर २१-११, १८-२१, २१-१४ अशी मात केली. तिसऱ्या एकेरीत संकल्प गुरालाने हर्षल भोयरवर २१-१३, २१-१४ असा विजय मिळवून महाराष्ट्राच्या विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

ज्युनियर मुलींच्या संघाने अंतिम फेरीत महाराष्ट्राने छत्तीसगडला २-१ असा चुरशीच्या लढतीत हरवले. तनू चंद्राने रिधीमा सरपतेवर २१-११, २१-७ असा विजय मिळवला होता. त्यामुळे महाराष्ट्राचा संघ बॅकफूटवर गेला होता.

## मार्नस लाबुशेन चमकला!

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलियाचा स्टार फलंदाज मार्नस लाबुशेन आपल्या फलंदाजीसाठी ओळखला जातो. दरम्यान संघाला गरज असताना तो गोलंदाजी देखील करताना दिसतो. सध्या तो केएफसी टी-२० लीग स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरला आहे.

या स्पर्धेत मार्नस लाबुशेन रेडलँड्स संघाकडून खेळतोय. या संघाकडून खेळताना त्याने फलंदाजीसह गोलंदाजीतही दमदार कामगिरी केली आहे. आधी क्वीन्सलँड संघाविरुद्ध खेळताना त्याने दमदार शतक झळकावलं होतं. आता व्हॅलीज संघाविरुद्ध झालेल्या अंतिम सामन्यात त्याने हॅटट्रिक घेत संघाला विजय मिळवून दिला आहे.

**टी-२० आशिया चषकाला आजपासून प्रारंभ | जर्सीवर आहे बीसीसीआयचा लोगो**

# भारतीय संघाच्या जर्सीची झलक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**



आशिया चषक २०२५ साठी सर्व संघ जोरदार सराव करत आहेत. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व ८ संघांनी आपले स्कॉड जाहीर केले आहेत. भारतीय संघाचं नेतृत्त्व सूर्यकुमार यादव करणार आहे, तर उपकर्णधार शुबमन गिल असेल. पण यादरम्यान भारताची जर्सी कशी असणार याची सर्वांनाच उत्सुकता होती, पण आता नव्या जर्सीची झलक पाहायला मिळाली.

२०२५ च्या आशिया चषकासाठी टीम इंडियाची जर्सी कशी असेल हे जाणून घेण्याची सर्वांना उत्सुकता होती. या उत्सुकतेचे कारण म्हणजे भारत सरकारने रिअल मनी ऑनलाइन गेमिंगवर बंदी घालण्यात आली आहे. यामुळे, बीसीसीआय आणि टीम इंडियाचे जर्सी प्रायोजक ड्रीम ११ यांच्यातील करार मोडला गेला. तेव्हापासून आशिया चषकासाठी टीम इंडियाच्या जर्सीवर प्रायोजकाचे नाव असेल की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. आता या प्रश्नाचं उत्तरही सापडलं आहे, कारण टीम इंडियाच्या जर्सीची पहिली झलक समोर आली आहे.

अष्टपैलू खेळाडू शिवम दुबेने आशिया चषकासाठीच्या फोटोशूटचे काही फोटो इन्स्टाग्राम वर पोस्ट केले आहेत, ज्यामध्ये तो टी-२० आशिया चषकासाठीची जर्सी घातलेला दिसत आहे. ही जर्सी तीच आहे जी टीम इंडियाने गेल्या वर्षी टी-२० विश्वचषकात घातली होती. प्रायोजकांशिवाय असलेल्या भारताच्या या जर्सीवर बीसीसीआयचा लोगो, आशिया चषक २०२५ चा लोगो आणि भारताचं नाव आहे. २३ वर्षांनंतर पहिल्यांदाच टीम इंडिया कोणत्याही जर्सी प्रायोजकाशिवाय स्पर्धेत प्रवेश करणार आहे. यापूर्वी २००२ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्येही एका वादामुळे भारतीय संघ कोणत्याही प्रायोजकाशिवाय सहभागी झाला होता. आता भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने नवीन प्रायोजकांसाठी निविदा सादर करण्याची शेवटची तारीख १६ सप्टेंबर निश्चित केली आहे. बीसीसीआयने स्पष्ट केलं आहे की कोणतीही बोली लावणारी कंपनी किंवा तिच्याशी संबंधित संस्था ऑनलाइन मनी गेमिंग, बेटिंग किंवा जुगाराशी कोणत्याही प्रकारे संबंधित नसावी. आशिया चषक २०२५ चे यजमानपद भारताकडे आहे. परंतु भारत आणि पाकिस्तानमधील सध्याच्या तणावापूर्ण परिस्थितीमुळे, ते तटस्थ ठिकाणी आयोजित केले जाईल. भारतीय संघाला टी-२० आशिया कप २०२५ साठी अ गटात स्थान मिळाले आहे.

## अर्शदीप सिंग घडवणार इतिहास

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आशिया कप २०२५ स्पर्धा संयुक्त अरब अमिराती येथे ९ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. भारतीय संघाचा पहिला सामना युएईविरुद्ध दुबईत होणार आहे. अर्शदीप सिंगला आशिया कपमध्ये मोठा विक्रम करण्याची संधी आहे. अर्शदीप सिंगने आंतरराष्ट्रीय टी २० क्रिकेटमध्ये ९९ विकेट्स घेतल्या आहेत. तो भारताकडून सर्वाधिक टी २० विकेट्स घेणारा गोलंदाजही आहे. आता त्याने एक विकेट घेतली, तर तो १०० विकेट्स घेणारा भारताचा पहिलाच गोलंदाज बनेल. आत्तापर्यंत भारताकडून कोणालाही आंतरराष्ट्रीय टी २० क्रिकेटमध्ये १०० विकेट्स घेता आलेल्या नाही.

## भारताला पुरुषांच्या कंपाऊंड प्रकारात पहिले सुवर्णपदक



**। ग्वांगजू । वृत्तसंस्था ।**

दक्षिण कोरियाच्या ग्वांगजू शहरात सुरू असलेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत भारताने सुवर्णपदकाने आपल्या मोहिमेची सुरुवात केली. रविवारी पुरुषांच्या कंपाऊंड प्रकारातील अंतिम सामन्यात ऋषभ यादव, अमन सैनी आणि प्रथमेश फुगे यांच्या भारतीय संघाने फ्रेंच संघाचा २३५-२३३ असा पराभव केला.

या स्पर्धेत पुरुषांच्या कंपाउंड सांघिक स्पर्धेत भारताने सुवर्णपदक जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. स्पर्धेच्या या हंगामात भारताचे हे पहिले सुवर्णपदक आहे. सामन्याच्या पहिल्या तीन सेटमध्ये दोन्ही संघ १७६-१७६ अशा बरोबरीत होते, परंतु चौथ्या सेटमध्ये भारताने शानदार कामगिरी करत ५९ गुण मिळवले, ज्यामुळे फ्रान्सवर दबाव निर्माण झाला. या सेटमध्ये फ्रान्सला फक्त ५७ गुण मिळवता आले आणि अशा प्रकारे भारताने दोन गुणांच्या फरकाने सुवर्णपदक जिंकले. पुरुष संघाने उपांत्य फेरीत तुर्कीविरुद्ध पुनरागमन केले. पहिल्या सेटमध्ये ७ गुणांचा खराब शॉट असूनही, संघाने हार मानली नाही आणि पुढील तीन सेटमध्ये फक्त एक गुण गमावला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)